श्रीगुरुप्रसन्न.

संगीत वसंतचंद्रिका नाटक.

हें पुस्तक

माधव नारायण पाटणकर

यांनीं रचिलें,

तें

मुंबईंत

"विजय" छापखान्यांत छापिलें.

आवृत्ति २ री.

सन १९०५.

किंमत १२ आणे.

हे ... आवर्डत नसल्यामळ सतत उद्योग करून एकक

या नाटकांतील मुख्य पात्रें.

हेमंत		धनसंपादनाविषयीं आतुर झालेला एक गृहस्थ.
वसंतराव	...	... एकसुखवस्तू संभावीत गृहस्थ (नायक.)
मदनराव	...	... सावकार पुत्र.
मेघनाद ...	...	... मदनरावाचा मित्र.
मारुत ...	...	... वसंतरावाचा मित्र.
सुविचार	...	... चित्रपुरीचा राजा.
रमा ...	...	... वसंतरावाची गृहिणी.
सरस्वती ...	...	... मदनरावाची गृहिणी.
मुक्ताजी ...	...	... एक नायकीण.
चंद्रिका ...	...	... मुक्ताजीनें विकत घेतलेली मुलगी (नायिका.)
सारिका ...	...	... चंद्रिकेची मानलेली बहीण.
फक्कडराव	...	... मुक्ताजीचा यजमान.
बाबल्या	...	... ,, नोकर.
चंग्या, फंग्या	... ...	... दरोडेखोर.
सुमती	...	... राजाचा मंत्री.

या शिवाय न्यायाधीश, वकील, हवालदार, चोपदार वगैरे पात्रें.

द्वज्जनांच्या पुढें सादर करीत आहे; या सर्व गोष्टींचें श्रेय माझ्या देशबांधवानांच मी देतों. प्रस्तुतच्या नाटकांत तूर्तच्या कालांतील गोष्टीचेंच ओबडधोबड चित्र रेंखटलें आहे. कांहीं लोक ही मृच्छकटिक नाटकाची नकल आहे, असें ह्मणतात खरें; पण मार्मिकपणानें प्रयोग अवलोकन केला असतां मृच्छकटिक नाटकांतील एकंदर पात्रांहून या नाटकांतील पात्रांचें गुणधर्म अगदीं वेगळे आहेत, असें दिसून आल्याबांचून राहणार नाहीं. मृच्छकटिकांतील पात्रांची व या नाटकांतील पात्रांची तुलना करीन तर प्रस्तावना उगीच लांबेल, ह्मणून तसे न करितां या गोष्टीचा विचार करणें हें मी रसिकजनांकडेच सोपवितों. मनुष्यकृतींत थोडे बहुत दोष हे असावयाचेच. गाल तीट असल्याबांचून गौरवर्णाला तरी शोभा कशी यावी ! दोषा खेरीज गुण समजावयाचें नाहींत. व गुणावांचून दोष- ही समजणार नाहींत. वास्तविक रीतीनें विचार केला असतां जो सतत परिश्रमानें विचार करून ईश्वरानें दिलेल्या मेंदूचा अंशत: तरी उपयोग करितो, त्याच्या कृतींत सर्वच दोष कधीं असणार नाहींत, हें अगदीं निर्विवाद होय. आतां गुण जास्त व दोष कमी अशी कृति झटली तर फक्त विद्वानांचीच !

पाय पुढेंच टाकावयाचा असा मी निश्चय केला आहे. या दृढनिश्चयाचें फल प्रभुकृपेनें व रसिकांच्या दयेनें माझ्या कल्पनेच्या बाहेर मला मिळत आहे; ही केवढी बरें आनंदाची गोष्ट ! असो, रसिक देशबांधवांनीं मला असेंच साह्य केल्यास अलीकडील सामाजिकस्थितीवर लौकरच एक नाटक करून तें विद्वज्जनांपुढें सादर करणार आहें. सर्वशक्तिमान प्रभूच्या-कृपेवरच सर्व कांहीं अवलंबून आहे. तो जगदात्मा मला सद्-बुद्धि देवो, अशी अनन्यभावानें मी त्याची प्रार्थना करितों.

पुस्तककर्ता.

श्रीसद्‌गुरु प्रसन्न.

संगीत वसंतचंद्रिका
नाटक.

मंगलाचरण.

पद. (राग-शंकरा, ताल-त्रिताल.)

दशरथतनया रघुकुलभूषा शरयूतीरविहारा ॥ चरणसंपुटीं कवनसुमाला अर्पण करितो जोडुनी करा ॥ धृ० ॥ दुरितसंघ हा निरसुनि जातो तव नामानें जगदोद्धारा ॥ भवभय मग तें राहिल कोठुनी दशवदनारी जनकजावरा ॥ पतितपावना मंगलधामा श्री रघुवीरा भुवनसुंदरा ॥ कृपाछत्र तव अनुदिनिं राहो माधवदासावरती सुरवरा ॥ १ ॥

पद. (गुरुदत्त दिगंबर भजरे० या चालीवर.)

अवधूत निरंजननामीं ॥ रत होइ मना सुखधामीं ॥ धृ० ॥ श्रीकृष्णातिरिं अवदुंबरतरु शीतल छायीं वसुनी ॥ ऋग्यजुसाम अथर्वण सुरभी असती सन्निध भुवनीं ॥ श्रीनरहरिच्या सुंदर रूपा ठेवुनि हृदयीं दिनरजनीं ॥ माधव-मधुकर चरणकमलरज सेवितसे सुखसदनीं ॥ १ ॥

सूत्रधार–(पुढें होऊन) अहाहा ! जगदीशाचें मंगल नामस्मरण किती वेळ जरी केलें तरी तें थोडेंच. असो, यावेळीं जास्त पाल्हाळ न लावतां पुढील कार्याला तत्पर असलें पाहिजे. (पडद्याकडे पाहून) ही पहा माझी साह्यकर्ती इकडेसच येत आहे.

(नटी प्रवेश करिते.)

नटी–(आश्चर्यानें)–

पद. (श्रीरघुवीर तुमरे० या चालीवर.)

चैनीजन हे बसले उधळुनि धन आपुलें
सारें ॥ पानसुपारी न मिळे ह्मणुनी हिंडतात
घरदारें ॥ धृ० ॥ जुगार फांसे खेळायाला
किमपि ही वेळ न पुरे ॥ मध्यान्हीचा समय
आलिया समजेल सुख तें खरें ॥ शुद्धीवर
या डोळे उघडा हंसती कीं जन हे बरें ॥१॥

सूत्रधार–(जवळ जाऊन) प्रिये, हे विचार आजच तुझ्या मनांत येण्याचें काय बरें कारण ?

नटी–आज काल हेच विचार माझ्या मनांत घोळत असतात. ह्या विचारांचं चांगलंस प्रतिबिंब लोकांच्या मनांत पूर्णपणें ठसेल असं एखादं नाटक आपण कां नाहीं करून दाखवीत? हें पहा, आजपर्यंत बऱ्याच विद्वानांनीं पौराणिककालचे सुनीतिदर्शक असे बरेच प्रयोग जनमनोरंजनार्थ केले, पण मी ह्मणतें अशा प्रकारच्या नाटकांचे प्रयोग जर कोणी करील, तर प्रस्तुत स्थितीला त्याचा बराच उपयोग होईल असं मला वाटतं. खरोखर या कामीं आपल्याला माझ्याकडून होईल तितकं साह्य मी मोठ्या आनंदानं करीन.

सूत्रधार–(आनंदानें) भार्ये, या तुझ्या भाषणानें मला किती आनंद झाला ह्मणून सांगूं ! यावेळीं तुझ्या व माझ्या विचारांचें इतकें कांहीं एकीकरण झालें आहे कीं, तें मी सांगूं शकत

नाहीं. असो, आतां जास्त पाल्हाळ नको. तूं ह्मणतेस त्याप्रमाणेंच मी या रंगभूमीवर नाटक करून दाखविणार आहें. हें पहा–

पद. (कंठ चरचर चिरुनि० या चालीवर.)

वारवनिता जी असोनी गृहिणिभूषण पा-
वली ॥ त्याच सातिचें चरित रसिकां दावितों
मी या स्थलीं ॥ चंद्रिकेचा हेतु पुरला वसं-
ताला भेटली ॥ प्रेक्षकांना तोषवाया जाउं
सखये सुस्थलीं ॥ १ ॥

सूत्रधार व नटी जातात.

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

(स्थल-रस्ता.)

(हेमंत प्रवेश करितो.)

हेमंत-खरोखर या जगांत जिथें तिथें पैशामुळें नडत असल्यामुळें मनुष्याला केव्हां केव्हां सत्याला सोडून जावें लागतें, कारण--

पद. (जगीं आशेचा० या चालीवर.)

या पैशाच्या ढोंगापुढती पांडुरंग तो कोणा
न सुचे ॥ दंभावांचुन कांहिं न जुळतें कलि-
युग बनलें असत्यतेचें ॥ द्रव्यापुढती आप्त
इष्ट ते दिसति न कोणा वदतों साचें ॥ हानी
करुनी दुरिताचरणें धनिक जाहले जगीं
फुकाचे ॥ केवळ उद्यमबलें वाढले धनिक जे
खरे त्या संतांचे ॥ चरणीं माथा ठेवुनि
आतां नाटक करितों भूतदयेचें ॥ १ ॥

असो, आतां पुष्पसेनासाठीं वसंतरावाला भेटून तो त्याचा घरजांवई होईल अशी कांहीं तरी युक्ति लढविलीच पाहिजे. वसंताकडून जर या कामाचा रुकार मिळाला, तर या कामीं माझा बराच फायदा होणार आहे. चला आतां वसंताकडे जावें. (इतक्यांत वसंतराव प्रवेश करतो.) मित्रा वसंता, पुष्पसेनाचें ह्मणणें तूं त्यांचा घरजांवई व्हावेंस असें आहे, यासाठीं मी सांगतों इकडे अवश्य लक्ष दे. ही गोष्ट जर तूं ऐकिलीस तर कोणाची चाकरी नको, कांहीं नको; खुशाल राजाप्रमाणें आनंदांत राहशील. आणखी तुला सांगतों,

प्रस्तुत काळीं धर्मभोळेपणा अगदीं उपयोगाचा नाहीं. हें कालचक्र जसें जसें फिरेल तसें तसें मनुष्यानें आपलें वर्तनही बदललें पाहिजे. कारण,—

पद. (ताल–धमारा)

यत्न केल्यावांचुनी नच पोट भरतें या जनीं ॥ ह्मणुनि मित्रा साधुवृत्ति देइ झडकरि सोडुनी ॥ अनायासें कनककांता मिळत असतां कां मनीं ॥ हट्ट धरुनी फुकट संधी देसि कां रे दवडुनी ॥ १ ॥

वसंत–(गंभीरतेनें) मित्रा हेमंता, असे कुत्सित विचार एखाद्या मूर्ख व अडाणी मनुष्याला सांगितले असतेस तर तुझें कांहीं तरी वजन राहतें. एकूण जगांतील सर्व वस्तूंपेक्षां तुला कनककांतेचेंच महत्व जास्त वाटतेंना ? हें पहा —

पद. (भाग्यवान मजसमान० या चालीवर.)

सुखसरिता प्रियवनिता रमवितसे मच्चित्ता ॥ कृष्णवदन करि चिंता ॥ ह्मणुनि भूवरी ॥ धृ० ॥ सुगुणरूपयुक्त युवति ॥ विधिनें मज दिधलि जगतीं ॥ प्रिय सतिचें प्रेम किती ॥ मजवरी तरी ॥ वित्ताचा लोभ धरुनी ॥ प्रेमाचा विरस करुनी ॥ विफल असा धरुं कां तरी ॥ मोह अंतरीं ॥ १ ॥

अरे, ज्यानें राजरोस लोकांचे गळे दाबून अन्यायानें द्रव्य संपादन केलें, अशा नीच मनुष्याचा मी घरजांवई व्हावें, हा तुझा विचार किती घातक आहे !

पद. (अंगिकार करुनि० या चालीवर.)

वित्तलोभ धरुनि कुला डाग लावुनी ॥ घेउं

काय या जगांत सौख्य मानुनी ॥ छी छी हें
निंद्य कर्म वाटतें मनीं ॥ स्वबलावर मनुजानें
कीर्ति मिळवुनी ॥ आप्त इष्ट मित्र गणा पूज्य
होउनी ॥ जावें मग सुरभुवनीं नांव ठेवुनी॥१॥

हेमंत-(हिरमुसल्यासारखें तोंड करून एकीकडे) इतकें फोडून सांगितलें तरी ' पालथ्या घागरीवर पाणी ! ' लोखंडाचें डोकें आहे कीं काय समजत नाहीं. मिळून द्रव्यसाधनाच्या आजपर्यंत जितक्या युक्त्या योजिल्या तितक्या सर्व फुकट गेल्या. असो, ' धीरसो गंभीर. ' (उघड) मित्रा ही संधि तूं फुकट दवडतोस, हें कांहीं चांगलें करीत नाहींस ! बाबारे अकरावा गुरु वरचेवर येत नसतो, समजलास ?

पद. (सुखोपभोगा० या चालीवर.)

धनावांचुनी मुळिं न चालतो या लोकीं व्य-
वहार ॥ कांहिं तरी करि मित्रा अंतरिं आतां
बघ सुविचार ॥ धनासारखा जनीं मानवा
नाहिं दुजा आधार ॥ यावांचोनी पुढति
न टाकी पाऊल हा संसार ॥ रम्योद्यानी
भव्य मंदिरीं दासींचा परिवार ॥ निशि-
दिनीं तुझ्या सेवेमध्यें राहिल वारंवार ॥ १ ॥

वसंत- अरे, हा काय मला भलताच उपदेश करतोस ! हें पहा-

पद. (कुटिल मंत्रिजन० या चालीवर.)

श्वानापरि मी पडुनि राहुं कां परक्याच्या
द्वारीं ॥ बोध तुझा हा किमपी मित्रा रुचत
नसे अंतरीं ॥ उद्यम करुनी सुखी रहावें
आनंदें संसारीं ॥ नातरि सार्थक करुनी

घ्यावें देहाचें कां तरी ॥ मान फुकाचा मिळ-
वुनि शेखी मिरवावी कां तरी ॥ स्वबलावरती
अजरामर यश मिळवावें भूवरी ॥ १ ॥

हेमंत-(एकीकडे) महात्वाकांक्षा तर मोठी दिसते, पण दैव बेटें छोटें पडलें त्याला इलाज नाहीं. (उघड) मित्रा हूँ ह्मण कीं लक्षाधीश झालास समज.

बसंत-मित्रा, अरे बिनश्रमानें लक्षाधीश होण्यांत मला मुळींच भूषण वाटत नाहीं. कारण—

पद. (एकांतवास० या चालीवर.)

याचना कराया गरज नसे या जगतीं ॥ तोच
भोगितो खरोखरी श्रीमंती ॥ धृ० ॥ या वि-
त्तविषाचा संग्रह करुनी महती ॥ मिरवि-
तो तया अंतिं मिळे नच सुगती ॥ चाल ॥
जो पहा मनानें मोठा तो खरा ॥ धनिका
हुनि विलसे लोकीं कीं हिरा ॥ निपजला भा-
ग्यशाली तो मोहरा ॥ जो धर्मनीतिचा
भक्त तयाला नृपती ॥ पूज्य मानुनी करिति
तयावर प्रीती ॥ १ ॥

ह्मणून ह्मणतों कीं हे तुझे बाष्कळ विचार माझ्या मुळींच कामाचे नाहींत. अरे दैवयोगानें मी स्वपराक्रमानें लक्षाधीश न होईन कशावरून ?

हेमंत-मग माझें तुला नाहींचना ऐकायचें ?

बसंत—नाहीं, नाहीं, जरी तूं माझा मित्र आहेस, तरी असला दुर्बोध करणाऱ्याला मी शत्रूपलीकडे मानतों. बस्स, तुझ्या डोक्यांतून हे विचार जाईपर्यंत तूं मला वैऱ्यापलीकडे मानलेंस

तरी मी त्याची मुळींच पर्वा करीत नाहीं. (जातो आहे, इतक्यांत देवदर्शनाला चाललेली चंद्रिका व तिची बहीण सारिका प्रवेश करतात. चंद्रिका वसंतरावाला पाहून लज्जित होते.)

सारिका–अक्का, चालतां चालतां थांबलीसग कां ?

चंद्रिका–(उसासा टाकून) काय सांगूं सारिके, ज्या मूर्तीनें रात्रंदिवस मला वेड लाविलें आहे तिचें दर्शन घडलें ह्मणून थबकलें हो.

वसंत–(एकीकडे) ही स्त्री मला पाहिल्याबरोबर लज्जित कां बरें झाली ? असो, आपण दुसऱ्या रस्त्यानें जाऊं. (चंद्रिकेकडे पहात पहात जातो.)

चंद्रिका–बरें तर चल. (दोघी निघून जातात.)

हेमंत–हा तर बेत फसलाच. आतां एखादें श्रीमंताचें उल्लू पोर गांठून त्याला राव बनविल्याविना कार्यभाग कधींही शेवटाला जाणार नाहीं. कोणाचा नाश अगर घात न करितां युक्तीनें करामत लढवून स्वतःचा तळिराम गार करून घेण्यांत मुळींच पातक नाहीं (इकडे तिकडे पाहून) हे कोण बरें इकडे फक्कड येत आहेत ? (निरखून पाहून) हा धनाढ्य कुबेर शेटजींचा मुलगा मदनराव व त्याचा मित्र आहेतसें वाटतात वः फार चांगलें झालें. कशी पण नामी शिकार साधली. असो, हे आपल्याशीं काय काय बोलतात हें आपण बाजूला उभे राहून ऐकूं.

(इतक्यांत मदनराव व मेघनाद प्रवेश करितात.)

मेघनाद–कां मदना, कसें आहे फक्कड पांखरूं ? जशी कांहीं कोंवळी लुसलुशीत काकडीच. नखशिखांत कशी अगदीं रेंखलेली ! सोडा पैशाची थैलीन् काय ? ' शुभस्य शीघ्रं '

मदन–मित्रा काय सांगूं तुला, चंद्रिकेचें तें कुर्रेबाज पहाणें न् ती चालण्याची ऐट हीं नेहमीं डोळ्यासमोर उभीं आहेतशीं

वाटतात. एकूण थैली मोकळी सोडल्यावांचून कांहीं शिकार साधत नाहीं तर ?

मेघनाद–नाहीं इतकेंच नव्हे, तर दहा वीस थैल्या सोडून तरी कार्यभाग सिद्धीला जाईल कीं नाहीं याची देखील वानवाच.

मदन–(आश्चर्यानें) काय ह्मणतोस, दहावीस थैल्यांनींही काम साधणार नाहीं ? अशी काय अप्सरा आहे कीं काय ? " दुरून डोंगर साजरे " मग नको बाबा असलें गिऱ्हाईक. नुसती पानपट्टी मिळते तेवढीच बस्स. उगीच ' लहान तोंडीं मोठा घांस ' घेण्यांत हंशील नाहीं.

मेघनाद–मग आजपर्यंत फुकटच ऐट मारीत होतास तर ? ह्मणे मी यंव करीन त्यंव करीन. हा शिळपटा ! अरे ताजा माल आहे तिथपर्यंत घे मौज मारून; जिवापेक्षां पैसा जास्त आहे कीं काय ?

मदन-तसें नव्हेरे, पण तूं दहा वीस थैल्या ह्मणालास ह्मणून माझी छाती दणाणली ! फार झालें तर पांचशें रुपयेपर्यंत आपली मजल.

मेघनाद–(ऐटीनें) पांचशांचा धूप देखील पुरणार नाहीं ! अंबटशोकीच आहेस तर मग तूं ? बापानें लाखों रुपये मिळविले आहेत, त्यांतले लाख पन्नास हजार गेले तर कांहीं कमी पडावयाचें नाहीं.

मदन–होय, तूं ह्मणतोस तें खरें, पण उगीच लाख पन्नास हजार रुपये खर्च करायचे ? लिलांव कोठपर्यंत चढतो पाहूं तर खरा, मग पुढचा बेत.

मेघनाद–बाबारे, वेश्यांच्या घरीं तीन वार कधींच व्हावयाचे नाहींत.

मदन—आस्ते आस्ते काय होतें तें पाहूं तर खरें, मग पुढचा विचार.

मेघनाद-पुढें काय, एखाद्या फक्कडानें छाप ठेवल्यावर मग बैस माशा मारीत. चल, समजलें तुझें अवसान !

मदन-पैसे काय वाटेवर पडले आहेत ह्मणून हवें तसें खर्चायचे !

हेमंत-(पुढें होऊन) मदनराव, आपलें ह्मणणें खरें आहे. प्रेम जमल्यावर मग हवे तितके पैसे खर्च करावेत; या मेघनादाचें तुह्मीं काय ऐकतां ! चला, ज्या वस्तूबद्दल आपलें मन आतूर झालें आहे, त्या वस्तूचें तुह्मांला साक्षात दर्शन घडवितों, मग झालें कीं नाहीं ? मजबरोबर गाण्याला येतां कां ?

मदन-कोठें ?

हेमंत-अहो मुक्ताजी नायकिणीच्या घरीं.

मदन-तेथें आपली चांगली वग आहे वाटतें ?

हेमंत-त्यांचा व माझा दाट परिचय देखील आहे. तुह्मीं पुढें चला; मी आलोंच तुमच्या पाठोपाठ. (मदन व मेघनाद जातात.) खरोखर या जगांत—

पद. (कटीं लंगोटा॰ या चालीवर.)

अंबटशोकी ॥ असती जन बहु या लोकीं
॥ धृ॰ ॥ तूप फुकाचें मिशिला लावुनि ॥
ऐट करोनी फिरती निशिदिनीं ॥ लज्जा
भीति अन्न सोडुनी ॥ एक पईचा खर्च न
करुनी ॥ मिरविति झाकी ॥ परि नसे कव-
डिची साकी ॥ १ ॥

चला आतां बडबड करण्यांत कांहीं हंशील नाहीं. आपला तळीराम गार कशानें होईल हें आपल्याला पाहिलें पाहिजे. (विचार करून) हं.-

पद. (वाया शिणवुं नका॰ या चालीवर.)

कावा । कांहिं तरी साधावा । त्या वांचोनी

मन हेतूचा कधिं न जमे आढावा ॥ दावा ।
लावुनिया पाहावा । घाव घालुनी शहाणप-
णानें डाव साधुनी घ्यावा ॥ ठेवा । सांपड-
ल्यावर मेवा । खुशाल खावा यत्न करोनी
तोष सदा मानावा ॥ धृ० ॥

चला आतां. (जातो.)

प्रवेश २ रा.

स्थळ—चंद्रिकेचें घर.

(चंद्रिका, तिची आई, हेमंत, मदन, मेघनाद, इतर मंडळी.)

(चंद्रिका गात आहे तों मध्येंच)

मदन-छे बोवा, आज कांहीं तरी आतां पुराणोक्त चालूं द्या. हे रागबीग आह्मांला समजत नाहींत.

मेघनाद-मदनराव, नुसतें पुराणोक्त उपयोगी नाहीं. साभिनय झालें पाहिजे.

हेमंत-(एकीकडे) ' गाढवाला गुळाची काय चव !' मदनराव बरेच उल्लूचे पठ्ठे दिसतात. यांच्यावर आपला शह बसलाच.

मदन-मुक्ताजी, आमचें कांहीं या ऐकत नाहींत. तुह्मीच यांना लावणी ह्मणायला सांगा. आह्मीं सांगितलें ह्मणजे यांना राग येतो. तेव्हां सोनारानेंच कान टोंचले ह्मणजे बरें.

मुक्ताजी-चंद्रिके, ह्मणेनास कां, त्यांत काय तुझं जातं ? कोणीकडून आपल्या घरीं आलेले लोक खुष झाले ह्मणजे झालं.

चंद्रिका-(तिरस्कारानें) मला नाहीं येत लावणी ह्मणायला

मदन-(एकीकडे) यंव रे यंव. नखरा पण नखरा. कपाळा-वरली आठी तरी किती खुबीदार आहे पहा !

मुक्ताजी-अग ह्मण वेडीवांकडी येईल तशीच.

चंद्रिका-तुला माहीत असून तूंग कसं बेड पांघरतेस ?

मुक्ताजी-जशी येईल तशीच ह्मण.

चंद्रिका-(एकीकडे) कुठले मेले सोळभोक जमले आहेत कोण जाणें. (लावणी ह्मणूं लागते.)

मदन-(ऐटीनें कांहीं रुपये फेंकतो.)

मेघनाद-अहो, जरासा खिसा मोकळा सोडला कीं लावण्याच लावण्या.

मदन-असली अळणी लावणी मधुर लागत नाहीं. साभिनय होऊं द्या.

चंद्रिका-(तंबोरा ठेवून जाते.)

मुक्ताजी-हेंग काय ? मधून उठून जाणं ह्मणजे ?

चंद्रिका-(रागानें) मला नाहीं असला फाजीलपणा आवडत !

मुक्ताजी-अग, बरोबरीची मंडळी असली ह्मणजे कमजास्त विनोद होतोच. हूं चल ये इकडे.

चंद्रिका-माझं कपाळ दुखतंय.

मुक्ताजी-(एकीकडे रागानें) बेशरम कुठली. कांहीं तरी मर्यादा आहे कां पहा !

मदन-(हिरमुसल्यासारखें तोंड करून) हूं चल मेघनादा, [illegible]दागी झालीच ह्मणायची.

मेघनाद-(एकीकडे) पाणी मोठें खोल दिसतें (उघड) [illegible] मदनराव. (दोघे उठूं लागतात तोंच-)

[illegible]क्ताजी-थांबा जरासे, पट्टी खाऊन मग जा. पोर जराशी [illegible] आहे. तिचा राग आपण मनांत धरूं नका.

मदन-(एकीकडे सुस्कारा टाकून) हा अल्लडपणाच तर हृदयाचें पाणी करून टाकतोय, काय करूं ?

मुक्ताजी-चंद्रा, देग यांना पट्ट्या करून, अग, असल्या मनुष्यांचे पाय आपल्या घरीं कशानें लागणार ?

चंद्रिका-मला पट्ट्या करतां येत नाहींत; तूंच दे हव्या तर करून.

मुक्ताजी-अग आतां माझ्या पट्ट्यांना कोण विचारतो !

मदन-मुक्ताजी मी करतों पाहिजे तर. आयती तरी खाल कीं नाहीं त्यांना विचारा.

मुक्ताजी-(येत नाहीं असें पाहून रागानें) कां आज फारशी डाळ नासली आहेस ? मुस्कट फोडून देईन, ठाऊक नाहीं वाटतं ?

चं०-(एकीकडे) थेंडे, तुला तरी अक्कल कुठं आहे ? (उघड) माझा प्राण गेला तरी बेहत्तर, पण मी पट्टी ह्मणून कोणाला द्यायची नाहीं.

मुक्ताजी-दिली पाहिजे, नाहीं ह्मणजे ?

चं०-ह्मणजे काय, नाहीं हेंच खरं. असले फाजील घरीं येतात कशाला ? ज्या कोणी पट्टी देणाऱ्या असतील तिकडेच जा ह्मणावं त्यांना.

मदन-मुक्ताजी, एकूण आह्मीं तुमच्या घरीं फाजील ठरलों तर ? वाहवा ! आपल्या घरीं आज आमची चांगलीच संभावना झाली ह्मणावयाची.

मेघनाद-मदनराव, चला आतां. आणखी कांहीं वेळानें याहीपेक्षां जास्त फजिती होईल.

मदन-(तडफडून) झक् मारली न् येथें आलों.

हेमंत-(एकीकडे) तुझ्यासारख्याला असेच पायपोस पाहिजेत.

मुक्ताजी-(रागानें) कारटे, अशा गुणानं कुत्रं देखील ढुंकून पाहणार नाहीं. गांवभर तुझी चांगली शोभा करतीलना ?

चं०-मला त्यांच्याशीं व गांवाशीं काय करायचं आहे ?

मुक्ताजी-काय करायचं आहे ह्मणतेस ? अग अशी बेफाम होऊं नकोस. धुंदी उतरल्यावर मग पश्चात्ताप पावशील. आपला धंदाच प्रत्येकापुढें माना लववायाचा आहे. असा कुर्रा करून कसं चालेल ?

चं०-चाललं नाहीं तर भीक मागेन.

मदन-मुक्ताजी, आमच्याकरितां तुह्मीं उगीच भांडूं नका. आह्मीं आपले आल्या वाटेनें मुकाट्यानें जातों कसे. चल ऊठरे मेघनादा. या सर्व गोष्टींचें प्रायश्चित्त हेमंतामुळें घडलें ह्मणावयाचें.

हेमंत-माझ्याकडे काय दोष ? असें होईल ह्मणून मला भविष्य का कळलें होतें ?

मदन-झक् मारली, शेण खाल्लें. (थोबाडींत मारून घेतो.)

मेघनाद-हा काय हो तुमचा खुळेपणा. चला दुसरीकडे कोठें तरी; गांव कांहीं ओंस पडला नाहीं. अशा छप्पनशें पडल्या आहेत. शेण खाईल तो फिरून या घराची पायरी चढेल.

(सर्व रागानें चरफडत निघून जातात.)

मुक्ताजी-(रागानें) थांब कारटे, तुझी चांगली खोड जिरवितें. विनाकारण परक्या मनुष्यांचा अपमान करून वरती आणखीं शें पांचशें रुपयांचं माझं नुकसान केलंस कीं नाहीं ? यापेक्षां गरतीच्या जन्माला जायचं होतंस.

चं०-गरतीच्या जन्मांतच काय जास्त आहे ? वेश्या असूनच नाहीं कां गरतीसारखं रहायला येत ?

मुक्ताजी-पाहीन कीं आतां कुठल्या राजाला वरतेस ती ! चढेल कुठली.

चं०-नशिबीं असेल तर तसंच कां नाहीं होणार ?

मुक्ताजी-ठीक आहे. आतां पाठीला चांगलं तेल लावून ठेव अँ. चांगली कणीक मऊ करून टाकीन तेव्हांच सोडीन. तुला आजपर्यंत हजारों रुपये खर्चून एवढं गायला न् नाचायला शिकविलं, तें कांहीं मोक्षसाधनाकरितां नव्हे. खर्चाच्या शतपट वसूल करीन तेव्हांच राहीन. (रागानें निघून जाते.)

चं०-(दुःखाचा सुस्कारा टाकून) देवा—

पद. (पूज्यबुद्धिचा० या चालीवर.)

मानवकोटीमधें मला तूं विधिराया कां
निर्मियलें ॥ त्रिकालज्ञ तूं असुनि वृथा कां
सुंदर कर हे शिणवीले ॥ सर्वांहूनी त्रिभुव-
नांत या वेश्याकुल तुज आवडलें ॥ याहुनि
तूं मज जन्मतांच कां कृतांतसदनिं न
पाठविलें ॥ १ ॥

देवा ! या द्रव्यलोभी राक्षसिणीच्या तडाक्यांतून मला एकदांची सोडीव तरी.

(इतक्यांत सारिका प्रवेश करिते)

सारिका-बये चंद्रिके, आज तुझी अशी कां बरं वृत्ति झाली ? अग आईच्या मनाजोगं वागायला तुझंग काय जातं ? तिची मर्जी मोडून आपलं कसं बरं चालेल ?

चं०--न चाललं तर इथं थोडंच आडलय ? मला नाहीं बाई असला फाजिलपणा आवडत. जो कोणी येईल त्यावेळीं गा आणि दे पळ्या. हेंग काय ? मेल्या-या पोटाकरतांचना इतकी खटपट. चार कामं धामं करून तरी पोटाला मिळेल कीं नाहीं ? आणखी इतकंही करून जर नच पोट भरलं तर–

पद. (निःसंग होउनी दंग० या चालीवर)

ना तरी । गगनमंदिरीं । रमुनि अंतरीं । आनंदें
शयना ॥ भूपर्यंकीं करून जिंकिन मदना ॥
षडरि ते । होति मग रिते । ह्मणुनि मुक्तितें ।
मिळवुनी सुजनां ॥ प्रिय होवोनी जाइन
हरिच्या सदना ॥ शंकरा । हे दयाकरा ।
जोडिते करां । देइ वरदाना ॥ चरणिं ठाव
दे हीच तुला प्रार्थना ॥ १ ॥

सारिका–अग, एकाएकीं तुझं मन इतकं भडकण्याचं कारण तरी कोणतं ? अग प्रत्येकापुढं माना लवविण्याचा व आर्जवं करण्याचा आपला धर्मच पडला; असं ह्मणून कसं बरं चालेल ?

चं०–(रागानें) आग लाव असल्या धर्माला. प्राण गेला तरी जावो, पण मी एक सोडून दुसऱ्याचें कधींही आर्जव करणार नाहीं. अहाहा ! किती तरी मनोहर रूप ह्मणून सांगूं ! माझ्या हृदयांत त्या मूर्तीनं प्रवेश केल्यापासूनच अशी स्थिति झाली बरं !

(स्तब्ध होते.)

सारिका–बये, अशी कांग एकाएकीं स्तब्ध झालीस !

पद.(कां करिसी कोप० या चालीवर.)

मानस तव कोणावर खचित गुंतलें ॥
कोणाशीं प्रिय सखये सांग रंगलें ॥ धृ० ॥
चित्त तुझें काय ह्मणुनि स्तब्ध जाहलें ॥
नाहींना हृदय तुझें कोणि चोरिलें ॥
झुरुन झुरुन जाळिसि कां रक्त आपुलें ॥
वार्धक्यें तरुणपणीं तुजसि गांठिलें ॥ १ ॥

चं०–(सुस्कारा टाकून) गडे, काय सांगूं तुला—

चढला कुठला.

पद. (रतिविलास गंगे० या चालीवर.)

नयनांत ज्याच्या मूर्तीला प्रथमतांच मी
साठविलें ॥ रमणीय मनोहर रूपीं मम
चित्त तल्लिन झालें ॥ भगिनी बसंतासाठीं
मी अतिशयीत वेडी बनलें ॥ सहवास त्याचा
दासीला कधिं घडेल हें मज नकळे ॥ १ ॥

सारिका–गडे, या म्हातारीच्या जाचापुढं तूं म्हणतेस हें कसंग जमणार ? जळांत राहून माशांशीं वैर करून काय उपयोग ? ती म्हणेल तसं मुकाट्यानं तुला कबूल केलं पाहिजे.

चं०–(दुःखानें) गडे सारिके—

पद. (अंधाची यष्टी० या चालीवर.)

तनुविक्रय करण्याहूनी ॥ मरण बरें गमतें
सुजनीं ॥ जिवलगे ॥ प्रसवली कशाला ज-
ननी ॥ हतभागि न मजसम कोणी ॥
जिव० ॥ जन्मतांच मज यमसदनीं ॥ धा-
डिलें न कांगे भगिनी ॥ जिव० ॥ हा
कृतांत । होउनी भ्रांत । कसागे शांत ।
राहिला अजुनी ॥ दैवाची अघटित कर-
णी ॥ जिवलगे ॥ १ ॥

सारिका–(कळवळ्यानें) बाई, तें सारं खरं, पण उपयोग काय ? तिची आज्ञा तुला मान्य केली पाहिजेना ?

चं०–बाई सारिके,–

पद. (निर्लज्जाच्या नयनीं० या चालीवर.)

द्रव्यावरती देउनि दृष्टी धनिकजनांला तुष्ट
कराया ॥ बोध करितसे जननी माझी लाज

कशि न तिज हें सांगाया ॥ नरकामध्यें जाण्याहूनी मजला आज्ञाभंग कराया ॥ मुळिं न वाटते भीति कशी ती उघडपणानें सत्य वदाया ॥ मरणाची मी वाट पाहते परि न काल हा सोडुनि माया ॥ कांगे अजुनी भक्षुनि टाकित नाहीं माझी सुंदर काया ॥ १ ॥

सारिका-गडे, उगीच आपल्या जिवाला दुःख करून घेऊं नकोस. वसंताला तूं एक पत्र लिहून दे; ह्मणजे मी तें हरप्रयत्नानें त्याला नेऊन देईन. माझ्या हातून जें होईल तें तुझ्याकरतां करायला मी कधींही मागं पाय घेणार नाहीं. हँ, आटप लौकर, आई यायच्या आंत हें काम झालं पाहिजे.

चं०-बरं तर तसंच करतें. (पत्रिका लिहून देते.) गडे, प्राण गेला तरी बेहत्तर, पण ही गोष्ट दुसऱ्याजवळ बोलूं नकोस. याबद्दल तेच काय मला निर्लज्ज ह्मणतील ते ह्मणोत.

सारिका-अक्का, तुला या गोष्टीची मुळींच काळजी नको.

चं०-गडे, येवढं माझं काम केलंस ह्मणजे तुला काय पाहिजेल तें देईन.

पद. (जा, जाउनी हरिलागिं० या चालीवर.)

जा पत्रिका दे प्रियकरासी त्वरित नेवोनी ॥ घे त्वरित त्यांच्या मानसींचा हेतु समजोनी ॥ जा अंबिका तुज सुयश देइल मधुर बोलोनी ॥ घे कार्य साधुन दीन भगिनिस वांचवी सुजनीं ॥ तो श्रीहरी मम हेतु पुरविल सतत वरदानीं ॥ १ ॥

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

(स्थळ—एक विश्रांति स्थळ.)

(मदनराव व हेमंत प्रवेश करितात.)

मदन—हेमंता, काय सांगूं तुला ?

पद. (अबला घात करायाला० या चालीवर.)

मनोहर रूप हृदयीं रमलें ॥ ह्मणुनि हे भ्रांत-
चित्त झालें ॥ धृ० ॥ मदनें विकल मला
केलें ॥ ह्मणुनि हें शरिर गलित झालें ॥ १ ॥
सखिला मुदित मनें वरिलें ॥ परि तिनें मु-
ळिं न विलोकियलें ॥ २ ॥ सखिच्या प्राप्ति-
साठिं हें वित्त सर्व गेलें ॥ तरि न किमपि
मज भीति कुणाची तन मन अर्पियलें ॥ ति-
जला संतोषें वरिलें ॥ ३ ॥

हेमंत—मदनराव, तुह्मी धीर सोडूं नका. अहो ह्या वेश्या प्रथम प्रथम असाच तिरस्कार दाखवितात. कारण असा बहुरूपी बहाणा केल्याखेरीज त्यांचें बस्तान जमत नाहीं. अद्याप तुह्मांला बाहेरख्याली माहीत नाहींशी दिसते! अहो ह्या वरकांती नखऱ्यानेंच प्रथमतः मोहपाश घालतात. थैलीची गांठ ढिली सोडा; आणखी मग पहा कशी मौज उडते ती. अहो, जिनें आपल्यासारख्यांचा अपमान केला, तिचा नक्षा उतरलाच पाहिजे. काय सांगूं, त्या दिवशी मला तिचा इतका राग आला होता कीं, बोलून सोय नाहीं. पण करूं काय ? मन जरा घट्ट करावें लागलें हें पहा—

पद. (तातानें ज्याला दिधलें० या चालीवर.)

वश करिन पहा यत्नानें ॥ मी तिजसी कीं
युक्तीनें ॥ बोलुनी मधुर वचनानें ॥ वळ-
वितों पहा पैजेनें ॥ प्रथमता धनाची थैली ॥
मोकळी करावी पहिली ॥ मग पहा कराम-
त सगळी ॥ आशेचा घालुनि फांसा ॥ वश
करितों मी विनयानें ॥ १ ॥

मदन-मित्रा काय सांगू तुला; ती वश होण्याविषयींचे प्रयत्न जर मी ईश्वराच्या सेवेकडे खर्च केले असते, तर साक्षात् भगवंताचें दर्शन झालें असतें. पण याठिकाणीं आपली मति अगदीं थक होऊन गेली ! कारण--

पद. (अमृता टाकुनी असे० या चालीवर.)

मी यत्न करून पाहिलें ॥ परी मन तिचें
मुळीं नच द्रवलें ॥ रागानें झिडकारीलें ॥
जिवलगा ॥ योजिल्या बहुत कुंटिणी ॥ करु-
नि मनधरणी ॥ मध्यस्ती करूनी ॥ परि ती
न पुसे हुंकोनी ॥ जिव० ॥ जाहली फजीती
जनीं ॥ असुनि मी धनी ॥ परी ती मानी ॥
मानिनी मला अवमानी ॥ जिव० ॥ १ ॥

मग कशाकरतां माझा तिला इतका तिट्कारा आला कोण जाणें ! रूप, गुण, ऐश्वर्यसंपन्न मी असतां तिला हलकट वाटतों हा केवढा तिचा अल्लडपणा ! मला वाटतें तिला माणसाची परीक्षाच नाहीं.

हेमंत-आपण म्हणतां तें व्यवहारी अपूर्णांकाचें बरोबर आहे खरें, पण त्यांत एक बेटी गोम आहे.

मदन-ती कसली ?

हेमंत–कसली ह्मणजे थैलीची. राया थैली सोड कीं शेवट गोड.

मदन–(घुटमळल्यासारखें करून) काय करावें नाइलाज आहे.

पद. (हमीर राग० या चालीवर.)

जनकें संपादन केलें ॥ वित्त सर्व हें बहु क-
ष्टानें सुख नच सेवियलें ॥ जनकें संपाद० ॥
धर्म न केला कवडीचाही ॥ द्रव्याशेच्या
गुंतुनि मोहीं ॥ शरीर झिजवीलें ॥ जन० ॥
खर्चायाला हात किं त्याचा ॥ उचलत नव्ह-
ता कथितों साचा ॥ काय करावें कांहिं
सुचेना मन हें गोंधळलें ॥ जन० ॥ १ ॥

हेमंत–ह्मणूनच ह्मणतात कीं, श्रीमंताच्या मुलाला अक्कल कमी असते. माझें मात्र पक्कें असें ह्मणणें नाहींहो. पण मला वाटतें, वरच्या वाक्यांतच कांहीं तरी गोम आहे. असो चला, ही कांहीं पांडित्याची वेळ नव्हे. जिवाचा धडा केल्यावांचून कांहीं होत नसतें. अशा द्रव्यसंचयाला एखादा कालवा फोडल्यावांचून गत्यंतर नाहीं. कारण—

पद. (प्रियबंधु मनोहरराया० या चालीवर.)

धन तलाव तुंबुनि गेला ॥ ह्मणुनियां फोडा
त्याला ॥ युक्तिनें काढुनी नाला ॥ मग
पहाल कांचनमाला ॥ चंद्रिका स्वयें ये-
वोनी ॥ मारील मिठी कवळोनी ॥ मग
व्हाल सुखी या भुवनीं ॥ आज्ञेची पाहिल
वाट । करुनि बहु थाट । प्रीतिची लाट ।
तप्त देहाला ॥ देईल पहा शांतीला ॥ १ ॥

मदन–खरोखर हेमंता, तूं ह्मणतोस हें अगदीं खरें आहे, आतां माझी पक्की खात्री होऊन चुकली. कारण—

पद. (राग झिंजोटी, ताल-त्रिताल.)

वित्ताची देवता ही संचरते त्रिभुवनीं ॥ ज्या-
पाशीं नांदते ही तोच सुखी या जनीं ॥ इंद्रा-
ची अप्सराही आणितसे त्रिभुवनीं ॥ उप-
भोगी जो न ईतें दुर्दैवी तो धनी ॥ १ ॥

कां हेमंता, आतां तुझ्या विचारांचें साम्य झालें कीं नाहीं ?

हेमंत-पाहिलेंत, याकरितां कोणत्याही कामांत गुरु पाहिजे तो अशाचकरतां बरें ! मी सांगतों हें तत्व नेहमीं ध्यानांत ठेवा.

पद. (सातिते देइ सतत तोष० या चालीवर.)

द्रव्याला चलन सदां देउनि घ्यावें सुख तें ॥
सूज्ञाला अधिक असें काय कथूं या परतें ॥
लोभानें सौख्य कधीं मिळत नसे तें नुसतें ॥
चैन सदां घ्या करुनी कां बसतां स्वस्थ रि-
ते ॥ तिळ तिळ आयुष्य पहा दिनरजनीं हें
घटतें ॥ मेल्यावर येइल कां धन सांगातीं
कधिं तें ॥ १ ॥

मदन-(आनंदानें) मित्रा तिची व माझी गांठ पडल्यावर—

पद.

मी प्रथम तिला रागानें ॥ झिडकारिन कीं
गमतीनें ॥ कां मज छळिलें गे झणुनि घट्ट मन
कांहीं वेळ मी करीन रतिसमयीं विनयानें
॥ धृ० ॥ खोटा ॥ अविर्भाव आणुनि मोठा ॥
मग जिरेल सहजचि ताठा ॥ त्या मनरम-
णीचा पाड काय मजपुढती मित्रा अंकित

ठेविन तिजसि निरंतर अति विनयें धन-
लोभानें ॥ १ ॥

हेमंत-(एकीकडे) अगोदरच मिटक्या मारूं नकोस बाबा, लाखों खाक करशील तेव्हांच्या ह्या गोष्टी; अद्याप पुष्कळ अवकाश आहे. (उघड) हो हो, आपण ह्मणतां त्याप्रमाणें करायला कोणची हरकत आहे. असें केल्याशिवाय आपण विनयसंपन्न व गुणी अहांत अशी खात्री झाल्यावांचून कधींही राहणार नाहीं. कारण—

पद. (पूज्यबुद्धिचा दीप० या चालीवर.)

असा मोहरा तिजसि मिळाल्यावरती जगिं
तिज न्यून कोणतें ॥ आळवील मग मुदित
मानसें तुह्मांसारख्या गुणवंतातें ॥ वार-
योषिता धनावांचुनी कधिं नच देती
प्रेमरसातें ॥ सद्बोधातें हृदयीं ठेवा कधिं
नच विसरा या गोष्टीतें ॥ १ ॥

हैं आटपा लौकर. थैलीची व्यवस्था करून तावडतोब गाडी घेऊन माझ्या बिन्हाडीं या. विलंब उपयोगीं नाहीं. आपण येण्याच्या अवधींत मी मुक्ताजींची गांठ घेऊन बीरमंत्रानें भारून ...कतों. मात्र ह्याला रत्नजडित अलंकाराचें अगर रोख रुपयांचें ...णा, देणें दिल्यावांचून मंत्रसिद्धि व्हावयाची नाहीं.

मदन-(कचरल्यासारखें करून) पक्वान्नाचे ढीग पडले आहेत. ... बेटें तोंड रिकामेंच; अशी माझी स्थिति आहे. करूं तरी ...काय !

हेमंत-मदनराव हें पेंड खाऊ घोडें कितीशी मजल मारणार ? ...काय विचार करीत बसलांत. मारे गुप् चुप् धामधूम करून उप-...उपटा केली पाहिजे. रुपयांच्या थैल्या काढून घेऊन त्याच्या ...गीं खुर्यांच्या पिशव्या ठेवाव्या. आजच त्याच्यावर डल्ला न सा

धला तर जवाहीर. तें न साधलें तर मग कुटुंबाच्या दागिन्यां-च्या डब्यावर हल्ला. तिनें घालावयाचे ते ही कां घालीना ? तशां-तून आवडत्या वस्तूनें त्यांचा उपभोग घेतला तर त्यांत कांहीं वावगें नाहीं. अशानें आपला मनराजा जास्तच खुलेल. हूँ चला जा कसे. मी सांगितलेलें नीट ध्यानांत ठेवा. नाहीं तर 'प्रथम ग्रासे मक्षिका पात' व्हावयाचा.

मदन-हेमंता, असें केल्यावांचून कार्यभाग जमणारच नाहीं. एकूण आज कशावर तरी डल्ला मारला पाहिजे अँ ?

हेमंत-आतां विचार करीत बसूं नका. (खिशांतून घड्याळ काढून) हे पाहिलेंत चार वाजले, पैशापेक्षां वेळेचें मोल जास्त असतें. अस्तमान व्हायचाच काय तो अवकाश. मग सर्व रात्र फक्कडांचीच.

मदन-हेमंता, त्याची काळजी नको. हा एक चंद्रहार आणला आहे हा घे. (चंद्रहार देतो) इतक्यानें न भागलें तर मारवा-ड्याला एक लाखाचे पांच लाख लिहून देईन, पण विन्मुख यायचा नाहीं, व बार्णी जाऊं द्यायचा नाहीं.

हेमंत-(हातावर टाळी देऊन) खाशी मदनराव खाशी; असा नेट धरा कीं थेटपर्यंत मजल पोंचून भेट झालीच समजा. पण मदनराव साधेल तितकें घरचेंच साधा. निदानचा मग मारवाडी आहेच. (आपल्याशीं) आतां ह्या चंद्रहारासारखा दुसरा एक हुबेहूब खोटा चंद्रहार करवून तो मुक्ताजीला नेऊन द्यावा, ह्मणजे आयतेच लाख पन्नास हजार घशांत उतरतील; मग खुशाल ढें[कर] द्यावी न् काय.

मदन-करीन तें बेमालूमच करीन. आपण बिलकूल काळजी करूं नका.

हेमंत-(आपल्याशीं) जातां जातां पहिली शिकार साधली की [म]ग पहातों कशी काय गम्मत उडते ती !

प्रवेश २ रा.

(स्थळ–वसंताचें घर.)

(वसंत व त्याची बायको, चाकरमाणसें वगैरे.)

वसंत–जगदीशा, तुझ्या कृपेनें रमेसारखें स्त्रीरत्न मला मिळाल्यामुळें सर्व गोष्टीनें मी अगदीं सुखी आहें.

पद. (हास्यमुखा पाहुनि॰ या चालीवर.)

गृहिणीसम भूषण नच मनुजाला या जगतीं ॥ जगदीशें दिधलि मला रमवाया ही युवती ॥ आनंदी वृत्ति इची हृदया दे सुखशांती ॥ न्यून मला कांहिं नसे या समयीं भूवरती ॥ १ ॥

खरोखर कुलवधूप्रमाणें संसारमार्गदीपिका दुसरी कोणतीच नाहीं. कां रमे, मी ह्मणतों हें खरें कीं खोटें ?

रमा–(लाजून) हें काय बाई ! नांव घेऊन कसलं हाक मारणं ?

वसंत–तें कां, रमा ह्मणायला कांहीं हरकत आहे कीं काय ?

रमा–(हंसत) मला नाहीं बाई कांहीं सांगतां येत.

वसंत–हें पहा, भलत्यासलत्या वेळीं ही लाज अगदीं उपयोगी नाहीं. अग स्त्रीपुरुषाचें नातें केवळ मित्रासारखें आहे. चार मंडळी जमल्यावर मग लज्जा, विनय वगैरेंचा उपयोग करावा. ही तरी आपली रुढी पडून गेली आहे ह्मणून, देशासारखा वेष करावयाचा झालें दुसरें काय ? जगांत एकमेकांला सुखदुःखाचे वाटेकरी आपल्याला दुसरें कोण बरें आहे ? अहाहा ! प्रियेचा सुहास्य वदनेंदू पाहिला कीं मनसिंधूला प्रेमाच्या लहरीवर लहरी येऊं लागतात.

पद. (नसे भीति मुळीं आतां० या चालीवर.)

शशी उपमा तुझ्या वदना किती शोभे पहा
सुमती ॥ कमल जरि तें दिसे नामी तरि न
शोभेच या पुढती ॥ जलाविण तें सुकुनि
जातें सरसिरुह हें पहा जगतीं ॥ शिरींचा
भांग ही सरिता वदन कमलास दे शांती ॥
किती उपमा तरी घेऊं सखे तुझिया मुखा-
वरती ॥ १ ॥

(इतक्यांत वसंतरावाचा गडी धर्माजी येतो.)

धर्माजी–रावसाब, मगापुन एक मुलगी दारामंदी उभी ऱ्हाय-लीया. तिला कां आलियास ह्मनूनशेनी इचारल, पन बोलनाच. लंई लाजाळू हाई बगा.

वसंत–धर्माजी, अरे तिला इकडे घेऊन ये ह्मणजे झालें, विचारायला कशाला पाहिजे ?

(धर्माजी जाऊन सारिकेला घेऊन येतो.)

सारिका–(मोठ्या अदबीनें व लाजून चंद्रिकेची पत्रिका वसंतरावाला देते.)

वसंत–(पत्रिका वाचूं लागतो) ' स्वस्ति श्री विजयीभव '

पद.

वसंतचरणीं प्रेमपत्रिका अर्पण करितें प्रेमा-
नें ॥ पंकीं रुतली अबला धेनू सोडवा तिला
धैर्यानें ॥ धृ० ॥ आजवरी मी दिवस
कंठिले धीर धरोनी कष्टानें ॥ दीन दासिला
कोणि न वाली झुरतें निशिदिनीं दुःखानें ॥
सूज्ञ वसंता चंद्रिकेस या पदरीं घ्यावी

मुदित मनें ॥ चरणीं विनति न केली सखया
धनलोभाच्या आशेनें ॥ १ ॥

आर्या, जरी दुर्दैवानें मी वेश्याकुलांत जन्मलें आहे, तरी विनंतीचा अव्हेर न करितां पदरांत घ्या. केवळ निर्लज्ज होऊन पत्रद्वारें ही मी आपली तनू आपल्याला उघडी करून दाखविली आहे, स्वीकार केलात तर दासीवर फार फार उपकार होतील. नाहींपेक्षां यापुढें जगांत राहण्याची आशा सोडलीच आहे. कमजास्त मजकूर असल्यास क्षमा असावी. चरणीं सादर असो. हे विज्ञप्ति. सूज्ञांना अधिक तें काय लिहूं ?

चरणाची दासी–चंद्रिका.

वसंत–(आश्चर्यानें) कशास कांहीं थांग ना पत्ता, हें आहे तरी काय ? या स्त्रीच्या गुणाची मी प्रख्यती ऐकली आहे खरी, कदाचित् तिला पाहिलीही असेल,पण अर्थाअर्थी संबंध नसतां माझ्याकडे धांव घेण्याचें काय बरें कारण ? प्रिये, हें पत्र वाचून पहा, आणखी तूंच काय तो निकाल कर (पत्र देतो व विचारांत गर्क होतो.)

रमा–प्रियकरा, स्तब्धसे झालांत ? माझ्याकडून या गोष्टीला मुळींच अडथळा यायचा नाहीं. कारण द्रव्याची मुळींच आशा न धरणारी वेश्या ही कुलस्त्रियेच्याच योग्यतेची आहे असें समजलें पाहिजे. आपण सचिंत होऊं नका. ईश्वरानें आपल्या घरींच तिचा शेर नेमला नसेल कशावरून ?

वसंत–(आनंदानें) शाबास रमे शाबास ! तुझ्या सारखी निर्मल मनाची बायको जगांत सांपडणें अगदीं विरळा. एकूण ह्या कामीं तुझें पूर्ण अनुमोदन आहे ह्मणतेस ?

रमा–माझें तर अनुमोदन आहेच आहे, पण आपण जर कां जन–मनलज्जेनें यदाकदाचित् कचरलांत तर ती बिचारी नाहक प्राणाला मुकली ह्मणजे तिचा हेतु पूर्ण करण्यासाठीं आपल्याला पुनर्जन्म घ्यावा लागेल. यासाठीं या जन्मींच काय तें होऊन जाऊं द्या.

वसंत-(रमेला जवळ घेऊन विनयानें) प्रिये, तुला कोठें ठेवूं आणखी कोठें न ठेवूं असें मला झालें आहे.

पद. (राग–कालंगडा, ताल दादरा.)

हृदयिं जरी ठेविन तरी मृदुल न तें प्रियवनि-
ते ॥ नयनिं जरी सांटवीन स्थल नाहीं तुज-
पुरतें ॥ धृ० ॥ मधुर रवें मनरमणी दिन-
रजनीं शांतविते ॥ प्रियसखिला सोडुनि
मज एक पल न राहवतें ॥ तुजसाठीं जन्म
पुन्हां घेइन मी गुणसरिते ॥ यासमयीं कुल-
वंते काय कथूं यापरतें ॥ १ ॥

सारिका—

पद. (प्रियबंधु मनोहर० या चालीवर.

नच मनांत संशय ठेवा ॥ तुह्मिं मान्य करा
विनतीला ॥ निशिदिनीं करोनी सेवा ॥ राहुं
दे चरणिं भागिनीला ॥ जगतांत सुखाचा
ठेवा ॥ आपणाविना नच तिजला ॥ चाल ॥
नच लोभ तिला वित्ताचा ॥ परि असे मात्र
ममतेचा ॥ सन्मान करा विनतीचा ॥ भगिनीनें
धरला ध्यास ॥ जिवाची आस ॥ नाहिं तिज
खास ॥ पहा अबलेला ॥ त्राता न जगीं या
उरला ॥ १ ॥

धर्मांजी-महाराज, ऋद्धि सिद्धि दोन एक झाल्यावर आपनाला कायबी कमती न्हाई व्हनार. (आपल्याशीं) आमच्या वइनीसायबापरमान् एक बायकोबी दुनियेमंदी गवसनार न्हाई लक्ष्मी म्हनत्यात ती हीच बरं. देवा ! या समद्या मानसांसनं तूं सुखी ठ्येव येच हात जोडुनशान् मागनं हाय.

सारिका–महाराज, मला कायतो निरोप द्या आतां. प्रियभगिनी माझी चातकासारखी मार्गप्रतिक्षा करीत बसली असेल.

वसंत–मुली, तुझें नांव काय तें सांगशील का ?

सारिका–महाराज, माझं नांव सारिका.

रमा–लहान वय असून किती तरी मर्यादशील व शहाणी आहे पहा ! बाळे ये अशी बैस. (तिला जवळ घेते.) बाळे तुला खाऊ दिला तर खाशील का ?

सारिका–खाईन, पण मी आल्याचें सार्थक गोड झालं तरच खाईन, नाहीं तर मग नको मला खाऊ.

वसंत–बाळे सारिके—

पद. (राग–वसंत, ताल–त्रिवट)

जा सांग जाउनी सखिला ॥ कोमल मानस
दुखवुं नकोगें हेंच सांगणें हेतू कळला ॥धृ०॥
परिचय नसतां माझ्यावरती ॥ अनुदिनिं
करिते अतिशय प्रीति ॥ आनंदानें तन मन
धन हें अर्पण केलें मी रमणीला ॥ १ ॥

रमे, असंचना ?

रमा–मला कशाला आणखी विचारणं झालं कोण जाणें !

(रमा सारिकेला खाऊ देते व सर्व जातात.)

प्रवेश ३ रा.

(स्थळ–हेमंताचें घर.)

हेमंत–अद्याप मदनराव कां बरें आले नाहींत ? झटलें ह्मणजे

ते इतक्यांत यावेत, मग काय संधान बिघडलें कीं काय ? मुक्ताजीकडून रुकार मिळाल्यासारखें झालेंच आहे ह्मणा; पण आंकडा जरा ढोबळ पडला गेल्यामुळें ' परंतु ' मध्यें येतें. याला काय तोड काढावी ? आपण होऊन एखाद्याच्या घरीं जाणें हा पाजीपणा तर खराच, पण करावें काय ? या वीतभर खळगी करितां मान अपमान गुंडाळून ठेवावा लागतो. असो, चला.

(इतक्यांत मदनराव घाईनें प्रवेश करतात.)

हेमंत–कां मदनराव, काम अगदीं फत्ते ना ?

मदन–आपले कित्तेच तसे आहेत, मग फत्ते कां न होईल ? हें पहा आज घरीं कांहीं फारसा डल्ला साधला नाहीं. फक्त कपाटांत बायकोचा बिंदीबिजोरा होता तेवढा आणला आहे. हा पहा. (दाखवितो.)

हेमंत–जुन्या काळचाच आहे हा. अलीकडची डोळ्यांत भरणारी नोकझोक यांत फारशी दिसत नाहीं. कारण अलीकडे भपक्यालाच कायतो मान आहे. अस्सलाकडे कोणी ढुंकूनसुद्धां पहात नाहींत. कायहो मदनराव, एवढेंच भांडवल ना ?

मदन–हो एवढेंच. याशिवाय माझ्या अंगावरचे अलंकार आहेत लागले तर !

हेमंत–छे, छे, छे, असें उपयोगीं नाहीं. आपल्या अंगावरचे अलंकार तसेच राहूं द्या. तुह्मीं जर कफल्लक दिसलांत तर एक तिची आपल्यावर बसावी तशी प्रीति बसणार नाहीं, आणखी दुसरें, उगीच घरच्या मनुष्यांना संशय आल्यावर मग सर्वच ऑफस् होईल. असें करणें तर अगदींच गैर. भपका तर कायम ठेवला पाहिजे. पोंखरून निघेल तितकें काढा. निदानची मग दुसरी तजवीज.

मदन–हेमंता, गाडी दाराशीं उभी आहे, तेव्हां लौकर चल कसा. हेमंता, हा पोषाख ठीक आहे कीं नाहीं ?

हेमंत-तें काय विचारूं नका मदनराव. पोषाख पाहून तर मी गर्क झालोंच ह्मणा, पण तुमच्याजवळ असलेल्या अत्तरानें मी तर्र झालों आहें. आज मात्र तुह्मीं ऐटबाज दिसता खरे.

मदन-याहीपेक्षां ऐटबाज दिसलों असतों, पण माझा वर्णच बेटा मूळचा काळासांवळा पडला, त्यामुळें मी एकाएकीं कोणाच्या डोळ्यांत भरत नाहीं. रंग गोरा असता तर इतके पैसे देखील खर्चावे लागतेना, पण करूं काय, या ईश्वरदेणगींत फरक करून चालत नाहीं.

हेमंत--अहो नाहीं तर नाहीं चला. पैका भरपूर देणारा असला ह्मणजे मग वेश्यांच्या घरीं इतर सर्व अवगूण लोपून जातात.

मदन-मी येतानां मेवामिठाई, हारगजरे, मोतियाच्या वेण्या पैठणी, शालू सर्व कांहीं आणलें आहे. हें कांहीं तुह्मीं मला सांगितलें नव्हतें, पण मी आपणच होऊन आणलें आहे.

हेमंत-मदनराव जरासें बाहेरख्यालीचें वारें लागूं द्या, कीं आपोआप शहाणे व्हाल.

मदन-मग, आतां मी मूर्ख आहे कीं काय ?

हेमंत-छे, छे, असें आपणाला ह्मणण्याची कोणाची छाती आहे ? (एकीकडे) कानच जरासे ब्रह्मदेवानें आंखूड केले आहेत, नाहीं तर लंबकर्णाच्याही पलीकडे आपली योग्यता आहे. (उघड) हें, चला तर मदनराव आतां. हें पहा, वेळ आली तर अगांवरचे दागिने ठेवावे लागतील बरें.

मदन-दागिनेसेच काय हा प्राण मागितला तरी देईन; पण एकदां-(हातावर टाळी देतो) . अर्तेपर्ते लाख काय नू दोन लाख काय, माझ्या मनाजोगें झालें तर घर धुवून टाकीन पण बाणी जाऊं देणार नाहीं.

हेमंत-निश्चयाचें फळ ईश्वर देईलच देईल. चला, वेळ टळूं देतां उपयोगी नाहीं. जिथें तिथें हिला संभाळावी लागते ह्मणा 'शुभं करोति' नू काय— (दोघे जातात.)

प्रवेश ४ था.

(स्थळ-चंद्रिकेचें घर.)

(चंद्रिका, मुक्ताजी, सारिका वगैरे मंडळी व इतर चाकरमाणसें इत्यादि.)

मुक्ताजी-चंद्रे, अशी बेफाम होऊं नकोस बरं. अग फळाला पाड वरचेवर येत नसतो बरं. अनायासं लक्ष्मी घरांत चालून येत असतां तूं तिला लाथेनं झिडकारतेस हें कांहीं चांगलं करीत नाहींस. अग तुला सुख होऊन मला जर नफा होत आहे, तर या गोष्टीच्या आड तूं कां बरं येतेस ?

चंद्रिका—

पद. (बालमहातने० या चालीवर.)

सोडुनि लाज झिजवुं कशी तनुला ॥ माते गे ॥ निर्मल अंतरीं राहुंदे जगीं मला ॥ ॥ सोडुनि ॥ केलें धनें बघ किती अंध तुला ॥ काय ह्मणूं तरि यापुढें आतां तुला ॥ ॥ सोडुनि ॥ १ ॥

मुक्ताजी-हें पहा, पैशापुढें या तुझ्या बोलण्याची मला कांहीं किंमत वाटत नाहीं.

चं०-आई, तूं ह्मणतेस तें सर्व खरें पण-

पद. (कटी लंगोटा० या चालीवर.)

निर्मल काया ॥ वाटते लाज दावाया ॥ वित्ताहूनी मन लज्जेचें ॥ भूषण वाटे जगतीं साचें ॥ हाल करोनी या शरिराचे ॥ साधन करूं कांगे नरकाचें ॥ सोडुनि माया ॥ भ[illegible]जसि कां कोमल काया ॥ १ ॥

मुक्ताजी-(रागानें) कारटे, अग मी तुला लहानाची मोठी केली आहे, तर माझं ह्मणणं बिलकुल न ऐकतां मला उलट तूंच बोध करतेस अँ ?

पद. (प्रेमशृंखला घालुनि० या चालीवर.)

लाज कशी नच वाटे तुजला मजला दुष्टे
बोध कराया ॥ तोंड फोडुन टाकिन ठाउक
नाहिं शरम कां बोलाया ॥ लहान तोंडीं
घांस मोठा घेसी कांगे ओकाया ॥ फिरुन
असें जर बोलशील तर काढुन टाकिन
नयनां या ॥ दारोदारीं तुजला लाविन कुलटे
भिक्षा मागाया ॥ हड्डी हड्डी नरम करोनी
देइन नंतर यमराया ॥ १ ॥

चंद्रिका-अग, केवळ द्रव्यलोभावर दृष्टि देऊन माझ्या जन्माचें मातेरं कां करतेस ? माझं ह्मणणं पुरतेपणीं ऐकून घे नि मग तुला वाटेल तसं कर.

पद. (प्रेमपाशिं या० चालीवर.)

धनवंताहुनि गुणवंताला मान आधिक तो सु-
जनीं ॥ जननी ॥ विचार करुनी मनिं
आपुल्या तूं सांग खरें तें मजसी ॥ जननी ॥
वृद्धपणानें भ्रष्ट मती तव गेली होवोनी ॥
॥ अशि कां ॥ अंतीं जाशिल रवरव नरकीं
खचितचि यमसदनीं ॥ जननी ॥ अन्नवस्त्र
मी देईन तुजला निर्मल राहोनी ॥ जननी ॥
लोभ सर्व हा सोडुनि देई राम राम ह्मणुनी ॥
जननी ॥ १ ॥

मुक्ताजी-मोठी आली धर्मशास्त्र सांगायला. आजपर्यंत तुझ्या-

करितां जे हजारों रुपये पुढच्या आशेवर लक्ष देऊन खर्च केले, ते कांहीं मोक्षसाधनाकरितां नव्हे समजलीस ? माझ्या पुढं असले तेगारे लावूं नकोस.

पद. (नृपशिक्षेची० या चालीवर.

ठेंचुन टाकिन माहित नाहीं । पुढला विचार आपुला पाहीं ॥ माजलीस तूं ह्मणुनी कां ही। बड बड तूं करिसी दुष्टे ।। आजवरी तव संगोपन मी। केलें तें स्मरगे कांहीं॥ करिसी माझा पाणउतारा । विसरलीस गे कशि उपकारा ॥ अनाथ ह्मणुनि तुज दिधला थारा । कृतघ्न तूं अससी दुष्टे ॥ पाहिन आतां कोण तुला तो । देइल गे जगतीं थारा ॥ १ ॥

चं०—

पद. (राम करी जरी० या चालीवर.)

जननि नससि तूं पूर्वजन्मीची । वैरिणि माझी अससी साची । ह्मणुनी तुजला भूतदयेची । पर्वा नच ठावी ॥ धनवानाहुनि गुणवंतातें । मानमान्यता देती बुध ते । आत्महितास्तव लोटिसि माते । दुःखार्णविं कांगे ॥ धृ० ॥ द्रव्यासाठीं सोडुनि लज्जा । मजसंगें कां करिसी कज्जा । उडविन तूझा क्षणांत फज्जा । राक्षसिणी आतां ॥ १ ॥

मुक्ताजी—राक्षसीण ह्मण अगर डाकीण ह्मण; पण मी माझ्या मताप्रमाणं तुझ्याकडून कृति घडवीन तरच राहीन. ह्मणे, गुणवानाला मान जास्त असतो. त्यांच्याजवळून कां चिंचुके ध्यावयाचे ? धनवानाशीं न् गुणवानाशीं तुला काय करावयाचं आहे ? जो पैसे देईल तो आपला यजमान.

चंद्रिका–(रागानें) अग जा. मी तुझी कोण न् तूं माझी कोण ! थेरडे, तुला लाज नाहींग वाटत मला अशा गोष्टी सांगायला ? फिरून असं बोल तर खरी कीं बत्तिशी न बत्तिशी हालवून सोडतें बघ. तुझा माझा संबंध काय ?

मुक्ताजी–काय ह्मणतेस, संबंध काय ? पाठीवर सणसणीत चाबूक ओढीन त्यावेळीं समजेल संबंध काय तो; भल्या जंगी लठ्याच्या स्वाधीन करून मुळींच जगांतून नाहींशी करून टाकीन. ठाऊक नाहीं वाटतं ? इंगा फिरेल त्यावेळीं समजेल सुख.

चंद्रिका–(संतापानें लाल होऊन) मार पाहूं कशी मारतेस ती चाबूक ? तोच चाबूक घेऊन पाठीची चामडी न् चामडी लोळवीन ठाऊक नाहीं. लांबून कशाला वटवट करतेस ? ये अशी पुढं ये, मग दाखवितें कसा काय सपाटा आहे तो.

मुक्ताजी–(चंद्रिकेच्या आंगावर खेंकसून येते) काय करूं, चाबूक नाहीं तर नाहीं, पण मेली काठी देखील कुठं दिसत नाहीं. कारटीला होती कीं नव्हती करून टाकली असती.

चं०–(त्वेषानें)–

पद. (कोण येतो तो पहातो० या चालीवर.)

पुढति येई वल्गना कां करिसि लांबोनी ॥
नससि जननी दिससि नयनां खचित डाकी-
णी ॥ भारुनी तुज टाकितें बघ मंत्र घालो-
नी ॥ थू तुझ्या या आग लागो वाणिला
सुजनीं ॥ १ ॥

मुक्ताजी–(चरफडून) पहातें आतां कोण मंत्र घालते ती, (इकडे तिकडे पाहून) बाबल्या अरे बाबल्या (बाबल्या येतो) हें घे टाळं आणखी मोठ्या दरवाजाला नेऊन घाल. फक्त हेमंतराव आले तर त्यांना आंत घे. जर विसरशील अगर दुसऱ्याच्या हातांत चाव्या देशील तर पाय मोडून टाकीन बघ. ती कारटी

सारिट्ली कुठं दिसत नाहीं इथं. ती देखील आतांशा बरीच उंडगी झालीशी दिसतें, पुढें येऊं दे तर खरी कीं तिचीही पण चांगली वासलाद लावून टाकतें. अंगाचा कसा तिळपापड होऊन गेला आहे. त्या मदनरावाकडून हिची खोड मोडीन तरच राहीन. (तरफडत निघून जाते.)

चं०–(दुःखाचा सुस्कारा टाकून) देवा ! यापुढं माझी अवस्था तरी काय होणार ? सारिका वसंतरावांकडून निरोप घेऊन आली होती खरी, पण या थेरडीच्या कटकटीनं ती कुठं गेली नकळे, जवळ असती तर वसंतरावांकडे तरी पाठविली असती. पण मेलं माझं दैव पहा किती वक्र आहे तें ! असो, ईश्वरा तुला काळजी.

पद. (वेषाचें सार्थक० या चालीवर.)

रक्ष रक्ष रक्ष रक्ष गौरिशंकरा ॥ तुजविण
मज नाहिं पहा जगतिं आसरा । साह्वे न
डाकिणिचा त्रास मज हरा ॥ दुहितेची लाज
मनीं ठेवि तूं जरा ॥ अति दुःखें तरुणपणीं
येउनी जरा ॥ हाल करुन नेइल ही अंतिं
यम पुरा ॥ शरण तुला येउन मी जोडितें
करा ॥ प्रिय वसंत संगतिचा लाभ दे
खरा ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

अंक २ रा समाप्त.

(वसंत निजला असतां एकाएकीं जागा होतो.)

वसंत-(आश्चर्यानें) मला वाटतें, यावेळीं पडलेलें स्वप्न अगदीं खरें असावें, यांत बिलकुल संशय नाहीं. कारण माझ्या प्रियेवर दुःखाचा मोठा कहर गुजरून ती परमेश्वराजवळ धांवा करून माझें चिंतन करीत आहे असें दिसलें. असेल, असेंही खरें नसेल कशावरून ? वेश्या धनलोभाच्या आशेनें काय करितील याचा बिलकूल नेम नसतो असें जें ह्मणतात तें अगदीं खरें असावें. असो, एकूण परमेश्वराच्याच मनांत तिचा व माझा समागम घडावा असें दिसतें तर; तशांतून माझ्या प्रियेनें देखील शुद्धांतः करणानें या कामीं मला रुकार दिला, तेव्हां हा केवढा बरें तिच्या मनाचा मोठेपणा !

पद (भव्य नदी वा जलधी० या चालीवर.)

जान्हवि सम शुद्ध असे रमणी मन मजविषयीं ॥
मजसाठीं निर्मियली विधिनें युवती विनयी ॥
संगम हा हृदयंगम होइल गमते हृदयीं ॥
स्वप्न मला शुभ पडलें ईशदयें या समयीं ॥ १ ॥

असो ती संकटांतून पार कशी पडेल ह्या गोष्टीचा प्रथम विचार केला पाहिजे. माझा मित्र मारुत जर यावेळीं येथें असता तर तो

मारुत–मित्रा असें तर खरेंच. कांहीं तरी कागाळी केल्यावांचून तिला आपले घरीं आणून ठेवणें, ही गोष्ट शिष्टसांप्रदायाला अनुसरून नाहीं. तूं सांगितल्याप्रमाणें कोतवालाला मी वर्दी दिली; व त्यानेंही या गोष्टीची नोंद करून ठेविली आहे. कदाचित् आलाच तसा प्रसंग तर आपल्याजवळ पुरावा आहेच. मग आपण होऊन खाजवून खरूज कशाला काढा? वेळ मात्र येऊं दे, कीं मग पहा कशी मजा उडवून देतों ती. आतांशा तो मेषपात्री मदन तिच्या नादीं असल्याबद्दलचें मला पक्कें समजलें आहे. असेल कदाचित् ही गोष्ट खरी असेल, कारण तो देखील उल्लूचाच पठ्ठा आहे. लाख दोन लाख रुपये खर्चायला ती स्वारी मागें पुढें पहाणारी नाहीं. आणखी तशांतून जर कां गांवगुंड मंडळीची न् याची संगती जमली असेल, तर मग ते याला पुरा खड्ड्यांत आणतील.

(इतक्यांत सारिका लगबगीनें प्रवेश करिते.)

वसंत–बाळे सारिके, तूं अशी कावरीबावरीशी दिसतेस ? कांहीं कमज्यास्त असेल तर सांग.

पद. (जाउनी हरिलागिं तूं० या चालीवर.

सारिकेगे चंद्रिकेचें कुशल आहेना ॥ सांग
मनिं नच गुप्त ठेवी क्षेम आहेना ॥ राग
माझ्याविषयिं तीच्या हृदयिं नाहींना ॥ सा-
रिके तव मधुर रव ते श्रवणीं पडुं देना ॥
चंद्रिकेनें काय ह्मणुनी धाडिलें सदना ॥
सारिके तव वृत्ति बघुनी व्यसनिं बुडतोंना ॥

सारिका–महाराज,—

पद. (झाला उदय मनादय या० चालीवर.)

भगिनी माझी रमणी आपुली ॥ दुःखार्ण-
विं कीं बुडुनी गेली ॥ तुह्मांवांचुनी तिजला

जगतीं कोणी नच वाली ॥ खाटिका करीं धेनु
गवसुनी शोकाकुल झाली ॥ धृ० ॥ आपणां-
वांचुन तिजला जगतीं ॥ आस न दुसरी
कसली मनिं ती ॥ चातकापरी चिंतन करिते
आर्या तुमचें ती ॥ बा वसंतका आकांत जा-
हला सदनीं ॥ चलरे चल सबळी ॥ १ ॥

महाराज, तिची जर आपल्याला कांहीं कळकळ असेल तर आतांच्या आतां मजबरोबर चला; कारण ह्यातारी आज तिचा द्रव्यलोभाच्या आशेनं शेवट करणार असं दिसतं. आतां माझ्यानं तिच्या स्थितीचें वर्णन करवत नाहीं! आज बरेचसे पैसे घेऊन आई माझ्या आक्काला जुलमानं दुसऱ्याच्या स्वाधीन करणार अशी मला गुणगुण समजली आहे; तर वसंतराव, आतां क्षणाचाही विलंब लावूं नका.

वसंत–बाळे सारिके, तूं या गोष्टीबद्दल अगदी दुःख मानूं नकोस.

पद. (धमार.)

अरिकरांतुनि सोडवितों झडकरी तुज चंद्रिके॥
न करि चिंता किमपि मनिं तूं ऐक वचना
सारिके ॥ धूळधाणी करुनि अरिची उडवितों
बघ मस्तकें ॥ नरहरीचें नांव घेऊनि जिं-
कितों बघ कौतुकें ॥ १ ॥

(सर्व जातात.)

प्रवेश २ रा.

(मुक्ताजी, हेमंत, मदन बसलेले आहेत.)

हेमंत–(मुक्ताजीला उद्देशून) मुक्ताजी हें पहा. कूळ मोठें

खमंग आहे. एकदम बोजा लादूं नका. ऊंसारखा पिळून तर घ्यावयाचाच; पण न दुखवितां घ्यायचा. हा रत्नजडित चंद्रहार कमींत कमी पाऊण लाखाला एक पै कमती पडायची नाहीं. (चंद्रहार दखवितो व आपल्याशीं) नारायण शेटजीचें कसब तरी किती नामी पहा. अस्सल बरहुकूम नकल केली खरी. ह्मातारे, हा चार सहा महिन्यांचा वर वर भपका आहे बरें. पुढें खापर-खुंळ्याच. (उघड) कां पसंत पडली कीं नाहीं वस्तु ?

मुक्ताजी-(गुटमळत) बाकीचे पंचवीस हजार आल्याखेरीज रुकाराला थोडासा अवधी आहे.

हेमंत-हूं पहा मुक्ताजी, ज्यानें पहिल्याप्रथम एवढी छाती केली, त्याला पंचवीस हजार ह्मणजे तळहाताचा मळ आहे. काळजी कां करतां ?

मुक्ताजी-होय, आपण ह्मणतां तें खरं, पण ह्मणतात ना कीं ' लांचलूच दक्षणा । देईजे तत्क्षणा. '

हेमंत-एवढ्यानेंच काय झालें आहे. पैशाचा ढीग आपल्या पुढें टेवीन. एकदमच आशेचें तोंड पसरूं नका.

मदन-(मध्येंच) कां हेमंता, तेवढ्या वस्तूनें समाधान होत नाहीं का ? नसेल होत तर आणखी आपल्यापाशीं जास्त तयारी आहे. पण ' नग्नाचा पाडा उपयोगीं नाहीं. ' (हेमंत त्याला चूप बैस अशी खूण करतो.)

हेमंत-(एकीकडे) गाढवाला आणखी विशेषण काय द्यायचें; (उघड) हें मुक्ताजी, येऊं दे एकदांचा रुकार. असं टळं करूं लागलांत तर हा बेटा उगीच शेंडींत राख घालील ह्मणून ह्मणतों.

मुक्ताजी-बाकीच्या भरपाईची जोखीम तुह्मी घेतां ?

हेमंत-आपल्याकडून एका पायावर तयारी. (आपल्याशी) थेरडे, पुन्हां कशाला मी तुझ्या घराची पायरी चढतों. बोल-ण्यांत रेलचेल कमी कां करा. तुझ्यासारख्या बदमाष, हलकट,

द्रव्यलोभी थेरडीच्या हातावर अशाच तुरी दिल्या पाहिजेत. आपलें पोट भरलें, आतां जास्त हाव धरण्यांत अर्थ नाहीं.

मुक्ताजी-असं असेल तर कांहीं हरकत नाहीं. चला तर मग आपण इकडूनच जाऊं.

हेमंत-(नेत्रसंकेत करून) मदनराव, मी जरा बाहेर जाऊन येतों.

(मुक्ताजी व हेमंत जातात.)

मदन-(हर्षभरीत होऊन) अहाहा ! एकूण आज माझ्या मनोरथावर कळस चढणार तर जिच्याकरितां रात्रंदिवस हा देह तप्त होत होता, त्याचें आज शांतवन होणार म्हणून मला केवढा आनंद झाला म्हणून सांगूं ! मना घे मौज मारून न् काय !(ऐटीनें इकडे तिकडे पहातो.)

(इतक्यांत चंद्रिका प्रवेश करिते.)

चं०-सारिकेला जाऊन बराच वेळ झाला, पण अद्याप ती इकडे आल्यावांचून कशी राहिली ? काय असेल तें ईश्वर जाणें. (मदनरावाला पाहून चपापते) अग थेरडे इथपर्यंत तूं आपल्या अकलेची मजल पोंचवलीसना ? खरोखर अशाच दहा पांच थेरड्या एकत्र जमल्या कीं, सगळा गांव व्यभिचारानें भरून जाईल ! असो, दैवावर हवाला ठेवून स्वस्थ बसलं पाहिजे.

मदन-(आतुरतेनें)

पद. (सकल सुखाचें० या चालीवर.)

सुहास्यवदनें चंचलनयनें अवलोकुनि वद-
ना ॥ स्फुरण अतीशय चढत असेगे आंवरूं
किति मदना ॥ अति रागानें पोळवूं नको
कोमल मन सुमना ॥ श्रवण करूं दे या दा-
साला मधुर तुझ्या वचना ॥ १ ॥

(लंपट होऊन) लाडके, अशी रागानें कां बरें पहातेस ? हें पहा, तुला अशी पाहिली कीं, माझ्या आंगाला कंप सुटतोग. एकदां तरी हंसून माझ्याशीं बोल, ह्मणजे माझ्या मनाला धीर येईल.

चंद्रिका-(संतापानें)—

पद. (झंपा.)

आग लागो तुझ्या वाणिला रे खला ॥ सम-
जसी कां मनीं बटिक मजला ॥ धृ० ॥
निर्बल्या जीभ ही आंवरोनी धरी ॥ दांत
पडतील रे ह्मणुनी तुजला ॥ प्रथमतां निक्षुनी
सांगतें ॥ येथुनी जाइरे भ्रम तुला खचित
झाला ॥ १ ॥

अरे, स्वतःच्या गृहिणीसुखावर लाथ मारून विकतच्या प्रेमाची आशा धरतोस, यावरून तुला कवडीचीही अक्कल नाहीं असं ह्मणण्याला कोणती हरकत आहे ?

मदन-अग [illegible]णोगें तें सख असतें [illegible] मग आगांतुका-प्रमाणें निर्लज्जासारखा तुझ्या घरीं आलोंच नसतों. माझा तुला इतका तिटकारा कां बरें ? मनाप्रमाणें वागल्यावर तुझें तिळभर देखिल उणें पडूं देणार नाहीं. ह्मणशील तितके दागिने, जे मागशील ते कपडे व इतर ऐषआरामाच्या वस्तु चहाशील त्या देण्याला तयार असतां मला पाहिल्याबरोबर कपाळाला आंठ्या कां बरें घालतेस ? (आर्जवानें)-

पद. (परमेश तुझा सहाकारी० या चालीवर.)

वद काय तुझा मी केला ॥ अपराध कथी तो
मजला ॥ तन-मन-धन हें तुजसि अर्पिलें येइ
न द्रव कां हृदयाला ॥ तिळ तिळ तुटे जीव
सुंदरी सोडी निष्ठुरतेला ॥ धृ० ॥ तव रूपीं

मन जडुनी गेलें ह्मणुनी काम हा संचरला ॥
मारुन टाकी मुद्‌ती यातें देउनि रतिसौ-
ख्याला ॥ १ ॥

चंद्रिका-(रागानें)—

पद. (राम करी जरि० या चालीवर.)

आग लाव जा तव वित्ताला ॥ क्षोभवूं नको
मम पित्ताला ॥ भ्रांतचित्त तव झालें ह्मणुनी
आंवरि रसनेला ॥ मोल देउनी जो प्रीतीची ॥
कांक्षा धरितो त्या सौख्याची ॥ प्राप्ती कधिंहि
होत न साची सोडी नादाला ॥ १ ॥

मदन-नाद सुटत नाहीं त्याला कसें करूं ?

चं०-(रागानें)—

पद. (मोरी नयननु नूमे० या चालीवर.)

मम पित्त पहा तव मुख बघुनिच अतिशय
उसळतसे ॥ मूर्ख धनिक नर तुज सम न
जनीं ॥ शरम तुला कैशी मुळींच नसे ॥
मम मन तुजवर जडत नसे ॥ १ ॥

मदन-—

पद. (मै गाती आती लचक लचक० या चालीवर.)

मी दास तुझा सतत खचित झालों ॥ रूप
तुझें बघुनी मोहुनी गेलों ॥ लाल नयन बघ
किती तरी झाले ॥ १ ॥

चं०-

वृथा करिसि कां तूं मन धरणी ॥ शरम तुला कैशी ॥

(लाथ मारते.)

मदन–

मनोरथ सफल करिंगे आतां ॥
पुष्पासम लागती मज ह्या लाथा ॥
म्लान वदन बघ मम झालें ॥ १ ॥

अग, हजारों रुपये तुझ्यासाठीं खर्च करून वर मला लाथानें झुगारतेस हा कुठला न्याय ? मुक्ताजी, अहो इकडे या. तुमच्या घरीं आलों याचेंच कां हें प्रायश्चित्त ?

चंद्रिका–तुझ्यासारख्याला नुसत्या लाथा देऊनच उपयोगीं नाहींत, वर आणखी जोडे दिले तरी कमीच होतील.

मदन–असें काय ? आतां मी जोडे खातों कां तुला खावे लागतील हें लौकरच समजेल.

चंद्रिका–मेल्या मला जोडे मारायला तुझा प्रपितामह आला पाहिजे.

(इतक्यांत मुक्ताजी व हेमंत येतात.)

मदन–मुक्ताजी, ही तुमची रीत काहो ? तुमच्या घरीं आलों ह्मणून जोड्यापलीकडे माझी योग्यता झाली कीं काय? बघतां काय? आणा माझा चंद्रहार इथें हिच्या लाथा खाण्यापेक्षां दुसरीकडे शेण खाल्लेलें काय वाईट ? बस्स आणा चंद्रहार.

मुक्ताजी–मदनराव, असे उतावीळ होऊं नका. तुमच्या चंद्रहाराची जोखीम माझ्यावर आहेना ?

मदन-तुमच्याजवळ असून मला काय उपयोग ?

मुक्ताजी–चंद्रे, अशी बेफाम होऊं नकोस अँ. अजून तरी विचार कर. ज्यांचा मी दाम घेतला त्याचं काम मला केलं पाहिजे.

चं०–थेरडे, तूंच कर त्याचं काम. माझा निश्चय मी प्राण गेला तरी सोडणार नाहीं.

मुक्ताजी-असं काय ? मदनराव हिच्या जिवाला मात्र धक्का लावूं नका, बाकी आजपासूनं इच्यावर तुमची मालकी. आतां काय पाहिजे तें करण्याला तुह्मी मुखत्यार आहांत.

मदन-हेमंतराव, चांगलें आह्माला फसिवलेंत. मधल्यामधेंच पैसे चावून आपण नामानिराळेंच.

पद. (राग-हमीर, ताल-त्रिताल.)

लाखों रुपये उधळीले ॥ तव नादानें आज-
वरी मी वांया ते गेले ॥ धृ० ॥ पालथ्या घ-
ड्यावरती पाणी ॥ ओतुनि फसलों फुकट या
क्षणीं ॥ फजित मला केलें ॥ कां रे ॥ १ ॥
सगे करिति हे दगे भूवरी ॥ भरंवसा नसे
यांचा तिळभरी ॥ होतें तें गेलें जवळचें ॥२॥

हेमंत-मदनराव, तुह्मा मला कां ह्मणून दूषणें देतां ? ही कांहीं तुमच्या ह्मणण्याकडे लक्ष देत नाहीं, मग कां उगीच आर्जव करतां ? मी सांगतों इकडे लक्ष द्या.

पद. (खोटी तुजवर ती नृप० या चालीवर.)

बधिरापुढती सुंदर गायन ॥ अथवा अंधापु-
ढती नर्तन ॥ करुनी लाभ न होतो ह्मणुनी
जाऊं सदनाला ॥ फुकट फजीती करुन क-
शाला ॥ घेतां आतां या समयाला ॥ येथें
बसण्यापेक्षां द्यावी शांती गृहिणीला ॥ १ ॥

आणंखी ही गोष्ट रुचत नसेल तर—

साकी.

इच्याहुनी मी तुला फाकडी गांठुन देतों आतां ॥

जें होणें तें होऊनि गेलें न करीं किमपी चिंता ॥
युक्त्या किति नामी । सुचती मजला या कार्मीं ॥ १ ॥

मदन–चोरा, माझे पैसे खाऊन माझीच उलट समजूत घालतोस कां ?

हेमंत–असे काय मला लाख पन्नास हजार रुपये दिलेस ? लेका तुझ्या आंगांत पाणी कोठें आहे ? ज्याला बायकांचें मन वळवितां येत नाहीं तो पुरुष कसला ?

मदन- मी आपले पैसे चामडीन् चामडी लोळवून वसूल करीन, ठाउक नाहीं वाटतें ?

हेमंत–येथें कोणाची ना आहे ? तूं ज्याला दिलेस त्याच्याकडून उगवून घे.

मदन–उगवून घेतल्यावांचून सोडीन कीं काय ?

हेमंत–तरी प्रायश्चित्त लौकर मिळालें ह्मणून बरें झालें. नाहीं [illegible] पेक्षां, धुतल्या तांदुळासारखा शुद्ध झाला असतास.

मदन–(चंद्रिकेला ओढावयास लागतो तों ती तोंडांत मारते व मोठ्यानें ओरडून) ओ ओ ओ. थोबाड फुटलें किंहो मुक्ताजी.

हेमंत–(आपल्याशीं) त्याची बरोबर बत्तिशी नाहींना फुटली ?

मुक्ताजी–(चंद्रिकेच्या आंगावर खवळून जाते) कारटे, बेफाम झालीस अँ. मदनराव, बांधा रांडेच्या मुसक्या न् न्या गाडींत घालून कुठें तरी. (चंद्रिकेशीं झोंबाझोंबी करतात.)

हेमंत–(मध्येंच) काय हा पोरखेळ ! त्यांची खुषी नसली तर तुह्मीं जबरी करून काय होणार ? मदनरावांचा चंद्रहार देऊन कटकट मिटवून टाका ह्मणजे झालें. उगीच बाचाबाची करण्यांत अर्थ काय ?

मुक्ताजी–(रागानें) हेमंतराव, तुमची मध्यें शिष्टाई नको आहे. ह्या कारटीची चामडी न् चामडी लोळवीन तेव्हांच सोडीन.

चंद्रहार घेतला तो परत देण्याकरितां नव्हे. निदान त्याच्या भारंभार इच्या मांसाचा लचका तोडीन तेव्हांच राहीन.

(चंद्रिकेला मदन व मुक्ताजी मारूं लागतात व हेमंतराव चंद्रिकेला सोडविण्याचा प्रयत्न करतो.)

चं०–(शोकाकुल होऊन)

पद. (किती होसि उताविळ० या चालीवर.)

नका छळूं मज आतां बहुत शिणलें ॥ शक्ती
नाहीं बोलायाला ओंठ कीं सुकले ॥ अंतीं
वसंता मुखीं घालरे पाणी येवोनी ॥ तव
पदीं मम मन सतत रमलें ॥ १ ॥

(इतक्यांत वसंत, त्याचा मित्र व सारिका प्रवेश करितात.)

वसंत–(आवेशानें)–

पद. (झंपा.)

व्हा दूर व्हा दूर नातारि करिन ठार ॥ खाऊं
नका मार फुकट तुह्मि अनिवार ॥ ध्रु० ॥
कांते मनिं न ठेवि भीति अरीची ॥ पाही
वसंतास शंका कुणाची ॥ माझ्या सवें येइ
सदनीं रहायास ॥ अर्धांगिचा आज घडला
सुसहवास ॥ सुदति तुला साह्य जगदीश जगतांत ॥ आतां तुला खचित होईल सुख
फार ॥ १ ॥

हेमंत–(आपल्याशीं एकीकडे) आतां येथें बसण्यांत अर्थ नाहीं. मिळालें तेवढें जन्मभर पुरेल. नवरा मरो नवरी मरो; दक्षणा हातांत पडली.

(मदन चोरासारखा कोपऱ्यांत लपतो.)

मुक्ताजी–अहो भले गृहस्थ, आमच्या घरगुती गोष्टींत तुह्मी काय ह्मणून पडलांत ? भल्या गोष्टीनें चालते व्हा. नाहींपेक्षां मला कायद्याप्रमाणं तजवीज करणं भाग पडेल.

मारुत–अग जा थेरडे, कायदा कोळून पी जा. जर जास्त गडबड करशील तर इथल्याइथें गाडून टाकीन.

मुक्ताजी–(रागानं) कोणरे मेल्या तूं मला गाडणार ? सारिके, जागे जा लौकर चावडीवरून शिपाई घेऊन ये. मेल्यानं फार तोरा लावला आहे.

मारुत– बुड्ढे तूं गप्प बसलीस तर ठीक आहे, नाहींपेक्षां मला तृतिय पंथ करावा लागेल.

मुक्ताजी–(मोठ्यानें आक्रोश करून) अहो धांवा हो धांवा, हे चांडाळ माझे कसे हाल करताहेत, हे पहाल तर खरे.

चं०–त्या थेरडीच्या तोंडांत चांगलासा बोळा घाला, ह्मणजे तिची बडबड कमी होईल, नाहीं तर ती ओरडून आकाश पाताळ एक करील. (मुक्ताजी धाकानें गप् बसते.)

वसंत–प्रिये, चल आटप लौकर. मारुता तूं गाडी घेऊन ये जा. प्रिये, चांगली सावध झालीसना ?

चं०–मृताच्या मुखांत अमृत पडल्यावर तो कां न सावध होईल ?

वसंत–

पद. (राग वसंत.)

ईशा तूं असति ह्मणुनि जगत सतत फिरतसे
निश्चल हें नियमानें ॥ धृ० ॥ अबला-प्राणा
हरण कराया टपले होते अरि सर्व हि ते हत-
बल झाले तव मायेनें ॥ १ ॥ भूतळावरी अ-
संख्य घडती हत्त्या किति तरि धनलो-
भानें ॥ २ ॥

(मुक्ताजीला उद्देशून) वृद्धबाई, तुह्मी पोक्त आहांत. मी तुह्मा-ला सांगावें असें कांहीं नाहीं. वृद्धपणीं राम राम ह्मणून स्वस्थ बसा. मी तुह्मांला मोठ्या आनंदानें अन्न वस्त्र देईन.

मुक्ताजी–आग लावा तुमच्या अन्नवस्त्राला; एक कार्टी मेलीच असें समजेन.

चं०–मनुष्याला भिकेचे डोहाळे आठवले ह्मणचे असंच व्हावयाचं.

(इतक्यांत मारुत प्रवेश करतो.)

मारुत–वसंतराव, गाडी दाराशीं उभी आहे. चला लौकर.

वसंत-प्रिये, घे ह्मातारीचा निरोप आणि चल.

चं०–(तिरस्कारानें) मी कशाला घेऊं थेरडीचा निरोप. तिचा व माझा आतां काय संबंध राहिला ? बसूद्या अशीच तिला रडत. चलग सारिके मजबरोबर.

मुक्ताजी–खबरदार कारटे तिजबरोबर जाशील तर !

सारिका–मी नाहीं इथें राहायची जा. जिकडे अक्का तिकडे मी.

मुक्ताजी–(वसंतरावाला उद्देशून) तुह्मीं माझ्या मताखेरीज यांना नेतां खरे, पण संभाळून असाहो, रीतीप्रमाणें मला सरकारदरबार करावा लागेल.

वसंत–फार चांगली गोष्ट आहे. असें झालें तर सोन्याहून पिवळें होईल.

(वसंत, सारिका, चंद्रिका वगैरे जातात.)

मदन–मुक्ताजी आमच्या जिनसाची काय वाट ? आदराति-थ्यही नाहीं व भोजनही नाहीं. उलट जवळचें सर्व जाऊन आंगभर मार मात्र खावा लागला हें वरती. असो. झक् मारली, शेण खाल्लें, माझा चंद्रहार. बस्स माझा चंद्रहार.

मुक्ताजी–तुह्मीं कांहीं मला चंद्रहार दिला नाहींत. हेमंतरावाला विचारा. माझा व तुमचा संबंध काय ?

मदन–कायदेकानू बरेच जाणतां तर ?

मुक्ताजी–तुझ्यासारखीं शेंकडों पोरें माझ्यापाशीं कायदे शिकून गेलीं आहेत समजलास ?

मदन–असेल, नाहीं कोणी ह्मणावें ! अंबाबाई, आपला महिमाच तसा आहे. हें गेलें, हूं गेलें, धोपाटणें हातीं आलें ह्मणायचें. (आपल्याशीं) आतां घरीं तरी कोणत्या तोंडानें जाऊं ? (विचार केल्यासारखें करून) असो कांहीं चिंता नाहीं. जिच्याकरतां आज लाखावर पाणी ओतलें तिच्यापायीं आणखी दहा लाख खर्चीन, पण मनीषा तृप्त करून घेतल्यावांचून कधींही सोडणार नाहीं. लंवडी कुठें जाते बघतों तर खरी. खालीं पडलेली मिशी कां अशीच रहाणार ? केव्हांना केव्हां तरी वर येईलच येईल. (जातो.)

प्रवेश ४ था.

स्थळ–वसंतरावाचें घर.

मारुत–(लगबगीनें प्रवेश करून) हें रमा वहिनी, दुसऱ्या वहिनी आपल्या घरीं आल्या, तेव्हां त्यांना लौकर ओंवाळायला चला.

रमा–(उच्छुकतेनें) खरं कीं काय भावोजी ? तर मग सर्वांना जरा दाराबाहेरच उभे राहायला सांगा. मी आंत जातें व आरती नारळ वगैरे घेऊन येतें. (दासीकडून सर्व शिष्टाचार होऊन सर्व आनंदानें बसतात.)

वसंत–(विनयानें) रमे, आज तुझ्या सुखदुःखाला वाटेकरीण

श्री जगदीशकृपेनें आपल्या घरीं आणली आहे, तेव्हां दोघींनीं आनंदांत राहून मला सुख द्यावें हेंच माझें सांगणें आहे.

रमा–प्रिया, आपण या गोष्टीची मुळींच काळजी करूं नये. इतर बायकांसारखी मी सवतिमत्सरपणा न करितां ह्यांच्याशीं भगिनीच्या नात्यानें वागेन.

वसंत-(आनंदानें) शाबास रमे शाबास. यावेळी तुला कुठें ठेवूं आणि कुठें न ठेवूं असें मला झालें आहे !

चं०–(गाहिंवरून) बाईसाहेब, मी तुमच्या लहान बहिणी सारखी आहे, मला संभाळून घेणं तुमच्याकडे आहे. आपण उभयतांनीं मला प्रेमानं आपलं उष्टं जरी दिलंत तरी तें मी अमृतापलीकडे मानीन. आज माझा आनंद गगनांत देखील मावेनासा झाला आहे ! कारण ज्यांनीं माझ्या गरिबाच्या विनंतीला मान देऊन, व माझी अब्रू रक्षण करून जिवदान दिलं, त्यांचे उपकार जन्मोजन्मींही फिटणार नाहींत.

वसंत–चंद्रिके, यांत उपकार ते कसले केले ? दीनांचें दुःख निरसन करणें हा मानवाचा धर्मच आहे. यापलीकडे मी कांहीं-एक केलें नाहीं.

चं०—

पद. (सकल जगीं सारखे० या चालीवर.)

खरोखर भूतदया सिंधू ॥ भूतलिं विलसे
दीन जनांचा बंधू ॥धृ०॥ दीन युवतिला आ-
श्रय देउनी मनितसा मज बिंदू ॥१॥ विरहि
नलिनिला सुख द्यायाला अवतरला जगीं इंदू ॥२॥

प्रियकरा, विधिघटनेनें आज (हात जोडून)—

पद. (दशरथ स्त्रीवचनें० या चालीवर.)

या पदरीं पडलें ॥ पवित्र होउनी जगतिं ख-

शेखर दुःख मुळीं नुरलें ॥ धृ० ॥ जननिनें
धन लोभें छळिलें ॥ सत्व पहायासाठीं माझे
हाल बहुत केले ॥ दासी चरणाची झालें ॥
कसायांच्या हातांतूनी धेनुस सोडविलें ॥
पारणें नेत्रांचें फिटलें ॥ माझ्या मानें जें खि-
ळुनी गेलें होतें तें जुळलें ॥ १ ॥

वसंत–प्रिये तुला आतां जास्त तें काय सांगूं ?

पद. (प्रेमपाशीं या पडुनि योषिता० या चालीवर.)

कुलवनितेसम तुजसी योग्यता जगतीं देतो
मी मनरमणी ॥ राहि सुखें मम सदनीं
आतां भीति कुणाची मनिं नच मानी ॥
अर्धांगी तूं अससी माझी न करी चिंता अ-
भिनव तरुणी ॥ तुझ्या गुणावर आनंदानें
प्राणा टाकिन ओवाळूनी ॥ १ ॥

चं०–प्रियकरा—

पद. (चाल सदर.)

प्रेमधनाचा नुसता ठेवा द्यावा मजसी उप-
भोगाया ॥ प्राणाहूनी अधिक तयाला जपून
ठेविन सुख सेवाया ॥ वित्ताहूनी अधिक
गुणांचे मोल मानिते ही तव जाया ॥ या
पायांची दासी झाली दूर न टाका सोडुनी
माया ॥ १ ॥

(इतक्यांत आचारी प्रवेश करतो.)

आचारी–वहिनीसाहेब, स्वयंपाक तयार होऊन राहिला आहे
तेव्हां रावसाहेबांना आतां उठा ह्मणावें.

मारुत-वसंतराव, चला आतां. आपल्याला बोवा अतिशय भूक लागली आहे.

वसंत-अरे खरेंच, या आनंदाच्या भरांत भान कसें तें राहिलेंच नाहीं.

साकी.

आनंदानें प्रीतीभोजन करुनी झोंप सुखानें ॥
घेऊं आतां चिंता सरली श्री जगदीशदयेनें ॥
नरहरि नाम सुधा ॥ सेवुनि होऊं प्रिय विबुधा ॥ १ ॥

अंक ३ रा समाप्त.



अंक ४ था.

प्रवेश १ ला.

(मदनरावाचें घर–मदनराव व त्याची बायको सरस्वती.)

मदनराव–हें माझं तुला अगत्य असेल तर मी सांगेन तें मला दिलें पाहिजेस नाहींपेक्षां माझी आशा सोड. फिरून कांहीं ही मूर्ति तुझ्या दृष्टीस पडणार नाहीं.

सरस्वती–नव्या नवसानं कधीं तरी एकदाचं येणं व्हायच, त्या दिवशीं देखील नुसता गोड शब्द ऐकणं माझ्या प्राक्तनीं नसावंना ? देवा ! काय हा आमचा बायकांचा जन्म ! सर्वतोपरी आह्मीं यांच्या अंकित राहून सुखाचा लवलेश देखील आमच्या वाट्याला येऊं नये, असा आह्मींच तुझा काय बरं अन्याय केला ? (सचिंत होते.)

मदनराव–देणें असेल तर मुकाट्यानें दे, नाहींपेक्षां रस्ता सुधारलाच समज.

सरस्वती–सगळेच दागिने घेऊन जाना; मला काय करायचे आहेत ? आजपर्यंत बिंदि, बिजोरा, चंद्रहार, वाक्या, गोठ, तोडे वगैरे सर्व कांहीं नेलेच. आतां उरले सुरलेले हे घेऊन चला ह्मणजे मग शंभूची पार्वती बनल्यावर कटकट तरी नको. आतां झालंना ?

मदनराव–असें मनांतल्या मनांत जळून देशील तर मग नकोत. संतोषानें अगदीं हंसत हंसत माझ्या स्वाधीन केले पाहिजेत.

सरस्वती–मीच कशाला द्यायला हवेत ? आपणच घ्या ह्मणजे झालं. चांगलं कृत्य आरंभलं आहे. चंगीफंगीच्या संगतीनं जर

कां भिकेला न लागला तर काय ह्मणाल तें ऐकेन. दुकानची तिजोरी, व घरांतली तिजोरी कोरडी ठणठणीत तर पडलीच ! आतां राहिलेलं. हें घेऊन कफल्लक होऊन बसा ह्मणजे झालं.

मदनराव–अग पैशाचा उपभोग हा घेतलाच पाहिजे. मेल्यावर आपल्या बरोबर थोडाच येणार आहे ? जिवंत आहों तेथपर्यंत खावें, प्यावें, मजा मारून घ्यावी, आणखी काय ?

सरस्वती–एकानं सुख घ्यावं व दुसऱ्यानं रडावं, हा न्याय कुठला ?

मदनराव–हा न्याय पूर्वसुकृताप्रमाणें होत असतो, समजलीस? ह्मणून मनुष्यानें मिळेल त्या गोष्टींत सुख मानून घ्यावें. जन्माला अगर दैवाला बिलकूल दोष देऊं नये, असें करणें यांत मूर्खपणा आहे. अग मी स्वतः सौभाग्याचा दागिना तुला आहेना ? मी सुखी असल्यावर कपाळभर कुंकू तरी लावशीलना ? यापेक्षां जास्त काय पाहिजे ? खुळी नाहींतर.

सरस्वती–बायकांनीं मात्र पुरुषांचं ऐकावं न् आमचं मात्र तुह्मीं ऐकूं नये ही रीत कुठली बाई !

मदनराव–कुठली ह्मणजे आजकालची ही गोष्ट नव्हे, तर अनादि कालापासूनच हा प्रघात पडून गेला आहे, तो मोडणें ह्मणजे यांत आमची मिशी खालीं नाहीं कां होत ? छत् आहे हेंच बरें. अग याकरितांच परमेश्वर तुह्माला घर बसल्या कांहीं खटपट न करितां पोटाला देतो, आणखी आह्मांला श्रम करावे लागतात. मग त्या मगदुराप्रमाणें आह्मांला सुख नको का घ्यायला ? आजपर्यंत बाबासाहेब होते, ह्मणून मूग गिळून स्वस्थ होतों, पण आतां स्वतः धनी झाल्यावर मनाप्रमाणें हवे तसे पैसे उधळण्याला कोणाची भीति कां आहे ?

सरस्वती–पाहिजेल तें करा, माणसांनीं ताळ सोडल्यावर मग काय बोलायचं राहिलं ? मामंजींच्या पश्चात् चांगली व्यवस्था चालविली आहांत, ती अशीच चालूं द्या. उद्यां कांहीं प्रकृतीला

कमजास्त झालं, ह्मणजे मग चंद्राजी, विठाजी, सुंद्राजी, कांहीं उपयोगी पडणार नाहींत. आह्मांलाच निस्तरावं लागेल. आतांशा पथ्य चाललें आहे यावरूनच काय तें समजा ह्मणजे झालं.

मदनराव-एकूण मी आजारी पडावं अशी तुझी इच्छा आहे ना?

सरस्वती-तशी मी कशाला इच्छा धरूं? पण तूर्त चाललेली स्थिति सांगितली. डोळ्यावरची धुंदी उतरल्यावर मग पश्चात्तापांत पडाल ह्मणून सांगतें.

मदनराव-तूं नकोस मला अक्कल शिकवायला. माझें मला समजतें आहे. पडलोंच आजारी तर दवाखाने कांहीं ओस पडले नाहींत. तुला नको माझी काळजी बरें!

सरस्वती-मनुष्यानं ढुंगणाचं सोडून डोकीला गुंडाळल्यावर मग त्याला काय बोलायचं? (सर्व दागिने काढून देऊन तडफडत निघून जाते.)

(इतक्यांत बाबल्या प्रवेश करितो.)

बाबल्या-रावसाहेब, रावसाहेब, आपणाला मुक्ताजीनीं बोलावलं आहे, चला लौकर.

मदनराव-अरे त्यांना जाऊन सांग कीं मी येतों, तूं पुढें जा. (बाबल्या जातो.)-आज मुक्ताजीनां फार दिवसांनीं आठवण झाली बरं! असो. आतां मेघनाद, चंगी, फंगी यांना बरोबर घेऊन जाऊं. कारण एकटें दुकटें वेश्यांच्या घरीं कधींही जायचें नाहीं, अशाबद्दल मी आपला कान पिळून घेतला आहे. तेव्हां निघाली हीच पसंत युक्ति ह्मणायची.

(जातो.)

प्रवेश २ रा.

(मुक्ताजी व तिनें ठेवलेला सुखवस्तु यजमान.)

फक्कडराव–हें पहा, तुह्मीं वृद्धपणीं कांहीं चांगलें केलें नाहींत. चंद्राचें ह्मणणें आपण कबूल केलें असतें, ह्मणजे बरें झालें असतें. पहा बरें ती गेल्यापासून तुमच्या दाराकडे कोणी ढुंकून तरी पाहतो कां ? घर कसें मसणवटासारखें दिसतें ! ती असतांना ह्या ठिकाणीं जागती लक्ष्मी होती असें वाटत होतें. दैव तुमचें फुटकें त्याला तुह्मी काय करणार ?

मुक्ताजी–हें पहा, मी आपल्याला बजावून ठेवतें कीं, फिरून त्या कारटीची गोष्ट काढलीत तर ते माझ्या कांहीं कामी पडणार नाहीं. (वेडावून) ह्मणे ती असतांना लक्ष्मी नांदत होती. आणखी आतां हाडळ कां नांदत आहे ! उगीच बडबडूं नये. देवासारखं सुकाट्यानं बसावं, अन् इथं जर चैन पडत नसेल तर खुशाल एखाद्या देवळांत अगर धर्मशाळेंत जाऊन पडावं.

फक्कडराव–मनुष्याला भिकेचे डोहाळे आठवले ह्मणजे राग कसा सदोदीत नाकाच्या शेंड्यावर बसलेला असतो. खरें होतें तें मी बोललों यांत कोणाची चोरी केली कीं काय?

मुक्ताजी–जास्त बोलण्याचें कारण नाहीं. ती कारटी उलथली तसे तुह्मीही कुठें तरी जाऊन उलथा जा. उगीच खायला काळ नि भुईला भार नको.

फक्कडराव–घातलें बरें तोंडाला अगदीं कुलूप. (आपल्याशीं) हाच जर मी भरज्वानींत एखादा उद्योगधंदा करून असतों तर असें बोलून कां घ्यावें लागतें ? पिळलेल्या आंब्याच्या सालीप्रमाणें आतां माझी गोष्ट आहे, काय करावें ! कमजास्त बोलेन तर उद्यां या फक्कडरावाला "अंबाबाईचा जोगवा" मागावा लागेल, न बोलावें तर जीव रहात नाहीं. मिळून काय "गडसास्वडरयोर्मध्यें

ब्राह्मणो लडबडायते " अशांतील आमची गोष्ट आहे. असो, " भक्ष्य भोज्य नानापरी, कई कोरड्या भाकरी " या न्यायावर दृष्टी देऊन स्वस्थ बसावें झालें, दुसरें काय !

मुक्ताजी–हें पहा, आतां तुह्मी बाहेर जा. इथं आतां इतक्यांत कांहीं मंडळी यायची आहे. तेव्हां जरासें कुठें हिंडून फिरून या जा. उगीच रात्रंदिवस इथं धरणं धरून बसतां याची तुह्माला कांहींच कां लाज वाटत नाहीं ? उठा, अजून बूड हालतच नाहीं.

फक्कडराव–उठतों बरें उठतों, पण अनवाणी बिन छत्रीवांचून अशा उन्हांतून कसा जाऊं ?

मुक्ताजी–तसंच जावं, डोकीवर धोतर ध्यावं नि घराच्या कडेनं चालत जावं, ह्मणजे पायही पोळणार नाहींत व उन्हही लागणार नाहीं, समजलांत ?

फ०–अग याच्यापूर्वी तूंच किंग मला उन्हांत हिंडूं नका ह्मणून उपदेश करीत होतीस, आणखी आतां ह्मातारपणीं अशा खुब्या सांगतेस काय ? अग हीच वेळ कठीण आहे. याच वयांत मनुष्याच्या प्रीतीची परीक्षा कळून येते, असें ह्मणतात तें कांहीं खोटें नव्हे.

मु०–त्या मागच्या गोष्टी आतां कशाला हव्यात ? चाललेली घडी खरी. तुह्मीं झालात रुद्राक्ष नि मी झालें अमसोल. आतां काय ? हॅं चला उठाच आतां जाउंदे एकदांची धिंडका बाहेर.

फ०–मुळांतच बिघडलं आतां कुरां करून काय उपयोग ? " आलिया भोगासी । असावें सादर " ह्मणून स्वस्थ बसावें झालें. बरें पण विडा तरी जरासा कुटून देतेस कां !

मु०–दांत पडले तरी खाज किती आहे बघा. चुनेगचीच करा नुसती. डब्यांतलं सामान संपलय आज; जा तसेच.

फ०–(कण्हत कण्हत उठून) हें जाऊं तर मग ! बरें पण

आमचा " ह्मा ह्मा " आज कुठें दिसत नाहीं! आह्मांला जन्माचा सोबती आतां तोच आहे.

मु०-ती पहा कोपऱ्यांत. तुह्मींच नाहीं कां ठेवली होती? मेली आठवण ती कशीसुद्धां नाहीं.

फ०-अग तरुणपणांत जे ढंग असतात, त्याच्या उलट ह्मातार-पणीं स्थिति होते. असो. आज बरीच हजामपट्टी उडविलीस ह्मणायाची, चला. राम, राम, राम, (असें ह्मणून जातो.)

मु०-कायरे बाबल्या मदनरावाकडे गेला होतासना? मग त्यांनीं काय सांगितलें?

बाबल्या-ते ह्मणाले, तूं पुढं जा, मी आतां इतक्यांत येतों. मग कां वेळ झाला हें मला समजत नाहीं (पावलांचा आवाज ऐकून) हे पहा आलेच वाटतें.

(इतक्यांत मदनराव, मेघनाद, चंगी, फंगी प्रवेश करितात.)

मु०-मदनराव, आपण मनांत कोणत्याही प्रकारचा राग न धरतां आलात हे मजवर मोठे उपकार झाले असं मी समजतें.

मदन०-मुक्ताजी यांत उपकार कसले? झालेल्या गोष्टी-बद्दल राग मानण्यांत हंशील काय? बरं तें असो, आज मला इतक्या जलदीनें बोलावण्याचें काय कारण?

मु०-मदनराव, एकच कारण नाहीं, हजारों कारणं नज-रेसमोर उभीं आहेत. काय सांगूं तुह्माला! तुमच्या ऋणां-तून मी कशी मुक्त होईन असं मला झालं आहे. आजपर्यंत लहानाची थोर करून हातातोंडाशीं आलेली पोरटी लाखो रुपयांवर लाथ मारून माझ्या हातावर तुरी देऊन एका हलकट मनुष्याचा हात धरून त्याच्या घरीं बटकीसारखी निघून गेली; तेव्हां या गोष्टीचा पुरा सूड कोणत्या उपायांनीं घ्यावा, ह्याच मसलतीकरितां तुह्मांला तसदी दिली बरं! ह्या ह्मातारीला आतां तुमच्यावांचून दुसऱ्या कोणाचा आधार नाहीं,

आप्त इष्ट तुह्मांवांचून दुसरं कोणी राहिलं नाहीं. (गहिंवरते.)

मदन०-मुक्ताजी विनाकारण वाईट कां ह्मणून वाटून घेता ? आह्मीं कांहीं हातामध्यें कांकणें भरलीं नाहीत. तुह्मीं, आह्मीं ज्या कांहीं मसलती योजूं, त्याकामीं फक्त नांवाला मात्र पुढाकार घ्या, बाकी पैशाआडक्या संबंधाची जोखीम अस्मादिकांकडे. ह्रँ कसें काय ? ही मसलत आपल्याला पसंत पडतेना ?

मुक्ताजी-मदनराव, तुमच्या मर्जीबाहेर मी तीळभर देखील जाणार नाहीं. ' जिथं तुमची पत्रावळ तिथं माझा द्रोण ' मात्र जें कांहीं तें बिनबोभाट होऊन माझ्या केंसाला व अब्रूला धक्का न पोहचेल अशी तजवीज झाली पाहिजे. काय सांगूं मदनराव तुह्मांला, त्या हेमंत्यानं माझ्या हातावर तुरी किंहो दिल्या !

मदन०-(चकित होऊन) काय ह्मणता ! तुमच्या हातावर हेमंतानें तुरी दिल्या !

मुक्ताजी-अहो तुरी तर दिल्यातच, पण वर आणखी तुरुंगांत जाऊन हरभरे भरडायची पाळी आली असती !

मदनराव-(धुसफुसून) पुढचीं अक्षरें बोला', विलंब लावूं नका.

मुक्ताजी-(दागिन्याचा डबा काढून) हा चंद्रहार कोणाचा ?

मदन०-(पाहून) हा चंद्रहार माझा. मग तुमचें ह्मणणें काय ?

मुक्ताजी-नीट न्याहाळून पहा अँ,

मदन०-नीट पहातों बरें ! माझ्या डोळ्यांवर कांहीं वडस वाढला नाहीं.

मुक्ताजी-मला नाहीं वाटत तुह्मीं डोळ्यांनीं पहातासे !

मदन०-(मेघनाद, चंगी व फंगी यांस उद्देशून) ही ह्मातारी मला अगदीं मूर्खच समजते. (मित्र आपसांत कुजबुजतात.)

मुक्ताजी-मूर्ख असून वर आणखी बेअक्कल आहांत.

मदन०-(संतापानें) तुमच्यासारख्या ' वृद्धानारी पतिव्रता ' वेश्येच्या तोंडांनें मी अगदीं बेअक्कल मनुष्य आहें, असें ऐकून घेणें हें परिणामीं आपल्याला घातक होईल, या गोष्टीचा विचार करा अँ ?

मुक्ता०-तुमच्यासारख्या श्रीमंताच्या डौलावर विश्वास ठेवून अखेर पोरच्या पोर जाऊन वर नारळाची आई हातांत आली असून मलाच ' विचार करा ' असं जें दरडावून ह्मणता, याची तुह्मांला कांहीं शरम नाहीं कांहीं वाटत !

मदन०-माझा लाखाचा चंद्रहार गिळंकृत करण्याची मसलत असेल ही !

मुक्ता०-वस्तु तुमच्या नजरेसमोर आहे; व ती माझी असं आपण कबूल केलं आहे. आणा तर मग सराफाला बोलावून, करा परिक्षा, ह्मणजे बेअक्कलाच्याही पलीकडं आहांत असं आपल्याला सिद्ध करून दाखवितें, मग झालं कीं नाहीं ?

मेघनाद-मदनराव, या पाहूं इकडे तो चंद्रहार. (मदनराव चंद्रहार देतो. कांहीं वेळ निरखून पाहून हातानें तोलून मोठ्या आश्चर्यानें) मदनराव, या ठगाच्या कर्तबगारीला मूळचा चंद्रहार बक्षीस दिला, तरी तो कमीच होईल. धन्य असो. हा ठग सवाई शिकंदर आहे खरा ! अहो फक्कड, तुमच्या अक्कडीची पगडी उताणी पडली बरें !

मदन०-तुह्मीं सगळेच कसेरे अंधळे झालांत ?

मेघनाद-आपण स्वतः अंधळे आहांत, ह्मणून आह्मांला ह्मणता इतकेंच.

मदन०-काय, मी अंधळा आहे ? अंधळा असतो तर पहिल्यां सपाट्याला लाखावर दरोडा घातला असता कां ?

मेघनाद-दरोडा घातलास खरा; पण त्यांत तुमचा उभयतांचा चुराडा होऊन ठगाचा मात्र रगाडा झाला !

मदन०-तूं देखील आह्मां दोघांना मूर्खच ठरवितोस अँ ?

मुक्ताजी-मेघनाद बोवा, ऐका हीं ' मुक्तांतलीं वाक्यं ' दुसऱ्याला मध्यस्ती घालून बाहेरख्यालीपणा करणारे शुद्ध नंदी-बैलासारखे असतात हें मी अजूनही ह्मणतें.

मेघनाद-मुक्ताजी, हा खोटा आहे असें आपल्याला केव्हां कळलें?

मुक्ताजी-ज्या वेळीं कळलं त्याच वेळीं मदनरावाला बाबल्या-कडून बोलावणं पाठविलं, हाच काय तो मधला अवकाश. केसानं गळा कापलात किंहो मदनराव ! तरी बरं; हाच जर एकदम चव्हाट्यावर जाण्याची वेळ येती, तर परंपरेनें उभयतांच्याही पा-यांत बिड्या पडल्या असत्या. कांहो मेघनाद खरं किं खोटं ?

मेघनाद-मदनराव, तुह्मीं आपल्या घरांतून चंद्रहार काढून मुक्ताजीना देण्याकरितां ज्याच्या हातीं दिलात, त्यानें तुमच्या हातावर निव्वळ तुरी दिल्या.

मुक्ता०-यांच्यापेक्षां माझ्या हातावर जास्त दिल्या; आणखी माझी मात्र त्रिशंकूसारखी स्थिति झाली. यांचं ठीकच झालं, पण आह्मांला मात्र भीक मागावयाची पाळी आली !

मेघनाद-कां मदनराव घामाघुमसे झालांत ! हें पहा, वेळेवर जर कांहीं धामधूम केलीत, तर एक लाखाचे पंचवीस हजार तरी हातांत पडतील, नाहीं तर शंख दिलेलाच आहे ?

मुक्ता०-हा आहे ताजातवाना, याला कांहीं जड जाणार नाहीं; पण माझ्या मात्र मनगटांत अवसान मुळींच राहिलं नाहीं !

मदनराव-(कांहीं वेळ स्तब्ध राहून) ऐमंत्या, बुडविलेंस ! बुडविलेंस इतकेंच नव्हे, पण काळीज कांपून घेतल्यासारखें केलेंस ! ' बापा परी बाप गेला व शंख वाजतां हातही गेला ' (रागानें)

कांही चिंता नाहीं. यापायीं लाखो सुरती खाक करीन, आणखी वर प्राण गेला तरी बेहेत्तर, पण सूड उगवीन तेव्हांच राहीन.

मुक्ताजी–मदनराव, आतां तरी अंधळ्याचं माप पदरांत पडलं कां ? हें पहा, या कामाचा जर पेंढा पोचवायचा असेल तर प्रथम पांच हजार सुरती इथं ठेवा. नाहीं तर मुकाट्यानं चौकीवर चला कसे.

मदन--चौकीवर जाण्याइतका अजून आमचा लौलिक झाला नाहीं समजलांत ! (हातांतल्या आंगठ्या काढून मुक्ताजीच्या आंगावर फेकतो.)

मुक्ताजी–(एकीकडे) ह्या देखील आतांच मला नीट पारखून घेतल्या पाहिजेत.

मदन-पांच हजारांची दुप्पट आहे बरें क्कां ! आतां मी जें सांगेन तसें तुम्हांला ऐकावें लागेल.

मुक्ताजी–माझी खातरी होईल त्यानंतरची गोष्ट आहे. (नीट न्याहाळून पाहते) यावेळीं फक्कडरावाची स्वारी असती तर बरं झालं असतं. उगीच त्याला बाहेर घालवून दिला.

फक्कडराव-(हळूच कोंपऱ्यांतून उठून पुढें येऊन) होय, पोटांत कावळे टोंचूं लागले ह्मणून इथें मघाशींच येऊन बसलों आहे !

मुक्ताजी–अहो इकडे या. पहा बरं तुमची नजर कुठपर्यंत चालते ती ?

फक्कडराव-(आपल्याशीं) लौकरच डोळे उघडले ह्मणून बरें झालें. (दागिने हातांत घेऊन कांहीं वेळ ति[illegible]
खऱ्याला कुठें मरण आहे कीं काय ![illegible]
यांची किंमत दहा हजार रुपयांवर
हा बेटा हाताचा सढळ आहे, पण
मापांची असल्यामुळें लौकरच
असो, आपल्याला काय करा[illegible]

माझी चंद्री असती तर तिनें मला ह्मातारपणीं फुलासारखें ठेविलें असतें, असो दैव आपलें! हाच जर मी प्रथम शुद्धीनें वागलों असतों तर आज कुत्र्यासारखा दुसऱ्याच्या दारांत पडून निव्वळ भाजीभाकरीकरितां मिंधा कां झालों असतों? (उघड) बेलाशक घ्या ठेवून दागिने.

मुक्ताजी–मदनराव, तुह्मी मघाशीं ह्मणालांत ती गोष्ट मला कबूल.

मदन०–(मेघनाद व चंगी, फंगी यांच्याशीं खलबत करून) मुक्ताजी, या कामीं पुढें मागें सरकारची पायरी प्रथम तुह्मांलाच चढली पाहिजे. आमचें आपल्याला पाठबळ आहेच; पण माघार घेतां कामा नये.

मुक्ताजी–देवानं आयुष्य मात्र दिलं पाहिजे व तुह्मी धनदाते झाला पाहिजेत, मग ह्मणाल तिथं हजर राहीन. मात्र ज्यानं तुमच्या हातावर चंद्रहारासंबंधानं तुरी दिल्या, त्या ठगाची खोड जिरवा; व ज्यानं तुमच्या सावजावर घाला घातला, त्याचा नायनाट करा; आणखी मग जिच्याकरितां व्यूहाची रचना करायची तिला अंकित करून घ्याल तरच रहा. तुह्मी समंजस आहातच.

मदन०–त्याची नको आपल्याला काळजी. हेमंताच्या मुसक्या बांधीन, वसंताला जगांतून नाहींसा करण्याची तजवीज करीन, आणखी तुमच्या चढेल चंद्रीचा नक्षा उतरून ति... पल्या कक्षेंत ठेवीन तरच राहीन. मुक्ताजी उचला बेलभंड.

मुक्ताजी– अहो एक वेळ नाहीं शंभर वेळ. हा घ्या बेलभंड...

... मग, कां मेघनाद मघाशीं केला ...

...लेंस !

...कडे नेऊन) दरोड्य... कलेंस !

तर 'स्त्रीबुद्धिः प्रलयंगता' असें व्हायचें. हें पहा, मी अशी कांहीं युक्ती योजिली आहे कीं, चंद्री तर कबजांत यावी आणखी वसंत तिच्याकारितां फांशी जावा. मात्र या चंगी फंगीनां कांहीं तरी दिलें पाहिजे. आणखी मलाही थोडीशी नड आहे.

मदन०-अरे हा मदनराव कोणाची नड ठेवणार नाहीं, हें घ्या. (असें ह्मणून एकेकाला एक एक दागिना देतो.)

चंगी-मदनराव, दोन रुपयांच्या बाटलीकरितां ही आंगठी मोडायाची कीं काय ?

फंगी-राया, मला देखील गांजा घ्यायचा आहे.

फ०-(हळूच मध्येंच) मला कोणी गुळाचा खडा देईल तर मी देखील घोंटभर पाणी पिईन.

मुक्ता०-थेरडोपंत गप्प बसा. ह्मातारपणीं चळ लागेल.

फ०-चळचळ कांपायाला लावलेंस तर खरें.

मदन०-पांतु दक्षणा पाहिजे ह्मणतां? हें घ्या. (चिरीमिरी देतो.) मुक्ताजी, आह्मीं जातों आतां, पुढें काय करावयाचें तें लौकरच तुह्मांला कळेल.

(सर्व जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थळ-वसंताचें घर.

(रमा, चंद्रिका, मारुत वगैरे.)

चं०-रमाबाई, आपणा उभयतांसारखी मैत्री दुसरीकडे कोठेंही हा बेटा हातें मला ह्मटतं. कारण नुसत्या सवतीसवतींमध्यें किती-माषांची असगा भरलेला असतो! पण ही तर तशी गोष्ट नसून असो, आपल्याया असून मला निर्मळ अंतःकरणानें वहिणीप्रमाणें

मानून माझ्याशीं कालक्रमण करीत आहांत, तेव्हां आपल्या मनाचा हा केवढा मोठेपणा !

पद. (तुझें पाहूनी स्वरूप० या चालिवर.)

मज मानुनि भगिनीपरी सुख देता ॥
मजविषयीं वैर मुळिं नच तव मनीं ॥
ह्मणुनि वाटतें नवल कथूं किती आतां ॥ धृ० ॥
शांत वृत्ति तव बघुनी नयनीं ॥
तोष होतसे किति तरी बाई ॥
प्रियकर भूषण तुह्मी आहांत वसंता ॥ १ ॥

रमा–चंद्रिकाबाई, अहो यांत माझ्या मनाचा मोठेपणा कसला ? केवळ पूर्वसंचिताप्रमाणें सर्व कांहीं गोष्टी घडून येतात. नाहीं तर एका म्यानांत दोन सुऱ्या कधीं तरी राहूं शकल्या असत्या कां ? या सर्व गोष्टीचा सुखोपभोग घेणारा पुतळा मोठा भाग्यशाली आहे, असं कोण बरं ह्मणणार नाहीं ? बरं आज स्वारी तातडीनं एकटीच कोणीकडे गेली कांहीं समजत नाहीं.

चं०–खरंच बाई, वसंतराव एकटेदुकटे बाहेर पडले ह्मणजे फिरून येईपर्यंत माझा जीव कसा अगदीं धोक्यांत असतो. कारण, माझ्या खारामुळं त्यांना आजकाल बरेच शत्रु उत्पन्न झाले असतील, ह्मणून बाई मोठी भीति वाटते. तो हरीचा लाल सुखी तर आपण सुखी. देवा, यातना, दुःख वगैरे सर्व कांहीं मी भोगीन, पण आमच्या सौभाग्यभूषणाला निरंतर सुखी ठेव, हेंच माझं तुजजवळ मागणं आहे.

(इतक्यांत मारुत व वसंत प्रवेश करतात.)

वसंत–मारुता, राजाज्ञेप्रमाणें मला माणिकपुराला गेलेंच पाहिजे. कारण नोकरी पडली लष्करांतली; तेथील हवा, पाणी वगैरे सर्व गोष्टींचा बातबेत कसा काय जमतो तो पाहून, नंतर मग मंडळीला नेण्याचें करावें हा उत्तम पक्ष. कारण, यदाकदाचित् रत्नपूरवाल्यांशीं

सामन्याचा प्रसंग आलाच तर मला जाणें भाग आहे. यासाठीं माझ्या पश्चात् दोघींच्या रक्षणाचा सर्वतोपरी भार तुझ्या माथीं ठेवून मी जाणार. जिवाला जीव देणारा असा तुझ्यावांचून मला दुसरा कोणता बरें मित्र आहे?

मारुत–वसंतराव, आपण बिलकुल काळजी करूं नये. मात्र आपण कदाचित् संग्रामाचा प्रसंग आलाच तर जीव धोक्यांत न घालण्याबद्दल खबरदारी घ्यावी.

वसंत०–(आश्चर्यानें) हा खुळ्या, समरवीरश्री कांहीं विलक्षण असते; अशावेळीं कचर खाऊन निमकहरामी करणें, या सारखें दुसरें कोणतेंही पातक नाहीं. अरे, ज्याचें अन्न खायचें त्याच्याशीं दगा करून आपल्या प्राणाची काळजी वहाणें हा केवढा अधमपणा! समरांत प्राणाचा बली देणें हेंच आह्मांला भूषण आहे.

रमा–(घाबरून) ह्मणजे आह्मांला मागें ठेवून आपण जाणार कीं काय?

चं०-प्रियकरा, जिकडं आपण तिकडं आह्मीं. आपणावांचून आह्मीं कसे बरं दिवस कंठावेत? (दोघी शोकाकुल होतात.)

वसंत–(दोघींना जवळ घेऊन मोठ्या विनयानें) रमे, चंद्रिके, असें वेड्यासारखें काय बरें करावें? तुह्मीं दोघीही समंजस असून असें करतां यामुळें माझा जीव जाण्याला कचरतो. धीर सोडूं नका; यावेळीं जर मी न गेलों, तर निमकहरामी पदरांत पडून पुढच्या ऐश्वर्याला मी सर्वतोपरी मुकेन! काळजी करूं नका. ईश्वर तारणारा असल्यावर मारणाराचें कांहीं चालत नाहीं; तशांतून जर कांहीं जरूरी पडेल तर मोहिमेवर जावें लागेल. नाहीं तर कदाचित लौकर माघारा देखील येईन. राहणें भाग पडलेंच तर महिन्या पंध्रा दिवसांनीं तुह्मांला घेऊन जाईन.

चंद्रिका व रमा–प्रिया, आमचीं सर्व सुखदुःखं आपल्यावरच

अवलंबून ना ? मग प्राणावांचून देह कसा राहील ? आपण न गेला तर नाहीं कां चालणार ?

वसंत–चालेल, न चालायला काय झालें ? पण अशी हुद्याची नोकरी सोडून व स्वस्थ बसून प्रपंच चालला पाहिजेना ? सौख्य तर पाहिजे, मग त्याकरितां प्रसंगीं दुःख नको कां भोगायला ? हें पहा, आतांशीं कुठें महाराजांपर्यंत माझी दाद लागली आहे. तेव्हां यावेळीं जर न गेलों तर सर्व सुखावर लाथ मारून मला स्वस्थ घरीं बसावें लागेल. तुह्मीं दोघींनीं आनंदानें निरोप दिलात कीं मी फत्ते मिळवून खात्रीनें परत येईन. ही एवढी मोहीम साधली कीं पुढें महाराजांच्याजवळ असणाऱ्या मानकऱ्यांतच माझी नेमणूक होणार आहे. असें झाल्यावर मग ईश्वरदयेनें आपल्याला कोणत्याही गोष्टीची कमतरता पडणार नाहीं. मारुताला तुमच्याजवळ ठेवतों, मग काळजी कां ?

रमा व चं०–प्रिया, महिना पंध्रा दिवसांनीं तरी आह्मांला नेणं होईल ना ?

वसंत–अग हें तुह्मीं मला सांगायला कां पाहिजे ? कदाचित् योगायोग जुळून आल्यास गेल्याबरोबर आठ दिवसांतच तुह्मांला नेण्याची तजवीज करीन. हें करा माझी जाण्याची तयारी. फक्त पुऱ्या आणि थोडेसे लाडू डब्यांत घालून द्या ह्मणजे झालें. कपड्यांची पेटी, आणि थोडीशीं काम चलाऊ भांडीं जवळ असलीं ह्मणजे झालें. मारुता, या माझ्या प्राणांना तुझ्या स्वाधीन करून मी जात आहें बरें, नीट हुशारीनें वाग.

रमा व चं०–(गहिंवरून) प्रकृतीला नीट जपून असायचं बरं!

वसंत–(दोघींची समजूत घालून) अग रक्षण करणारा नरहरि समर्थ आहे. (दोघीजणी वसंताचे पाय धुतात, व त्याला ओंवाळतात.) यांशीं

चंद्रिका–

पद. (शिरीं गंगा० या चालीवर.)

सुखीं ठेवो वसंताला सदाशिव तो महीवरती ॥ नसे आतां दुजी आशा मुळीं कसलीहि यापुढती ॥ सुकुंकुम हा तिलक शिरिं या सतत राहो असा जगतीं ॥ नसे दुसरा हिरा ऐसा खरें वदतें न अन्योक्ती ॥ अशा विभुती बहुत जगतीं ॥ नसती पहाया ॥ सतत होवो वसंताशीं समागम तो आह्मां पुढती ॥ १ ॥

(सर्व जातात.)

अंक ४ था समाप्त.



अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

स्थळ–गुप्त ठिकाण.

(मेघनाद, मदन, चंगी, फंगी दरोडेखोर वगैरे.)

मेघनाद–मदनराव, आपल्या मनोदयाप्रमाणें ईश्वर घडवून आणणार असें दिसतें; कारण, आतांशा वसंवराव कुठें बाहेर गांवीं गेले आहेत असें ऐकतों. तेव्हां अशा संधीस शिकार साधली तर काम फत्ते. मात्र खिसा सैल सोडला पाहिजे. जिवाचा धडा करण्याचें काम माझें. प्राण गेला तरी बेहत्तर, पण हार ह्मणून कधीं घेणार नाहीं. मग कसें काय?

मदनराव–(मोठ्या ऐटीनें) अरे कसें काय ह्मणून काय विचारतोस ? हा मदनराव पैशाला कधीं मागें घेणारा नव्हे. अरे जंगम मिळकत संपली ह्मणून स्थावर कुठें गेली नाहींना ? दोन गांव विकीन तर दोन लाखांत एक पै कमी येणार नाहीं. मात्र अजिंक्य झालेली चंद्रिका या पठ्याची बटीक झाली पाहिजे.

मेघनाद–तर मग मदनराव, या गोष्टीची मुळींच काळजी करूं नका. अहो ' दाम करी काम ' हे माझे साथीदार इतके कांहीं पटाईत आहेत कीं, हूँ हूँ ह्मणतां दरोड्याचें काम साधून अचानक तुमच्या माशुकाला उचलून इथं आणतील. कसें कायरे पठ्ठ्यांनों ?

चंगी व फंगी–रावसाहेब, हा धंदा अगदीं आमच्या आंगवळणीं पडून गेलेला आहे. सरकारचे शिपाई आज कैक दिवस आमच्या पाळतीवर आहेत, पण त्यांच्या हातावर तुरी देऊन आह्मीं मोकळे ते मोकळेच. आपला हुकूम मात्र सुटूंद्या कीं, आजच्या आज किरण साधलेंच बघा.

मदनराव-अरे हुकूम सुटलेलाच आहे. छापा घालण्याचें काम तुमचें मी आपला नामानिराळा राहणार. मला काळजी फक्त माझ्या इच्छित वस्तूची. हं हें घ्या. (सोन्याची कडी देतो) येवढा डाव साधलात कीं जन्माचे श्रीमंत करून सोडतों. पण आजच्या आज काम झालें पाहिजे.

मेघनाद-मदनराव, आतां स्वस्थ असा. थोडक्याच वेळांत आपल्याला गोंडेराव करून सोडतों. चलारे पठ्ठयांनों, आतां विलंब उपयोगी नाहीं.

फंगी-रावसाहेब, काम तर फत्ते करतोंच, पण बाटलीची व गांजाची मेजवानी उडाली पाहिजे.

मदनराव-अरे प्याल तितकी दारू व ओढाल तितका गांजा देतों. ठिलेच्या ठिले लावून सोडतों. या मदनरावाला कोणत्या-तरी गोष्टीची कमतरता आहे कीं काय ? चला, बोलत बसूं नका. काम फत्ते झाल्यावर सर्व रात्र तुमचीच आहे.

मेघनाद-गड्यांनों आपलीं हत्यारेंपात्यारें बरोबर घेतलींतना ?

चंगी व फंगी-अहो हत्यारांखेरीज चोर कधीं बाहेर पडला आहे कीं काय ?

मेघनाद-तसें नव्हेरे, पण आपलें उगीच विचारलें. चलातर, म्हणा आतां ' वेताळकी जय ' आणखी काय तर !

(सर्व जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ-वसंतरावाचें घर.

(रमा आजारी असून चंद्रिका व सारिका जवळ बसलेल्या आहेत.)

चंद्रिका-रमाबाई,अगदींच अन्नाचा द्वेष करणं चांगलं नव्हे.

तापानं तोंड कडू होतं खरं, पण अमळ दोन घांस पोटांत गेले म्हणजे जिवाला हुषारी येते. अन्नमय प्राण आहेना?

रमा-(कण्हत कण्हत) चंद्रिकाबाई, अन्न कसं विषासारखं लागतं! मी मुद्दाम कां करतें! हें माझं दुखणं मोठं विलक्षण दिसतं. पहातांना आज पांच सहा दिवसांत घामाचा लवलेश तरी आहे कां? तोंड कसं विषासारखं झालं आहे! झोंपेचं तर नांवच नाहीं. रात्रंदिवस डोकं कसं गरगर फिरतं आहे! अखेरची एक-दांची तिकडची भेट झाली असती म्हणजे खुशाल देह धरणीवर ठेवला असता! मला थोडं पाणी तरी द्या!

चं०-(आर्जवानें) रमाबाई, असं काय बरं भलभलतं बर-ळता? अहो हा पित्ताचा ताप आहे; उतरेल लौकर. मारुत भाओजी वैद्याच्या घरीं गेले आहेत, ते आतां मात्रा घेऊन येतील. धीर सोडूं नका. इतकं कांहीं भिण्याजोगं असाध्य दुखणं नाहीं. सारिके, तिथलं जरासं डाळिंब घेऊन ये. (सारिका डाळिंब घेऊन येते.) रमाबाई, डाळिंबाचे दोन दाणे खा, म्हणजे घशाला जरासा ओलावा येईल.

रमा-(आर्जवानें) चंद्रिकाबाई, मी तुमच्या पाया पडतें. मला थोडकसं गार पाणी द्या, दुसरं कांहीं नको. मी तुमचे उपकार विसरणार नाहीं. (भ्रमीत होऊन) मी मेलें तर माझं सोन्या-हून पिवळं होईल. माझ्या पश्चात प्रियांचं कसं होईल याची मला मुळींच काळजी नको. सौभाग्यपणीं मृत्यु आलेला किती बरं चांगला? माझी इच्छा नका मोडूं गडे. द्याना थोडंसं गार पाणी.

चं०-रमाबाई. असं काय बरं करावं? हें पहा, तुह्मीं असं बोलू लागला कीं सर्वांगांचं पाणी होतं! आह्मीं असून नसून सारख्याच. वसंतरावाचं आपणच भूषण आहात. गडे असं नका बडबडूं. जरासा मनाला धीर देत जा.

सारिका-(घाबरून)अक्काग, साहाण्यांतून कोणीस डुंकून बघ-तंय तें पाहिलेस कां? (घाबरून) अक्काग, भूतबित तर नसेलना?

चं०-खुळी कुठली ! भूत नाहीं नि कांहीं नाहीं. बैस उगीच देवासारखी डोळे मिटून.तूं घाबरलीस तर रमाबाई घाबरून जातील. असें करूं नये अँ बाळ. (सारिकेला पोटाशीं धरते.)

(इतक्यांत दारावर धक्का दिल्यासारखा आवाज होतो.)

चं०-सारिके, मारुत भाओजी आलेसे वाटतात. तूं येशील कां कडी काढून ?

सारिका-(घाबरून) अक्काग, तुझ्या गळ्या शपथ, कांहीं तरी आज दगा आहे. आपली चाहूल बंद झाल्याबरोबर साहण्यांतून डोकावणं बंद झालं न् फिरून दरवाज्यावर धक्का दिला. तूं जरा गप्प बैस.

चं०-(रमाबाईला जराशी झोंप लागलीशी पाहून) रमाबाईचा किंचित् डोळा लागला हें एकपरी बरं झालं. ऐक अँ. कोणससं बोलत आहे वाटतं. (कानोसा घेते.)

मेघनाद-गड्यानों, मी बाहेरून टेहळणी करतों. कोणी आलेंच तर पाजळलेली तरवार तयार आहेच; एकाचे दोन तुकडे करून टाकतो. तुह्मीं आंत गेल्यावर कोणाला मारहाण करूं नका. फक्त त्या चंद्रिकेला अचानक उचलून पोबारा करा. उगीच गोंगाट केलात तर मसलत फसून सर्वच ओंफस् होईल, काय कराल तें गुपचुप् करा. हूँ, आटपा लौकर.

चं०-(अतिशय घाबरून) अग बाई ! घात झाला बरं घात झाला ! हे कृतांतस्वरूपी आतां कांहीं माझे प्राण ठेवणार नाहींत ! देवा ! काय आमच्यावर हा दुर्घट प्रसंग ! (इकडे तिकडे पाहते)

सारिका- (घाबरून) अक्का चोरग चोर.........(बोबडी वळते) अक्काग चो चो.........

चंगी-(दरडावून) कारटे, जर कां बडबडलीस तर ठार करून टाकीन.

(सारिका ओरडते व घाबरून धाडकन् जमिनीवर पडते.)

चं०-(तिला सांवरते) बाबानों, तुह्मीं माझ्या बापाभावासारखे आहांत. तुह्मीं आमच्या जिवाला धक्का लावूं नका. तुह्मांला हवे तर हे दागिने देतें, पण उगीच–

फंगी–बाई, उगीच बडबड लावूं नका. तुमच्या दागिन्यांची आह्मांला मुळींच जरूर नाहीं. मुकाट्यानें आमच्याबरोबर आलांत तर तुमच्या केंसालाही धक्का लावणार नाहीं. आणखी असं जर न कराल तर मग आह्मांला निराळी तजवीज करावी लागेल. हूँ मग कसें काय?

(इतक्यांत रमाबाई, मला पाणी, मला पाणी असं म्हणते.)

चं०–(व्याकुळतेनें) बंधूनों, ह्या आजारी माणसाला असंच टाकून माझ्यानं कसं बरं येववेल? त्याची स्थिति पहा नि मग माझी पाहिजेल ती व्यवस्था करा. मला माझ्या प्राणाची मुळींच पर्वा नाहीं. पण—

चंगी–तें 'पण बीण आह्मीं कांहीं जाणत नाही.' तुमच्या आर्जवाचा यावेळीं कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं! चला, आटपा लौकर. नाहीतर पहा आह्मांला तृतिय पंथाची तजवीज करावी लागेल.

रमा–चंद्रिकाबाई, माझी नाहींका तुह्मांला दया येत? पाणी पाणी करून मरून जाऊं ह्मणतां! देवा ने मला एकदांची! ह्मणजे या यातायातींतून मोकळी तरी होईन. नाहींना मला पाणी देत? बरं तर तुमची मर्जी! (स्तब्ध होते,)

(सारिका मोठ्यानें ओरडते.)

चंगी–फंग्या घालरे त्या पोरीच्या तोंडांत बोळा. उगीच ओरडायला लागली आहे. (फंग्या तसें करायला लागतो तोंच–)

चं०–बाबानों, त्या मुलीनं काय बरं अन्याय केला आहे? माझेच तुकडे तुकडे करून टाकाना?

चंगी-तसें असतें तर केव्हांच खांडोळीं केलीं असतीं ! हें पांडित्य नको आहे. मुकाव्यानें येता कीं, बांधूं मुसक्या ?

चं०-बाबानों, तुह्मीं मला कुठें नेणार ? अगदींच पाषाणहृदयी कसे झालातरें ! अबलांचा घात करणं यांतच कां तुह्मी पुरुषार्थ समजतां ? विचार करा. असं नका करूं. माझा प्राण गेला तरी बेहत्तर, पण अजारी मनुष्याला सोडून मी नाहीं यायची !

चंगी-(वेडावून) मी ह्मणे नाहीं यायची ! फंग्या, बांधरे काढणीनें पहातोस काय ? उगीच चेष्टा लावल्या आहेत.

फंगी-(बांधतां बांधतां) असें केल्या वांचून कुठें बस्तान जमतें कीं काय ? (चंद्रिकेला बांधूं लागतात.)

सारिका-अक्काग, मी तुझ्या बरोबर येतें. बाबानों, मला बांधारे.

चं०-झाला बाबानों तुमचा पुरुषार्थ ! परमेश्वरा माझी लाज तुला. मी मृत्यूची पर्वा करीत नाहीं, पण रमाबाईला सुरक्षित ठेव. सारिके, उगी बाळे, रडशील तर प्राणाला मुकशील ! बाबानों, मला रमाबाईच्या तोंडांत पाण्याचा घोंट तरी आखेरचा घालूं द्या !

चंगी-फंग्या, पहातोस काय गध्यासारखा ! ने फरफटत ओढून आणखी काय तर ! बाई तुमच्या रडण्याचा, आरडण्याचा व आर्जवाचा कांहीं उपयोग व्हायचा नाहीं ! जास्त बडबड केलीत तर राखेचा तोबरा देऊं.

चं०-(विव्हळत) रमाबाई ! ईश्वर तुह्मांला सुखी राखो. बाळे सारिके, उगीच ऐस ! (गहिंवरून) प्राणप्रिय वसंतराव, ही अभागी चंद्रिका आजपासून तुह्मांला अंतरली बरं ! माझ्यासाठीं दुःख करूं नका. जगदंबे, या अनाथ अबलेचं पातिव्रत्य रक्षण करणं तुझ्याकडे आहे. देवा ! वसंतरावाला व त्यांच्या कुटुंबाला सुखी राख. (दुष्ट लोक चंद्रिकेला फरफटत ओढून नेतात. इतक्यांत मारुत वैद्याला घेऊन येतो.)

मारुत–(इकडे तिकडे पाहून) अरे ! चंद्रिका वहिनी इथें कुठें दिसत नाहीं ? (सारिकेजवळ जाऊन) बाळे सारिके, तूं अशी रडतेस कां ? बोलग बोल.

सारिका–(शोकानें) मारुतराव ! माझ्या अक्काला चोरांनीं मुसक्या बांधून नेली ! अक्का, आतां मी तुला कुठं पाहूं ? अक्का ! अक्का ! अक्का !

मारुत–(घाबरून) हें प्रकरण तरी काय आहे ! मी वैद्यबोवाच्या घरीं गेलों इतक्यांत पाळत राखून हा कोणी तरी मुद्दाम दगा करविला हें खास. (छाती बडवून) आतां वसंतरावानां हें काळें तोंड दाखवूं तरी कसें ! माझ्या जिवावर ते खुशाल माणिकपुराला गेले, तोंच हा अकस्मिक प्रसंग दैवानें माझ्यावर कसा ओढवला ! चंद्रिका वहिनी, तूं यावेळीं कोणत्या संकटांत असशील, याची माझ्यानें कल्पना देखील करवत नाहीं.

(इतक्यांत रमा मला पाणी द्या असें ह्मणते.)

मारुत–(रमेच्या तोंडांत थोडेसें पाणी घालतो तोंच–)

वैद्यबोवा–मारुतराव, त्यांना पाणी नका देऊं. मी थोडेसे मात्रेचे वळसे उगाळून देतों ह्मणजे त्यांचा शोष कमी होईल. (वैद्य मात्रा देतो.)

मारुतराव–अभागी मारुता ! अरे सर्व नगरांत तूं पराक्रमी अशी तुझी ख्याती असतां, कुसुमाहून सुकुमार अशा चंद्रिकेला दुष्ट कसायांनीं एखाद्या गाईला फरफटत ओढून नेल्याप्रमाणें, नीच, घातकी, अशा नराधमांनीं मुसक्या बांधून न्यावी, आणि तें या अभागी मारुतानें आपल्या कानानें ऐकून घ्यावें, तेव्हां धिक्कार असो माझ्या जन्माला. आतां सर्व शहरांत माझी छी थू होणार ना ? शिव ! शिव ! असली अमंगल वार्ता ऐकल्या बरोबरच मी मेलों असतों तर किती बरें चांगलें झालें असतें ? हाय ! हाय ! (असें ह्मणून छाती बडवून घेतो.)

वैद्य–(त्याला सांवरून) मारुतराव, काय हा प्रकार मांडला आहे तुम्हीं ? विचार करा. उगीच बायकासारखा ऊर बडवून घेण्यांत पुरुषार्थ कां वाटतो तुह्मांला ? शुद्धिवर या. (सावध करतो)

मारुत–(विव्हळ होऊन) वैद्यबोवा, प्रिय मित्र वसंतरावाला आतां हें कृष्णवदन कसें हो दाखवूं ? देवा ! तुह्मा आमच्यावर एकाएकीं काय ह्मणून कोप झाला ! असो. दुर्दैव माझें ! हें सर्व वृत्त वसंतरावाला कळविलें पाहिजे.

वैद्य–मारुतराव, आपण आतांच्याआतां कोतवालीवर जाऊन वर्दी कळवा. विलंब उपयोगाचा नाहीं. अद्याप फार वेळ झाला नाहीं तोंच वर्दी देणें हा उत्तम पक्ष. पुढें काय श्रीहरी करील तें खरें. प्रसंगीं धीर सोडतां कामा नये. तुह्मी येईपर्यंत मी बाई-साहेबांपाशीं असतों, अगदीं काळजी करूं नका. त्यांना फक्त पित्तप्रकोप झाला आहे. पहा मात्रा दिल्याबरोबर त्यांना थो-डीशी निद्रा लागली आहे. एका घटकेंत पित्तशमन होईल. जाच तुह्मी आतां.

मारुत–देवा ! व्याघ्रासारखा मी क्रूर असतां आज मी कम नशिबानें एखाद्या मेंढीप्रमाणें गरीबीनें दुसऱ्यापाशीं मान लव-विण्याकरितां जावें ना ? असो तुझी मर्जी. वैद्यबोवा मी जाऊन येतों बरें. सर्व भिस्त तुमच्यावर ! (जातां जातां ज्या) हरामखो-रांनीं असा अकस्मात कहर उडविला त्यांचा नायनाट करीन ते-व्हांच हा मारुत अन्न गृहण करील.

(जातो.)

प्रवेश ३ रा.

(स्थळ-मुक्ताजींचें घर.)

(मेघनाद, मुक्ताजी, फक्कडराव वगैरे)

मदन-(हर्षानें) हँ मुक्ताजी. आतां कंबर बांधून तयार असा. आपल्या मनोदयाप्रमाणें ईश्वर सर्व कांहीं घडवून आणणार असें दिसतें. फक्त या फिर्यादीवर तुमची निशाणी करा ह्मणजे झालें.

मुक्ताजी-हें पहा मदनराव, माझ्याकडून बिलकुल ना नाहीं. पण फिर्याद काय ती वाचून दाखविल्याखेरीज त्याजवर सही करणं हें धोक्याचं होईल. निशाणी करीन पण—(थांबते.)

मदन-हें ‘ पण आणि परंतु ’ च जिथें तिथें घोटाळा करतात. तुह्मी आपल्या नांवाला पुढें असा. बाकी पुरावा आणखी पैका याची जोखम माझ्याकडे. असा कपिलाषष्ठीचा योगायोग दवडला, तर तुमच्यासारखी दुर्दैवी बायको जगांत नाहीं असें ह्मणण्याला कोणती हरकत ?

मुक्ताजी-पण मदनराव, माझी चंद्री खुशाल आहेना ?

मदन-तिची आपल्याला मुळींच काळजी नको. अहो ज्या वस्तूपासून सुख मिळायचें त्या वस्तूला कोणी खरी दुखवील का ? अहो ज्यानें तुमच्या हातावर तुरी देऊन मुलीला जबरदस्तीनें नेली त्याची अशा गोष्टीनेंच खोड मोडली पाहिजे.

मुक्ताजी-होय आपण ह्मणतां तें खरें, पण यदाकदाचित् हें खोटं ठरलं तर कसं ?

मदन-अहो खोटयाचें तर तुह्मीं नांवच काढूं नका. अहो ‘ द्रव्येण सर्वे वशः ’ या तत्वासारखें प्रबल अस्त्र जगांत दुसरें कोणतेंही नाहीं, सगळीं पिशाच्चें मी भरून ठेविलीं आहेत. (आपल्याशीं) पण ही हडळ मसलत फसविते कीं काय कोण जाणें.

मुक्ताजी–तर मग या पिशाचाला नको का कांहीं देणं ?

मदन–मग हें जर अगोदर सांगितलें असतें, तर ना कोणाची होती ?

मुक्ताजी–मदनराव, तुमच्याशीं असं बोलण्याला भीड वाटते.

मदन–(हंसून) काय मुक्ताजी ह्मणतां हें ? अहो आतां मी तुह्मांला परका कां आहे ? मी सर्वस्वी तुमचा आहें. जांवयाचें नातें जमलें ह्मणून भीड वाटत असेल आणखी काय तर ? हें घ्या. (कांहीं दागिने मुक्ताजीला देतो.)

मुक्ताजी–(आपल्याशीं,) तुपासाठीं उष्टं खायचं मग भीड कां ? (उघड) आतां माझ्याकडून सही करण्याला बिलकुल ना नाहीं. (कागदावर निशाणी करते.)

मदन–आतां कांहीं वेळानें तुह्माला न्यायाधिशाच्या कचेरींत हजर रहावें लागेल बरें.

मुक्ताजी–पाहिजेल तिथं हजर राहीन. काळजी कां करतां ? (आपल्याशीं) बेटयानं मसलत तर खूप शोधून काढली. (उघड) मदनराव आपण जा आतां. (मदन व मेघनाद जातात.)

मुक्ताजी–थेरडोपंत, ही गोष्ट कोणाजवळ बोलूं नका हो. अनायासानें आपली जर तुंबडी भरते आहे तर कमी कां करा ?

फक्कडराव–हैं काय पाहिजे तें करा. आह्मी आपले तोंडाला खीळ घातली आहे. ‘ रामाय तस्मैनमः ’ (आपल्याशीं) या थेरडीची बुद्धि फिरली, हिला भिकेचे डोहाळे आठवले ! परमेश्वरा तूं न्यायी आहेस ! वसंतरावावर यांनीं हें नाहक कारस्थान रचलें आहे; पण यांतून खऱ्या न्यायानें वांचाविणारा तूं समर्थ आहेस. या कामीं मला जर कां एखादा साह्यकारी मिळेल तर वसंतराव व माझी चंद्रिका यांच्या हितासाठीं मी आपला देह खर्ची घालीन. असो, ईश्वरावर हवाला !

मुक्ताजी–फक्कडराव, मला कचेरींत जावं लागेल. यासाठीं तुह्मी

घरांतच बसून राह्या. बाहेर कोठेंही जाऊं नका. पान सुपारी, तंबाकू वगैरे सर्व कांहीं इथें आहे; खुशाल पिचकाऱ्या मारीत बसा, कुठं जाणं नको न् येणं नको.

फक्कडराव–ठीक आहे. हुकमाप्रमाणें तामिली करतों. (आपल्याशीं) थेरडे, या खोट्या नाट्या गोष्टींचें प्रायश्चित्त तुला मि- ळाल्यावांचून कधींही रहाणार नाहीं. अखेर असल्या हलकट, घातकी, द्रव्यलोभी रांडांनां दुःखाचेंच प्रायश्चित्त !

(जातात.)

प्रवेश ४ था.

(स्थळ–वसंतरावाचें घर.)

(रमा, वसंत, मारुत, सारिका वगैरे.)

वसंत–(अतिशय दुःखानें)–

पद. (दरबारी कानडा.)

माझा प्राण निघोनी गेला ह्मणुनि कलेवर
झालों ॥ दुर्दैवानें प्रिय अबलेला आजन्म-
वरी मी तर मुकलों ॥ धृ० ॥ सौख्याशेनें
तिज सोडोनी ॥ प्रवासासि कां गेलों नि-
घुनी ॥ त्याचें फल हें भोगायाला भूतलावरी
अजुनी जगलों ॥ १ ॥

प्रिये चंद्रिके, केवळ माझ्यासाठीं यम लोकाहून जास्त भयंकर यातना भोगण्याचा प्रसंग तुजवर यावाना ? प्रिये, तुझ्यावांचून हें जग मला शून्यवत् भासत आहे ! हाय ! हाय ! हाय !

रमा–(विव्हळ होऊन) प्रिया, शोक करून काय बरं उपयोग ?

भोक्तृत्वाप्रमाणं या लोकीं घडणाऱ्या सर्व गोष्टी धैर्यानें भोगल्या पाहिजेतना ? असं करूं नका. दुःखातिशयानें मस्तक भणभणून जाऊन आपली प्रकृति मात्र जास्त बिघडेल !

वसंत-प्रिये, मी तरी काय करूं ? झालेल्या प्रकारामुळें हृदय कसें विदारण होऊन गेलें आहे ! मी मनाला आंवर घालतों, पण काय करूं, आवांक्याबाहेर गोष्ट होऊन गेली !

मारुत-(विव्हल होऊन) वसंतराव, या अभाग्याचे प्रथमतः तुकडे तुकडे करून टाका कसे ! म्हणजे ही आपली अनिवार दुःस्थिति पाहणें तरी नको. आपल्यासारखे धैर्याचे पुरुष जर दुःख करूं लागले, तर माझ्यासारख्या अज्ञ मनुष्यानें काय बरें करावें ?

वसंत-बा मारुता, तुझ्याकडे काय बरें दोष ? माझेंच प्राक्तन खोटें !

(इतक्यांत कांहीं शिपायांसह कोतवाल प्रवेश करितात.)

कोतवाल-(मोठ्यानें ओरडून) वसंतरावाचें हेंच घर काय ?

वसंत-होय, वसंतरावाचें हेंच घर.

कोतवाल-वसंतराव नांवाचे गृहस्थ इथेंच आहेत काय ?

वसंत-होय. मलाच वसंतराव म्हणतात.

कोतवाल-आपण जरासे इकडे या पाहूं, आपल्याला कांहीं हकीकत विचारावयाची आहे.

वसंत-कसली हकीकत आपण मला विचारणार ? जवळच कशाला यायला पाहिजे. तेथूनच बोला. नाहींपेक्षां इकडे या, स्वस्थ बसा आणखी मग काय विचारायचें तें विचारा.

कोतवाल-वसंतराव, मोठी दुःखाची गोष्ट सांगणें माझ्या नशिबीं आलें यामुळें नाइलाज आहे.

वसंत-बोला तर खरी काय गोष्ट आहे ती.

कोतवाल–वसंतराव, आपल्यावर 'मुक्ताजी नांवाच्या नायकिणीची मुलगी चंद्रिका हिचा आपण खून केला अशी फिर्याद आहे. तेव्हां सरकारी हुकुमाप्रमाणें आपणाला गिरफ्त करणं भाग आहे. (सरकारी हुकूम दाखवितो. सर्व आश्चर्यानें चकित होतात.)

वसंत–काय चंद्रिकेचा खून केला, अशी तिची फिर्याद आहे काय ?

कोतवाल–होय. मी आपल्याला खोटें कशाला सांगूं ?

वसंत–कांहीं चिंता नाहीं. मी सरकारच्या हुकमाच्या आड कशाला येऊं ? ईश्वराच्या घरीं न्याय आहे. चंद्रिके करतांच जर मला गिरफ्त करता तर कांहीं हरकत नाहीं.

मारुत–कोतवाल साहेब, ही खोटी फिर्याद असावी. कारण जी कांहीं खरी गोष्ट आहे त्या गोष्टी संबंधानें प्रतापगंज कोतवालीवर आपल्याला दाखला दाखवीन मग झालें कीं नाहीं ?

कोतवाल–हें पहा, फिर्याद खरी असो अगर खोटी असो; जिनें ही फिर्याद सरकारांत केली आहे, तिजवर या गोष्टीची जोखीम आहे. खऱ्या खोटयाचा निकाल न्यायदरबारीं होईलच. आपण आपल्या बचावाचा पुरावा न्यायाधीशासमोर सिद्ध करून दाखवा म्हणजे झालें. उठाच वसंतराव. (रमा, सारिका, मारुत, दुःख करूं लागतात.)

वसंत–रमे, सारिके, मारुता, उगींच काय म्हणून दुःख करता ? ईश्वराच्या घरीं तरी न्याय आहेना ? कोतवाल साहेब, चला. मी न्याल तिकडे येतों. पण मेहरबानी करून शिपायांचा गराडा माझ्या भोंवती ठेवूं नका, मी देखील महाराजांचा हुद्देदार नोकर आहे. ज्यांनीं माझ्यावर तोहमत आणली आहे, त्यांचा व माझा न्यायासनासमोर निकाल होईलच, पण खरा अपराधी ठरल्यावांचून मी कैद्याप्रमाणें आपल्या बरोबर येणार नाहीं. या शिपायांचें कांहीं कारण नाहीं. माझी येण्याची नाकबुली असेल तर शिपायांचें काम ना ?

(कोतवाल इतर शिपायांना जाण्यास सांगतो. वसंतराव व कोतवाल जातात.)

रमा-(विव्हळ होऊन) देवा ! मिटिव एकदांचे डोळे ! आमच्यावर आकाशाची कुन्हाडच येऊन पडली ! मारुतभाऊजी, मला एखादें जालीम विष तरी द्या, नाहीं तर एखाद्या विहिरींत लोटून तरी द्या. आतां जन्माचा अगदीं वीट आला, केवढा हा दुर्धर प्रसंग ! (धाडकन् जमिनीवर अंग टाकते.)

सारिका-(मोठ्या आर्जवानें) बाईसाहेब, असं काय बरं करतां?

मारुत-(रमेला सावध करून) रमा वहिनी, काय हा प्रकार मांडला आहांत ? आपणाला दुःख होणें हें वाजवी खरें; पण यावेळीं असें करणें ह्मणजे अगदीं गैरशिस्त आहे. कारण दुखण्यानें आपलें मस्तक आधींच हलकें झालें आहे. जर कां जास्त दुःख केलेंत तर भ्रमानें आपलें माथें फिरून जाऊन कदाचित् प्राणालाही मुकाल. अहो, प्रसंग हे देवादिकांवर सुद्धां आले आहेत, मग त्यापुढें मनुष्याचा काय बरें पाड ! हें दुर्दैवाभ्रपटल कां असेंच राहील ह्मणता ? आपण जर खरे आहोंत, तर खऱ्याचा वाली परमेश्वर आहेच आहे. वसंतरावासाठीं प्राण खर्ची घालीन ! पण त्याच्या केंसालाही धक्का लागूं देणार नाहीं. दुर्दैवानें भलतासलता प्रसंग येऊं नये, आणखी जर कां आलाच तर तुह्मांला खात्रीनें सांगतों कीं, वसंतरावाच्या बचावासाठीं राज्यक्रांती करून टाकीन. दुनियेंत वैऱ्यापेक्षां आमचे मित्रच फार आहेत. स्वस्थ असा. ईश्वरावर हवाला ठेवा. तुह्मीं स्वतः आपलें मन कबजांत ठेवलें पाहिजे. मित्राच्या सुटकेकरितां मला रात्रीचा दिवस व दिवसाची रात्र केली पाहिजे. मी वरचेवर समाचाराला येत जाईनच; पण तुह्मी जपून वागा. मी मित्राकडे कोतवालीवर जातों.

(जातो)

रमा-परमेश्वरा ! माझ्या प्रियाला सुखी ठेऊन मारुतभाओजींना पुष्कळ बळ, आयुष्य व यश दे. (पडदा पडतो.)

मदनराव-(प्रवेश करून) हातीं घेतलेलें काम तडीला गेलें. न्यायाधिशाला लालूच दाखवून आपलासा करून घेतला व त्यानेंही

महाराजांच्या मंजुरीवर वसंतरावाला फांशीची शिक्षा देतों असें कबूल केलें. कां होईना, वसंतराव नाहिंसा झाला ह्मणजे चंद्रिका ताब्यांत यायला कसलीच अडचण पडणार नाहीं. (जातो.)

प्रवेश ५ वा.

(मारुत, वसंत, शिपाई वगैरे.)

मारुत–(आवेशानें) मित्रा भिऊं नकोस, एका प्राणाच्या सुटकेसाठीं हजारों जणाचे बली घेईन, पण तुझ्या केंसालाही धक्का लागूं देणार नाहीं. अरे ही समूशेर रक्तापानावांचून म्यानांत शिरणार नाहीं हें पक्कें समज. प्रथम कोतवालाचा बली, नंतर नीच अशा न्यायाधिशाचा राजरोस खून करीन, तरच आईबापांच्या पोटीं आल्याचें सार्थक. हा चाललोंच पहा चिमखड्या सारखा. (मारुत मोठ्या झपाट्यानें जातो.)

वसंत–(गंभीरतेनें) प्रिये चंद्रिके, दुष्ट लोकांनीं जर तुझा वध केला असेल तर तुझ्या व माझ्या प्राणज्योतींचें ऐक्य होऊन तें जगदीशचरणीं अर्पण होवो. (रागानें)–

पद. (झंपा.)

अदय जन अंतरीं वसुनि नयदेवतें ॥ अंध
झालिस कशी मुळिं न कळतें ॥ धृ० ॥ सत्य
असुनी तुला सर्व मिथ्या दिसे ॥ कां पिसें
लागलें तुजसि ऐसें ॥ अक्षयींचा तुला ला-
गला डाग हा ॥ ह्मणुनि मम अंतरीं दुःख
होतें ॥ जगति तव मान भी कोण राखील गे
सहज जाशील अस्तास गमतें ॥ १ ॥

(शिपाई वसंताला घेऊन जातात.)

अंक ५ वा समाप्त.

अंक ६ वा.

प्रवेश १ ला.

स्थळ-रस्ता

हेमंत-(आश्चर्यानें) एकूण मदनरावानें अशी पाताळयंत्री मसलत काढून वसंतरावावर चंद्रिकेच्या आईकडून तिचा खून केल्याची फिर्याद देववून व खोटा पुरावा शाबीत करून द्रव्याच्या लालुचीनें न्यायाधीशादि सर्व कामगारांना वश करून घेऊन अखेर त्या बिचाऱ्यावर खुनाची शाबिती केली अँ ! कांहीं चिंता नाहीं. याकामीं आपला प्राण खर्ची घालीन, पण युक्तीच्या साधनानें अस-ल्याही बिकट प्रसंगांतून त्या महात्म्याच्या बचावाची युक्ति काढीन तरच राहीन. वसंतरावाच्या मित्रानें या कामीं बरीच खटपट केली होती, असें मी ऐकतों. पण पहिल्यापासून जशी तयारी पाहिजे होती, तशी न झाल्यामुळें व कोतवालादि सर्व लोकांनीं पैसे खाल्यामुळें त्यांचा पुरावा फिक्का पडावा हें साहजीक आहे. असो. (विचार करून) वसंतराव परगांवीं गेल्यावर त्यांच्या पश्चात् संधी साधून कपटानें छापा घालण्यांत मदनरावाचें आंग असलेंच पाहिजे. आतां असें उपयोगीं नाहीं. मुक्ताजीच्या घरीं या गोष्टीचा कांहीं तरी बेत झालाच असेल, तेव्हां तिच्या घरांतला एखादा भेद्या अनुकूल झाल्यावांचून आपला डाव साधणार नाहीं. हा इकडे कोण लगबगीनें येत आहे बरें ? (पाहून) अरे, हा मुक्ताजीचा पुराणा यजमान फक्कडराव!

(फक्कडराव प्रवेश करितो.)

हेमंत-कां फक्कडराव, स्वारी इतक्या लगबगीनें कोणीकडे चालली आहे ?

फक्कडराव-अहो हेमंतराव, त्या थेरडीनें मला कोंडून ठेव-

त्यामुळें तुमची गांठ केव्हां घेईन असें मला झालें होतें; तशांतून बिचाऱ्या वसंतरावास नाहक फाशीची सजा झालेली ऐकून मला अतिशय वाईट वाटल्यामुळें न्यायाधिशांनीं न्यायाचा चिवडा केला ह्मणून थेट राजाकडे जाऊन आपण या खटल्यासंबंधीं खरी हकीकत कळवावी, ह्मणून गडबडीनें चाललों आहें.

हेमंत-(एकीकडे) आपल्या इष्ट हेतूला शुभ शकूनच झाला ह्मणावयाचा. असो, सत्पुरुषा वसंतरावा, तुझ्या सुकृताचा तंतू अद्याप पुरा तुटलेला नाहीं हें खास. फक्कडराव, या गोष्टीबद्दल आपणाला कांहीं माहिती आहे ह्मणतां ?

फक्कडराव-हो हो माहीत ह्मणजे ! ह्या सर्व गोष्टीचा खेळखंडोबा करणारा मुख्य ह्मणाल तर मदन्या. शिवाय त्याचे साथीदार व थेरडी मुक्ती. हें केवळ त्यांनीं खोटें काहूर रचलें असून वसंतरावाच्या पश्चात् त्याच्या घरावर दरोडा घालणारे हेच राजश्री. मुक्तीकडून खोटी फिर्याद करविण्याच्या कामांतला अट्टल पुढारी मदनरावच. गुलामानें घरादाराचें वाटोळें करून चंद्रीनें आपल्याला वश व्हावें ह्मणून न्यायाधिशापासून थेट कोतवालापर्यंत सर्वांनां मुबलक पैसे देऊन वसंतरावाला नाहक फांशीं देववणारा हलकट बदमाष मदनरावच. गुलामानें द्रव्याच्या जोरावर हवीं तशीं दुष्टकृत्यें करण्याला सुरवात केली आहे, याची कांहींतरी लाज बाळगा, त्या दुष्टाचा सूड घ्या. नाहींपेक्षां तुह्मी शहाणे असून मूर्ख झालांत किंवा आहांत असें ह्मणायला काय हरकत आहे ?

हेमंत-फक्कडराव, या सर्व गोष्टींच्या पुण्याईचें श्रेय तुह्मांला आहे. धन्य तुमच्या सत्यनिष्ठतेची !

फक्कडराव-यांत कसची सत्यनिष्ठता ? सर्व खरी हकीकत आपल्याला माहीत असून बिचारा पुण्यात्मा जर नाहक फांशीं जात आहे तर मानवी धर्माचें रक्षण करणें हें योग्य कीं अयोग्य ?

हेमंत-फक्कडराव, आपण स्वस्थ असा. ही गोष्ट दुसऱ्या को-

णाजवळ बोलूं नका. बरें, पण चंद्रिकेला मदनरावांनीं कोणत्या ठिकाणीं ठेवली आहे, हें आपल्याला माहीत आहे काय ?

फकडराव–मला कांहीं बरोबर माहीत नाहीं ह्मणा; पण माणिक चौकांतील एका घरांत त्यांचा बसण्याचा अड्डा आहे हें मला माहीत आहे. कशावरून ह्मणाल तर, आमचा बावल्या तिथें जाऊन केव्हां केव्हां फुकटची मेवा मिठाई घेऊन येत असतो ह्मणून माझा असा तर्क झाला.

हेमंत–(आपल्याशीं) हें एक सुंदर बीळ सांपडलें म्हणायचें ! परमेश्वराची कृपा मात्र झाली पाहिजे कीं इष्ट हेतू आपोआप सिद्धीला जातात. (उघड) फकडराव, मी मघाशीं सांगितलेली गोष्ट ध्यानांत ठेवा. आतां यापुढें आजन्मपर्यंत सुखानें दूध भात खाऊन हरि हरि म्हणत कालक्रमणा कराल अशी मी खात्रीनें तजवीज करतों. तोंडाला अगदीं खीळ घालून बसा. जा आतां, मी तुह्माला लौकरच भेटेन. हें घ्या पानसुपारीला. (फकडरावाला कांहीं देतो.)

फकडराव–चंगळ उडाली. हेमंतराव, माझ्या चंद्रिकेची न् माझी लौकर भेट मात्र करवा, यापेक्षां मी जास्ती आपल्यापाशीं कांहीं एक मागत नाहीं.

हेमंत–ठीक आहे. मदन्या, आतां कोठें जातोस तें पहातों. तुझ्या पायांत थोड्याच वेळानें जर लोहशृंखला न अडकवीन तर नांवाचा हेमंतच नव्हे. चला आतां माणिकचौकांत जाऊन त्या बदमाषांच्या अड्ड्याचा शोध लावूं या. महाराजांच्या मंजुरीवर वसंतरावाला फांशीं द्यावा असा न्यायाधीशानीं ठराव केला आहे, त्याच्या आंत मदनरावाचीं गुप्त कारस्थानें आपल्याला उघडकीला आणलींच पाहिजेत. (जातो.)

प्रवेश २ रा.

स्थळ–राजवाडा.

(सुविचार राजा, त्याचे मंत्री वगैरे.)

(फांशाचा डाव खेळत आहेत तोंच राजवाड्याबाहेर एका-एकीं लोकांची गर्दी व ओरडाओरड होते.)

सुविचार–(आश्चर्यानें) कायहो, एकाएकीं अशा आनंदाच्या दिवशीं राजवाड्याबाहेर गलबला व लोकांची गर्दी होण्याचें काय बरें कारण ? द्वारपाला, कसली गडबड आहे पाहून ये.

द्वारपाल–जी सरकार. (जातो व लगेच पाहून परत येतो) सरकार, एका मनुष्याला फांशीची सजा न्याय दरबारांतून झाली आहे, व आपल्या मंजुरीवर अखेरचें महाराजांचें दर्शन घे-ण्याची इच्छा करीत आहे. तेव्हां जशी खाविंदाची मर्जी असेल तसें–

सुविचार–कांहीं चिंता नाहीं, तो जर माझ्या दर्शनाची इच्छा करीत आहे, तर त्याची भेट घेणें हें माझें कर्तव्यकर्मच आहे. जा त्या सर्व लोकांना इकडे घेऊन ये जा.

(इतक्यांत वसंत व कांहीं नागरीक जन प्रवेश करितात.)

पद. (नृपाल कोप शांत० या चालीवर.)

खरीच न्यायदेवता जगांतुनी ॥ गेलि काय
भूपते मनांतुनी ॥ सज्जनास । छळिति खास ।
दास हे तुझे ॥ नकोरे टाकूं संत चिरडुनी ॥ १ ॥

वसंत–(गहिंवरून) हाय ! हाय !

पद. (राग–बिभास दादरा.)

न्यायदीप मालवुनी ॥ गेले हे तम दाटुनी

ह्मणुनी मी पडुनि व्यसनीं ॥ दुःख भोगितों
प्राणसखी स्वकरांनीं ॥ टाकिन कां ठार
करुनी ॥ राजेंद्रा करि विचार हेंच मागतों ॥ १ ॥

सुविचार-(शिपायाला उद्देशून) कायरे, कशाकरतां या पुरुषाला बद्ध करून येथें आणिलेत ?

शिपाई-(न्यायाधिशांच्या निकालाचे कागद राजाजवळ देतो.)

सुविचार-(सर्व कागद पत्रें वांचून झाल्यावर) काय हा आमच्या लष्करांतील हुद्देदार असून यानें एका वेश्येचा खून केला ह्मणून माझ्या मंजुरीवर याला न्यायाधिशांनीं फांशीची सजा दिली ! (वसंतरावाला उद्देशून) बाबारे, याच्यावर तुझें काय ह्मणणें आहे ?

वसंत-महाराज, माझी गरीबाची एवढीच विज्ञप्ति आहे कीं-

पद-(चुरिया चंचुबानी० या चालीवर)

नृपते सदयतेस धरुनि करी न्याय ॥ मग
तूं मला मार न करि जनिं अन्याय ॥ धृ० ॥
राजा तुझ्यावीण नुरला जगीं ठाय ॥ ह्मणु-
नी धरी दीन अंतीं तुझे पाय ॥ दीनांस तूं
माय । ह्मणुनी खरा न्याय ॥ करुनी सुयश
जोडी होवो तव विजय ॥ १ ॥

सरकार, खावंदाचा मी दास असून परोत्कर्षसहिष्णु अशा कामगारांच्या अन्यायानें मी नाहक फांशीं जात आहें ! भूपाला ! केवळ यापुढें कधींही अन्याय न होईल तर यावेळीं सर्व लोकांच्या हितासाठीं तूं अन्यायदेवतेला माझा बळी खुशाल द्यावास पण-

पद. (भैरवी दादरा)

देह दोन *जीव एक वसति ज्या स्थलीं ॥
नृपा ॥ तेथें मग संचरेल तो कसा कली॥धृ०

कुसुमाहुन नाजुकशा रम्य युवतिला ॥ ठार
करुनि लाभ काय या मधें मला ॥ दुर्दैवें
आशेचा भंग जाहला ॥ भूतदया जगतांतुनि
नष्ट जाहली ॥ १ ॥

सरकार, मी माणिकपुरच्या मोहिमेवर गेलों असतां माझ्या पश्चात् कोणी दुष्टांनी माझ्या घरावर दरोडा घालून माझ्यावर हा आकस्मिक प्रसंग आणला. अखेर इलाज नाहीं ह्मणून तुमचे पायांपाशीं आलों आहे. यांतून तारणें अगर मारणें हीं दोन्ही आपल्याच हातीं आहेत.

मंत्री–

साकी.

सभ्य नरावर कहर उडाला कैसा दुर्दैवानें ॥ ह्म-
णुनी जन हे हळहळती बहू भूपा अति दुःखानें ॥
भूषण नगरीचें ॥ होतें नष्ट ह्मणुनि साचें ॥ १ ॥

सुविचार–कां मंत्री, खरा विचार करून पाहिलें असतां हा मनुष्य खरोखर खुनी नसावा. याच्या एकंदर लक्षणांवरून हा दुष्ट कृत्य करणारा आहे अशी शंका सुद्धां येत नाहीं. हें पहा–

पद. (पट्टराणि तुज० या चालीवर)

निरापराधी दिसतो नर हा ह्मणुनि बंधना
पासोनी ॥ मुक्त करा मज पुढती यातें ठेवा
सन्निध मम भुवनीं ॥ दरबाराची करा तयारी
न्याय कराया मजसि झणीं ॥ न्यायाला जें
दिसेल तें मज करणें योग्य असे सुजनीं ॥ १ ॥

शिवाय मी यावेळीं असें जाहीर करतों कीं, जो कोणी या खुनाचा खरा तपास लावून देईल त्याला पांच हजारांचा गांव इनाम दिला जाईल.

हेमंत-(पुढें होऊन) महाराज, जर सरकारी मदत मला मिळेल तर ईश्वरकृपेनें या गोष्टीचा 'सूर्य जयद्रथी न्याय' महाराजांसमक्ष करून दाखवीन.

सुविचार-कांहीं चिंता नाहीं. सुमंत, या मनुष्याला या कामापुरती जेवढी मदत लागेल तेवढी देऊन ताबडतोब न्यायाधीशादि सर्व मंडळींना पाचारण करून दरबारची तयारी करा.

(जातात.)

प्रवेश २ रा.

(माणिकचौकाचा रस्ता.)

मारुत-(हातांत नंगी तलवार घेतलेला असा प्रवेश करतो.) बस्स आतां विचार कसला व अविचार कसला! मित्राच्या सुटकेची आशा होती ती तर जळून खाक झाली! आतां अखेर समूशेर गाजवून त्याच्या भेटीला स्वर्गलोकीं गेलों ह्मणजे जगांतला व्यवसाय संपला. शिव! शिव! न्याय देवते! या दुष्ट लांच खाऊ न्यायाधीशानें तुझ्या तोंडाला काळोखी फांसली! तुझ्या डोळ्यांच्या खांचा केल्या! ह्मणूनच तुझ्या दरबारांत भूतदयेचा पुतळा असा प्रिय मित्र वसंत अन्यायी नसतांना तुझ्या आसनापुढें खुनी ठरावा, हें केवढें आश्चर्य! अग ज्या सदय अंतःकरणाच्या पुरुषानें जनलज्जेची पर्वा न करितां, धैर्यानें मन मोठें उदार करून कसायांच्या तडाक्यांत सांपडलेल्या अबलारूपी धेनूला आपल्या घरीं फुलापेक्षांहीं जतन करून ठेवली, असें असतां तुझ्या निमकहाराम सेवकांनीं तिचा खून केल्याची शाबिती त्याजवर करावी व अशी अमंगल वार्ता मी ऐकून घेऊन स्वस्थ राहवें. या- पेक्षां प्रथमतः ज्यानें माझ्याशीं राजरोस दगाबाजी- त्या कोतवालाची कोपानलाला आ-

याचा चिवडा करणाऱ्या न्यायाधिशाला ठार करून, अखेर नृप सिंहासनावर स्वतःचा शिरच्छेद करून घेऊन रक्तानें त्याला स्नान घालून मोकळें व्हावें हाच उत्तम पक्ष.

(आवेशानें धांवत जातो तोंच राजसेवकासह हेमंत प्रवेश करितो)

हेमंत–अरे मारुता, हातामध्यें तलवार घेऊन मोठ्या आवेशानें कोणीकडे चालला आहेस ?

मारुत–तुझ्याशीं बोलण्याला मला यावेळीं मुळींच सवड नाहीं, मला विनाकारण अडथळा करूं नकोस. कारण आडदांडपणा केल्या-खेरीज जगांतले अन्याय मुळींच बंद होणार नाहींत व गरिबांनां त्राताही कोणी मिळणार नाहीं. यासाठीं तूं मुकाट्यानें चालता हो कसा.

हेमंत–(त्याला आंवरून) मारुता, शुद्धीवर आहेस किंवा नाहींस ? अरे मनुष्यानें एकदम बेहोष होणें ही गोष्ट फारच वाईट. बाबारे, सध्याचा काळ युक्तीचा आहे शक्तीचा नव्हे. या गोष्टीचा विचार कर. ज्या गोष्टीबद्दल तूं इतका बेफाम झाला आहेस, त्या गोष्टींचें निरसन सूर्य जयद्रथी न्यायानें महाराजांपुढें लौकरच होणार आहे. वसंताच्या केंसाला धक्का देखील लागणार नाहीं, हें तूं पक्कें समज. आतां शांत होऊन फिरून आपली तलवार जशीच्या तशीच म्यानांत घाल पाहूं ! आतां मुकाट्यानें माझ्याबरोबर चल, म्हणजे काय मजा होते ती दाखवितों. (मारुत व हेमंत गुप्त ठिकाणाजवळ जाऊं लागतात; तोंच एक म्हातारी पुढें येऊन)

म्हातारी–(सर्व मंडळीला उद्देशून) बाबानों, हात या बंगल्यामंदीं कुनी उपटसुळांनीं एक आवा पळवून आनलिया. धाय धाय रडतिया अन् हे खाळभोक तिच्यावर जुलूम करत्यात न्हनूं, ... न्मासनीं तिची उलीशी दया आली तर बगा. चौकीवरल्या ... कैक येळा या गोष्टीबद्दल वदी बी दिली पन् शि-... गप् बसत्यात. तवा ह्यो जुलूम न्हव

तर का झनावं. बाबानों, तिचं रडन वराडन ऐकुनशान पोटामंदी भडभडून्शान् येतया बगा. पन् का करावं माझं झातारीचं कोनींबी ऐकत न्हाई.

हेमंत-(उच्छुकतेनें) गड्यानों, अनायासें शिकार साधली. बरें पण वृद्ध बाई, त्या घराकडे जाण्याला रस्ता कोणीकडून आहे ?

झातारी-बाबानों, झोरल्या दरवाज्याला कुलूप ठोकूनशान बंद केलाया. माझ्या मागन या. माझ्या परड्यांतून वाट है. तकडून ग्येला मंजी नेमक जाल बगा तत.

हेमंत-(झातारीला कांहीं देणगी देतो.)

झातारी-अँ नग नग नग नग. मी हें घेऊनशान् का करूं ! महाराजाकडन् तुमच्या पुन्याईनं शेर मिळतोया त्यो जलमभर पुरल. मला नग हे. घ्या आपल.

मारुत-मित्रा हेमंता, या वृद्धबाईला आपण वंदन करावें इतकी हिची योग्यता आहे. हीं जुनीं पुराणीं खोडें बरें (सर्व जातात.)

अंक ६ वा समाप्त.

अंक ७ वा.

प्रवेश १ ला.

स्थळ—माणिकचौकांतील गुप्त ठिकाण.

(मदन व त्याचे साथीदार.)

चं०-(अति दुःखानें)-

पद. (कसन दीन पर० या चालीवर.)

कहर फार करिती अरी युवती वर ॥ काल
न नेत अजुनि मज बांधुन ॥ धृ० ॥ नाहिं
कुणांस मुळिंच नृपतिभय ॥ ह्मणुनि दुष्ट
बिनधोक करिती छल ॥ १ ॥ युवति
जन्म अति निंद्य असुनि मग ॥ अजुनि
खाक करिन असुखानल ॥२ ॥

प्रियकरा वसंता, अरे या कसायांच्या कचाट्यामध्यें सांपडल्यापासून अद्यापपर्यंत माझी तुला स्मृति न व्हावी, तेव्हां मीच दुर्दैवी असं समजलं पाहिजे, अथवा मी हें काय बडबडतें? कारण—

पद. (अभिमान मला मोठा० या चालीवर.)

जिवदान मला दिलें जनीं सदय तो कसा
मुकला ॥ कुलवान तो असूनि कां सहसा
मनीं विटला ॥ नशिबा तुझ्यावरी हरी वृ-
थारे कसा रुसला ॥ कृतांतसदन पाहण्या
मिळेल तें कधीं मला ॥ १ ॥

प्रिया, इतकी जरी मी दुःखाग्नींत होरपळत आहे, तरी हें प्रेम मला तुझ्याकडे आकर्षणच करीत आहे. अथवा हेंही खरंच आहे कारण—

पद. (भैरवी दादरा.)

•नयन वेधिती तसें हृदय होतसें खुळें ॥ प्रेम
जरी अंध असे ॥ तरि कोणा भीत्ति नसे ॥
अखिल जीव जंतुला न याहिं सोडिलें ॥ १॥
सर्वांतर्यामिं वसे ॥ लावुनि सकलांसि पिसें॥
सकल जगत या पुढती मूढ जाहलें ॥ २ ॥

(इतक्यांत मदन व त्याचे साथीदार प्रवेश करितात.)

मदन–(हातांमधें दारूचा पेला घेऊन)

पद. (चला जीवाजी० या चालीवर.)

या मदिरेचा सुंदर घुटका ब्रह्मानंदीं मग्न
करी ॥ मन सिंधूला वरचेवर बघ येती प्रे-
माच्या लहरी ॥ धृ० ॥ ताम्रसलिल हें ।
पिउनि भान तें । मुळि न रहातें । वार यो-
षिते । दुरित भी मनीं । कधि न येतसे ।
म्हणुनि घे जरा मुदित मानसें ॥ घे घुटका
बघ घुटका ॥ १ ॥

मदन–तुझ्यासारख्या अरसिकेला याची काय गोडी !

चंग्या–मदनराव, तुमच्या दारूपेक्षां हा आमचा थोडक्या पैक्याचा कैफ फार चांगला. बाई, दारू नको तर हा भांगेचा लोटा घ्या. (घोट्याचा लोटा पुढें करून.)

पद. (हा ब.ग अरीचा प्राण० या लालीवर.)

ही भंग । पिउनि मन रंग । होउनी दंग ।

गुंग किति होतें ॥ हृदयंगम बहु तरंग येती
मनिं ते ॥ आनंद । देउनि धुंद । अन्य ते
छंद । मुळीं नच सुचवी ॥ ब्रह्मानंदीं निम-
ग्न करुनी सुखवी ॥ शांभवी । शिवा गुंगवी ।
म्हणुनि मानवी । प्राशुनि घुटका ॥ एक यु-
गाची गमेल तुजसी घटिका ॥ १ ॥

(चंद्रिका त्याचाही निषेध करिते.)

बाई, मदनरावासारखा मी कांहीं तुम्हांला अरसिक म्हणणार नाहीं. परिणामीं कोणताही कैफ घातकच आहे, पण काय करावें, अटीव घोटिवाला त्याच्याशिवाय मुळीं चालत नाहीं.

(सर्व कैफानें धुंद होतात.)

मदनराव–(धुंद होऊन) चंद्रे, भल्या गोष्टीनें तूं आज वळलीस तर ठीक आहे, नाहींतर प्राणाची पर्वा सोडून आज मनीषा तृप्त करून घेणारच.

चं०–क्षुद्र मनुष्या, ज्या वेळेस इथं आणलीस, त्याच वेळेस मी आपल्या प्राणाची आशा सोडलेली आहे.

मदनराव-ठीक आहे. थोडक्यांतच समाचार घेतों.

पद. (कांहो सोतनके संग० या चालीवर.)

जा कुजुन कुजुन मरुन अशीच तूं आतां
जनीं ॥ हाल हाल करुनि ठार धाडिन मग
यम सदनीं ॥ धृ० ॥ आतां मज तुज
विषयीं ॥ मुळिं न दया ये हृदयीं ॥ छंद तुझा
धरुनि मनीं ॥ फुकट फुकट झुरुनि झुरुनि
तनू शिणविली जनीं ॥ १ ॥

चंद्रिके, अद्याप तरी मी सांगतों इकडे लक्ष दे. अग तूं भानी

सुखावर लाथ मारून आपलाच हेका चालवितेस यांत तुझें कल्याण होणार नाही. हें पहा--

पद. (सतिस देइ सतत या चालिवर.)

कुसुमाहुनि मी तुजला ठेविन जपुनी सुदती॥
मग कां तूं मजविषयीं धरिसि मनीं अप्रीती ॥
सोडुनि दे राग पहा प्रेम धरीगे चित्तीं ॥
वृत्ति तुझी पाहुनि ही वाटतसे मनिं भीती ॥
दवडुं नको ही संधी भोग सुखें श्रीमंती ॥
कांहीं तुज न्यून नसे प्रिय सखये या पुढती ॥ १ ॥

चं०-(रागानें) निलाजऱ्या, दीन अबलेला कपटानें इथें आणलीस, यांत मोठा पुरुषार्थ झाला अशी फुशारकी मारित असलास तर खुशाल मार. पण तूं खूप समजून ऐस.

पद. (कर्नाटकी धमार)

कहर झाल्यावरति अबला प्रबल होती रे खला ॥ शूर कधिं नच हात टाकी बायकांवरि दुर्बला ॥ षंढ ह्मणुनी इच्छितोसी भीति दावुनि प्रीतिला ॥ सुखासुखि बघ नरकिं जाया बुद्धि सुचलीरे तुला ॥ १ ॥

मदन-

पद. (चाल सदर.)

भोगुनि मी तुजसि नंतर ठार करूनी टाकितों ॥ सोडवाया तुजसि आतां कोण येतो पाहतों ॥ आर्जवानें तुजसि वळवुनि पाहिलें परि हट्ट तो• ॥ सोडिसी नच ह्मणुनि आतां कहर करुनी सोडितों ॥ १ ॥

कारण—पद. (पट्टराणि तुज करूनि० या चालीवर.)

तुज विषयींचा प्रीती अंकुर जळुनी गेला या
पुढती ॥ कठोर हृदया फोडुनि बघतों प्रीती
कोठें वसते ती ॥ मृत्युलोकिंची आशा सो-
डुनि देई दुर्दैवी युवती ॥ वसंत गेला यम
लोकाला शंख वाजवी दोहातीं ॥ १ ॥

अग त्या तुझ्या दुष्ट वसंत्यानें एका स्त्रीचा खून केला ह्मणून त्याला न्यायाधीशानीं फांशीची सजा देखील दिली ! अग वेडे आतां कां त्याची आशा धरतेस ?

. चंद्रिका–(धाडकन् जमिनीवर आंग टाकते) हाय ! हाय ! प्रिया वसंता ! खरोखरच कां तुझी अशी अवस्था झाली ?

पद. (दया घना हो करुणा० या चालीवर.)

कठिण हृदय केलेंसी न्याय देवते ॥ मज्जीवन
काल वदनीं ॥ टाकिलेंस कांग जननी ॥
परिसुनि हें अशुभ वृत्त हृदय फाटतें ॥
अन्यायी नसुनि किती ॥ बलि घेती भूव-
रती ॥ कृत्या तुज कां न ह्मणूं अदये न्याय
देवते ॥ धृ० ॥ आतां तुज शेवटचें नमन
असो दुहितेचें ॥ हा वसंत करुनि पहा
प्राण सोडितें ॥ १ ॥

(बेशुद्ध होऊन जमिनीवर पडते.)

मदन–(घाबरून) अरे मेघ्या, मेली कीं काय बघरे.

मेघनाद–(तिला स्पर्श करावयास जातो तोंच)

चंद्रिका–(भ्रमांत दचकून उठून) प्रिय. वसंता ! तूंच कांरे माझा हात धरून ओढलास ? हो तूंच तो; हें बघ असा लांबून

जवळ ये ये ह्मणतोस; त्यापेक्षां तूंच कां जवळ येईनास ? (शुद्धि-वर येऊन) हॅं खबरदार ! माझ्या आंगाला स्पर्श कराल तर जळून खाक व्हाल !

मदन–मेघ्या, कर एक घाव दोन तुकडे.

मेघनाद–(म्यानांतून तलवार काढतो तोंच.)

चंग्या–हां, मुकाट्यानें तलवार म्यानांत घाल, नाहीं तर नरडीचा घोंट घेतलाच समज.

मदन–कां चंग्या, चिलीम जास्त झाली वाटतें ? शुद्धीवर आहेस कां हरामखोरा.

चंग्या–लेका चिलीम ओढून मी तर चांगला शुद्धीवर आहेंच; पण तूं न ओढतां गैरशुद्धींत आहेस, तेव्हां गाढव तूं कां मी ? अरे, बलात्कारानें कुठें स्त्रिया वश होत असतात ? मूर्खा ! तुला नपुंसकाला सुंदर नारी हवी कशाला ?

मेघनाद–मदनराव, याला सांगूं कां कशाला तें ?

मदन–तूं तरी यावेळीं माझ्या अन्नाचें सार्थक कर.

चंग्या–सार्थक करण्याच्या आधीं दोघांना जिवंत ठेवीन तर ना ?

फंग्या–(दारूच्या धुंदींत) चंग्या तसेंच केलें पाहिजे.

मदन–मेघ्या, तूं घे चंग्याचा समाचार आणखीं मी घेतों इचा.

(सर्वांची झोंबाझोंबी सुरू होते.)

चंद्रिका–

पद. (पदरीं घ्या तुह्मीं अबला० या चालीवर.)
युवती घात कां करितां ॥ दुरितां करुनि वि-
फल मरतां ॥ असुखा हरि । त्वरित नरहरि ।
शिणली दीनही वनिता ॥ १ ॥

(इतक्यांत हेमंत व कांहीं राजसेवक प्रवेश करितात.)

हेमंत—

पद. (मारा, हाणा, ठोका० या चालीवर.)
बांधा मुस्क्या ठोका बेड्या काय पाहतां या
समया ॥ सूर्य-जयद्रथि न्याय दावा भूपति
न करी अन्याया ॥ राजाज्ञेला मान देउनि
जाऊं त्यातें भेटाया ॥ भेट घेउनी आर्य भ-
गिनिची भाउबिजेच्या सुखसमया ॥ १ ॥

(सर्वत्रांच्या मुस्क्या बांधतात.)

भगिनी चंद्रिके, श्रीनरहरीच्या कृपेनें तुझें संरक्षण करण्याला हे तुझे बंधु तुझ्या पुढें उभे आहेत. महासती, जन्मोजन्म सौभाग्य भोग.

चं०–प्रिय बंधु हेमंता व मारुता, माझा वसंत खुशाल आहे ना ?

हेमंत–भगिनी, खुशाल आहे. राजदूतांनों, नीट बांधा त्यांना.

चंग्या–महाराज, आज आपण माझ्या मुस्क्या बांधल्यात त्यायोगें मी चांगला शुद्धीवर आलों. कारण, कैक वेळ तुमच्या हातावर तुरी देऊन दरोड्याच्या कामांत पटाईत झालेला जो चंग्या तो मींच.

चं०–बाबारे तुला दरोडेखोर कोण ह्मणेल ! उचाला नीच कोण ह्मणूं शकणार ?

हेमंत–मदनराव, चंद्रिकेच्या ऐवजीं आतां आपल्याला चर्मपादुकाचेंच बक्षिस.

मदन–(दांत ओंठ चावून) हरामखोरा, माझा लाखाचा चंद्रहार गिळंकृत करून आतां प्रतिष्ठा मिरवितोस काय ?

हेमंत–नीच मनुष्या, तुझ्या सारख्याच्या हातावर अशाच तुरी दिल्या पाहिजेत.

फंग्या–चंग्या, तूं खास सुटशील. पण बाबा माझीरे काय व्यवस्था ?

चंग्या–मी आपल्या बहिणीजवळ तुझ्या मुक्ततेचा खाऊ मागेन, काळजी कां करतोस ?

(चंगी, फंगी चंद्रिकेच्या पायां पडतात.)

चंद्रिका—

पद. (चित्रांगद धन्य असे० या चालीवर.)

पूर्णायुष भूपातिला देउं नरहरी ॥ दुहितेला
आस दुजी नाहिं भूवरी ॥ प्रिय वसंत मित्र
बंधु इंदुचे परी ॥ मारुत हेमंत गमति मजसि
अंतरीं ॥ प्रिय वसंत हृत्कमलीं वसुनि मधु-
करी ॥ होऊं दे शुद्ध पहा जान्हवीपरी ॥ १ ॥

(सर्व जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ–राजदरबार.

(सुविचार राजा, मंत्री, मुक्ताजी, वसंत, राजसेवक वगैरे मंडळी)

सुविचार–(खटल्याचे सर्व कागद पत्रें वाचून) सुमते, सर्व कागद पत्रें वाचून पाहिलीं, त्यांवरून मला असें वाटतें कीं, या खटल्यांत सर्व एकतर्फी पुराव्यावर लक्ष देऊन न्यायाधिशानीं निकाल केलेला दिसतो. केवळ पुराव्यावरच लक्ष देतां कामा नये. या खटल्यांत न्यायकर्त्यानीं पूर्ण मनन करून त्यामध्यें काय सार निघतें तें पाहून मग जर आपलें मत दिलें असतें तर (वसंताकडे बोट करून) या मनुष्याला फांशीची सजा झाली नसती; तरी बरें

झालें कीं, ही शिक्षा माझ्या मंजुरी नंतर अमलांत यायची होती! असो सुमते, या ह्मातारीची त्रोटक जबानी घ्या.

सुमती–जी हुकूम. (जबानीला सुरवात करतो.) आपलें नांव मुक्ताजी काय ?

मुक्ताजी–होय, माझंच नांव मुक्ताजी.

सुमती–तूं आपल्या मुलीचा खून वसंतरावानें केला अशाबद्दल सरकारांत फिर्याद केलीस ती कोणत्या आधारावरून ?

मुक्ताजी–वसंतरावांनीं माझ्या मुलीला जबरीनें माझ्या अनुमताखेरीज काढून नेल्यानंतर मी तिनं पुन्हां माझ्यापाशीं यावं ह्मणून शोध केला. पण कांहींच ठिकाण लागला नाहीं. नंतर याच शहरांतील प्रख्यात सावकार कुबेर नाईक यांचा मुलगा मदनराव यानें माझ्या मुलीचा वसंतरावानें खून करून तो फरारी झाल्याबद्दल मला सांगितलें; ह्मणून मी ही फिर्याद दाखल केली.

सुमती–हल्लीं मदनराव कुठें आहेत ?

मुक्ताजी–ते आपल्या घरीं असतील.

सुविचार–मुक्ताबाई, चंद्रिका ही तुमची औरस मुलगी काय?

मुक्ताजी–नाहीं महाराज, मी तिला एका बाईपासून विकत घेतलेली आहे. आजपर्यंत मी तिच्याकरितां बरीच खड्ड्यांत आलें. महाराज या शिकल्या सवरलेल्या पोरी काय कारस्थानं करतील याचा नेहीं नेम नाहीं. आपणच पहा, कसा उलटा न्याय आहे तो ! तरुणपणीं तिनें आपल्या सुखाकरितां माझ्या मुखाला मात्र काळोखी लाविली.

राजा-(आपल्याशीं) अशा स्त्रियांचें मुखावलोकन न होईल तितकें चांगलें. वसंतराव, या ह्मातारीच्या मुलीला आपण जबरीनें नेली काय ?

वसंत-महाराज, मी यावेळीं जास्त काहीं सांगत नाहीं, पण मला या ह्मातारीच्या मुलीनें एक पत्र पाठविलें आहे तें पत्र महाराजांनीं पाहिलें कीं, सर्व गोष्टींचा न्यायमूर्तींपुढेंच निकाल होईल.

सुविचार-आणा पाहूं पत्र इकडे. (पत्र वाचून) या पत्रावरून ज्ञातारीचें ह्मणणें उघड उघड खोटें ठरतें. बरें असो. काय हो सुमते, श्री या स्त्रीच्या तपासाबद्दल जें जाहीर बक्षीस लावलें होतें त्याचें काय झालें ?

(इतक्यांत जमादार प्रवेश करितो.)

जमादार-खावंद, आपल्या कामगारांनीं व कांहीं धूर्त लोकांनीं मोठ्या युक्तीनें तलास लावून सदरहू स्त्रीला पळवून नेणाऱ्या बदमाश लोकांना पकडून आणिले आहेत.

(वसंत आश्चर्यभरित होतो.)

सुविचार-(उच्छुकतेनें) जमादार, जा त्या सर्व लोकांना हजर करा.

(जमादार जातो व सर्व मंडळीला घेऊन येतो.)

वसंत-(राजाला उद्देशून मोठ्या उच्छुकतेनें)

पद. (झंपा.)

हीच ती हीच मम चंद्रिका भूपते ॥ सजिव होवोनियां आलि येथें ॥ धृ० ॥ वायुरूपें कशी प्राप्त झाली सती ॥ संचरतसे पहा हृदयिं भ्रांती ॥ माझिया संशया हरण करि झडकरी। दास विनती करी तुजासि न्याते ॥ १ ॥

(राजा चकित होतो.)

चं०-(वसंताला एकदम आलिंगन देण्याला जाते.)

पद. (राग ललत-ताल त्रिवट.)

नरवर हा वसंत ! हा वसंतरे ! ॥ धृ० ॥ महत्संकटीं पडलासी कां सांग सांग सांग मज ॥ १ ॥ निष्ठुर होऊं नको असा तूं भेट भेट भेट मज ॥ २ ॥

वसंत–(गहिंवरून)

पद. (राग व ताल–सदर.)

विधिनें जें भालीं लिहिलें ॥ तें चुकत नसे
कोणालाही या न्यायानें ऐसें घडलें ॥ धृ० ॥
तव हत्त्येचा दोष मजवरी ॥ आला होता
म्हणुनि सुंदरी ॥ बंधन करुनी येथ आणिलें॥१॥

चं०–(मोठ्या काकुळतीनें राजाला हात जोडून) राजेंद्रा,

पद. (भैरवी दादरा० या चालीवर.)

माय बाप तूंच मला अससि भूपते ॥ तुजवां-
चुन साह्य जनीं नाहिं कोणतें ॥ दीनांचें दुःख
पहा कुणि न जाणतें ॥ सोसवे न दुःख नृपा
हृदय फाटतें ॥ ठार करुन टाक झणीं न्याय
देवते ॥ हेंच चुडेदान तुजसि नमुनि मागतें ॥ १ ॥

भूपाला, या पुण्यात्म्याला दुःख न देतां मला ठार केलीस तर सोन्याहून पिवळं होईल.

सुविचार–(गहिंवरून) मुली, तूं धन्य आहेस. तूं वेश्या नसून कुलवनितेपेक्षांही तुझी योग्यता जास्त आहे. शाबास! शाबास! शाबास!

मदन–(अनुताप पावून मोठ्या कळवळ्यानें) महाराज, या गृहदेवतेचा मी पाप बुद्धीनें अत्यंत छळ केला. मी सर्वतोपरी अपराधी तर खराच; पण (हेमंताकडे बोट दाखवून) या सर्व गोष्टीचा खेळखंडोबा करणारा वाघ्या हा मनुष्य. माझा लाख रुपयांचा कंठा दडपून उलट केंसानें गळा कापला हो!

हेमंत–(राजाला हात जोडून) महाराजांनीं क्षमा करावी. सरकार, याच्या बापानें महाराजांच्या रिआसतींतील लाखों रुपये गडप केले होते, तेव्हां असल्या गळेदाबू श्रीमंत लोकांना कावा

साधूनच फसविले पाहिजेत ह्मणून मी असें केलें. या कामीं मी आपल्या आज्ञेनें यांना मोठ्या शिताफीनें पकडून महाराजांसमोर हजर केले आहेत. आणखी या दुष्ट लोकांचा (फकडरावाकडे बोट दाखवून) या मनुष्याकडून जर कां सुगावा लागता ना तर, या नीचांनीं या महासाध्वीवर बलात्कार करून तिला ठार केली असती, वसंतराव नाहक फांशीं जाता, व न्यायदेवतेला कलंक लागून प्रभूच्या गादीला एका साधू पुरुषाच्या वधाबद्दल हत्त्या लागती. महाराज, हे दोघे दगेखोर आहेत खरे पण ते जर कां नसते, तर मदनरावाच्या इच्छा सफल झाल्या असत्या.

मेघनाद-(राजाला हात जोडून) महाराज, मी द्रव्य लोभानें मदनरावाच्या संगतीला लागल्यामुळें माझ्याकडून मोठा अपराध झाला आहे ! याबद्दल मला क्षमा करावी. मी अनन्यभावानें शरण आलों आहें.

चंग्या-(राजापुढें लोटांगण घालून) राजाधिराज, मी मोठा पटाईत दरवडेखोर आहें. आजपर्यंत फक्त हत्त्येखेरीज नाहीं तसलीं घोर कृत्यें माझ्याकडून झालीं आहेत. मोठमोठे दरोडे घालून अतिशय द्रव्य मिळाविलें. मी स्वतःही पुष्कळ खर्च केलें व गोरगरिबांनां मुबलक दिलें. मात्र धाडे घातले श्रीमंतांवर. गरिबांनां मुळींच त्रास दिला नाहीं. या मदनरावानें मला व फंग्याला एकेक हजार रुपयांचीं कडीं देऊं करून वसंतरावाच्या घरावर दरवडा घालायला सांगितलें; त्याप्रमाणें आह्मीं दरवडा घालून या साध्वीला अचानक उचलून नेऊन मदनरावाच्या स्वाधीन केली. महाराज, या स्त्रियेची योग्यता काय सांगावी ! हिला स्पर्श करण्याची कोणाची छाती आहे ! महाराज, मी जरी गंजड भंगड आहें तरी माझ्या हातून जी सेवा करायची ती केली; आतां शेवटीं हात पसरून मागणें आहे कीं, झालेल्या अपराधांची क्षमा करून अन्नवस्त्र देऊन तैनातीला ठेवून घ्यावें.

फंग्या-(राजाला हात जोडून) सरकार, मी देखील आज-

पासून दारूचा छंद सोडून देऊन या चरणांची मनोभावें सेवा करीन.

सुविचार-कां सुमते, पाहिलातना कसा चमत्कार आहे तो ? (चंद्रिकेजवळ जाऊन) मुली, धन्य आहे तुझी. तूं वेश्याजनांना आपल्या सद्वर्तनाचा कित्ता घालून दिलास, तेव्हां ही तुझी केवढी बरें थोरवी ! मदनराव, या कामीं तूंच मोठा अन्यायी आहेस. (हेमंताला व फक्कडरावाला उद्देशून) बाबानों मी जाहीर केल्या-प्रमाणें पांच हजारांचा गांव वंशपरंपरेनें तुह्मां दोघांना निमेनिम देतों. सुमते यांना गादीच्या शिक्क्याची सनद करून द्या.

फक्कडराव-बाळे चंद्रिके, तुझ्याच पुण्याईनें या ह्मातान्याला एवढें वैभव आलें बरें. बाळे अक्षय सौभाग्य सुख भोग.

हेमंत-महाराज, या मदनरावानें मुक्ताजीनां देण्याकरितां माझ्याजवळ एक चंद्रहार दिला होता. पण ती राजकीय वस्तू असल्यावरून मी ती आपल्यापाशीं ठेवून घेऊन ह्या दुष्ट ह्माता-रीला दुसराच एक बनावट हार देऊन तिची समजूत केली होती, याबद्दल सरकारांनीं मला क्षमा करावी. (चंद्रहार राजाच्या स्वा-धीन करतो.)

सरस्वती-(राजाला हात जोडून) महाराज या दीन कन्येला चुडेदान द्यावें. (पाया पडते.)

सुविचार-हेमंतराव तूं मोठा धूर्त खरा, पण यापेक्षां दुसऱ्या चांगल्या कामीं जर शहाणपणाचा उपयोग करतास तर मोठा मु-त्सद्दी झाला असतास. असो, यापुढें तूं आपल्या दौलतीचा आनं-दानें उपभोग घ्यावास. मदनराव, तूं आपल्या पैशाचा वाईट मार्गाकडे उपयोग करून अखेर दरिद्री झालास. जा तुला यावेळीं क्षमा करितों. आणखी आजपासून गृहिणीरूप शृंखलेनें तुला बंधन करितों. चंग्या, फंग्या तुह्मांकडे राजकीयहेरांचीं कामें देतों. मी के-लेल्या क्षमेचा चांगला उपयोग करावा. ह्मातारे, तूं बदमाष लो-कांच्या नादीं लागून द्रव्यलोभाच्या आशेनें घातकी कृत्याला प्रवृत्त

झालीस. असो. आजपासून हा धंदा सोडून दे. सुमते, ह्या कंठ्याची जी किंमत येईल ती सरकारी खजीन्यांतून घेऊन जवाहीरखान्यांत ही वस्तू ठेवून घ्यावी व त्यापैकीं या मदनरावाच्या बायकोच्या नांवानें दहा हजार रुपये पेढीवर ठेवावेत. चंद्रिके, जन मला कांहीं ह्मणोत, पण मनोभावानें आजपासून तुला मी भगिनीसमान मानतों.

वसंत-(हेमंताला उद्देशून) मित्रा हेमंता, मागें मी तुझी निर्भर्त्सना केली होती. याबद्दल तूं मला क्षमा कर. मित्रा मारुता ! धन्य आहेस तूं. प्रिये, या राजेंद्रानीं व हेमंतानें तुझ्या चुड्याचें रक्षण केलें बरें. (एकमेकाला भेटतात.)

सुविचार-आर्या वसंता, ग्रहदशेनें देवादिकांना देखील छळिलें आहे. मग मनुष्याचा त्यापुढें काय पाड ? असो, तूं खरोखर पुण्यात्मा असून सत्वशील आहेस. आजपासून मी तुझी अष्टप्रधानांत गणना करतों.

(वसंताला पोषाख देतो.)

सुविचार-भगिनी चंद्रिके, तूं आपल्या सद्गुणानें व सुशीलत्वानें माझा प्रेमसिंधु उचंबळून सोडलास, अहाहा! सर्व जगांतील वेश्या अगर अन्य स्त्रिया जर तुझा कित्ता गिरवतील तर ' व्यभिचार ' ह्या शब्दाला खरोखर हरताळ लागेल. असो. भगिनी आज यमद्वितियेच्या शुभ दिवशीं तुझा बंधू—

पद. (पूर्णायुष भूपतिला० या चालीवर.)

देतों तुज अर्धराज्य हेंच चुडेदान ॥
भगिनि तुझा याहुन मी काय करूं सन्मान ॥

चं०—

जीवदान पतिस दिलें हेंच मला दान ॥
राज्याहुन अधिक असे खचित चुडेदान ॥

वसंत—

न्यायसिंधु अवतरला नृपति नीतिमान ॥
श्रीनरहरि पदकमलीं वास करो श्रीमान् ॥ १॥

(पडदा पडतो.)

अंक ७ वा समाप्त.

भरतवाक्य.

(ब्यांडच्या चालीवर.)

विश्वंभरहर करुणासागर आर्यजनांला चिरसुख देवो ॥ सुसमयिं वृष्टी पडुनी भूवरि धनधान्यादिक तो पुरवो ॥ धृ० ॥ रोगराइचें आर्यावर्तातूनी निर्मूलन होवो ॥ अतिशय देवो बल तें सुजनां जागृत धर्माला ठेवो ॥ स्वातंत्र्या । दे सदया । या समया । तव माया । कृपाछत्र तव अनुदिनिं राहो पारतंत्र भी मुळि नुरवो ॥ विद्यामृत तें देउनि सुजनां उद्यमवृद्धितें करवो ॥ माधवदासाच्या हृदयांतिल कलिमल निरसोनी जावो ॥ श्रीनरहरिच्या पदकमलीं रत अक्षय होउनिया जावो ॥ १ ॥

समाप्त.